प्रकरण - तिसरे

## प्रकरण - तिसरे

## देवाची साक्ष आणि अगीनफूल या कादंब-यातील आशयाचा रसास्वाद.

**प्रस्तावना:-**

ग्रामीण वास्तुमध्ये वाढलेल्या, ग्रामीण जीवनाचे जवळून दर्शन घेणा-या आणि ग्रामीण समाजाचे वास्तव चित्र उभे करणा-या प्रा. चंद्रकुमार नलगे यांचा जवळून परिचय करुन घेतल्या नंतर त्यांनी लिहिलेल्या अनेक कादंब-यापैकी 'देवाची साक्ष' आणि 'अगीनफूल' या दोन कादंबरी संग्रहातील कादंब-यांचा आशयाच्या दृष्टीने रसास्वाद घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत प्रकरणात करण्यात आला आहे. या कादंब-यांच्या रसास्वादाचा अभ्यास 'कादंबरीचा विषय, तिची मध्यवर्ती कल्पना, कादंबरीतील कथेची रचना, कादंबरीतील पात्र परिचय, कादंबरीच्या प्रसंगाची योजना, कादंबरीतील विषय लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी लेखकांनी योजलेल्या युक्त्या, कादंबरीतील कथानकाचा वाचकावर होणारा परिणाम आणि शेवटी लेखकाची विवेचन शैली' इत्यादी बाबी कोणत्या प्रकारच्या आहेत. हे पहाण्यात आले आहे.

**कादंबरीचा विषय :-**

प्रा. चंद्रकुमार नलगे यांची दि. 15/3/79 रोजी 'देवाची साक्ष' ही कादंबरी विशाखा प्रकाशन, पुणे यांनी प्रकाशित केली आहे. देवाची साक्ष या कादंबरीत 'चांदोली धरण' लढा लेखकांनी पाहिलेला होता. प्रत्यक्ष त्या भागात जाऊन लोकांच्या मुलाखती घेऊन परिस्थिती पाहून ही कांदबरी लिहिली आहे. धरण ग्रस्तांची वाताहत व त्या काळातील त्यांची मानसिकता यांचे चित्रण केले आहे. अशा धर्तीची ही ग्रामीण पहिलीच कादंबरी होय, 'झाडाझडती' ही या विषयावरील अलीकडे प्रसिध्द झालेली कादंबरी आहे.

या कादंबरीमध्ये कथानक हे योग्य पध्दतीने रेखाटले आहे. एकेकाचे नशीब कशा प्रकारचे असते. कशा पध्दतीने त्यांना परिस्थितीला तोंड द्यावे लागते. या कथानकात इच्छा नसतानाही माणसाला अनेक गोष्टी पदरात बांधून घ्याव्या लागतात, यामध्ये एका मुलीचा बाप हा आपली मुलगी जग सोडून गेली असताना भूक लागलीय म्हणतो. यावेळेस त्या मुलीची, कुशीची

आई डोळयांनी कसली तरी याचना करत असलेली दिसते. यामध्ये स्वतः च्या मुलीला बाप हा बेवारशासारखी तिच्यावर माती लोटून रिकामा होतो. आईला मात्र आपल्या मुलीचा 'ऐलमा पैलमा' च तेवढा ऐकू येत होता.

सदाशिव यांच्या भोवतीच हे कथानक गुंफले आहे. तो आपल्या जीवनात कोणत्या खडतर परिस्थितीला तोंड देतो याविषयी माहिती आली आहे. आपण का जन्मलो ? कशासाठी ही वणवण ? असे असंख्य प्रश्न जेव्हा खो-यांनी माती लोटली जाते तेव्हा त्याच्यापुढे उभे राहतात.

या कथानकात धरणग्रस्ताविषयी माहिती आली आहे. त्यांना आपली घरे सोडून दुस-या ठिकाणी जावे लागते. यावेळेस येणा-या अनेक अडचणींना त्यांना सामोरे जावे लागते. नियतीनेच त्यांच्यावर असा प्रसंग आणलेला असतो. या भयानक परिस्थितीशी तोंड देताना यातील व्यक्ती किती वरच्या थराला पोहचल्या आहेत याचे वर्णन यात आले आहे.

कथानक मांडत असताना नलगे यांनी यातील प्रत्येक पात्राची परिस्थिती विशद करुन मांडली आहे. प्रत्येक व्यक्तीचा आपल्या घराशी–मातीशी–गावाशी कसा संबंध असतो याचे वर्णन केले आहे.

यामध्ये धरणामुळे उठलेल्या वस्तीचे चित्रण आहे. जुन्या मातीचे बंध तुटताना होणारी घालमेल आणि नव्या मातीत रुजताना उद्ध्वस्त होणारी जीवन रहाटी यांची ही शोककथा आहे. नलग्यांच्या कादंबरीतील माणसे अन्याय अगतिकपणे सहन करतात. त्यांची सीमा झाल्यावर मात्र ती सर्वस्वानिशी झुंज घेतात. मनात आदर्शाची स्वप्न जागवीत वास्तवात रक्तबंबाळ होत राहतात.

**कादंबरीची मध्यवर्ती कल्पना :-**

देवाच्या साथीनं एका खेडयात घडलेल्या लोकजीवनाची भेसुरता आली आहे. धरणामुळे एका खेडयास स्थलांतराची वेळ येते, त्याच्यावर यावेळी अनेक संकटे येतात. त्यावर मात करुन परिस्थितीला सामोरे जाण्याचे सामर्थ्य व्यक्तीत येते. परिणामी ग्रामीण जीवनाचे उध्वस्त स्वरुप यानिमित्ताने करुण नाटय आले आहे.

**कादंबरीतील कथेची रचना :-**

व्यक्तीवर कशा प्रकारची संकटे येतात, इच्छा नसताना मनाला काचणा-या असंख्य गोष्टी सहन कराव्या लागतात. उपासमारीच प्रतीक येथे इतके भयानक दाखवले आहे की, कुशी ही मृत्यू पावते व तरी देखील तिचा बाप जेवण्यास मागतो. हा प्रसंग खारोखारच मानवी जीवनाची भेसुरता दाखवणारा आहे. 'संस्कार' या शिवराम कारंत यांच्या कन्नड भाषेतील कांदबरीत असाच एक भेसूर प्रसंग आला आहे. या कांदबरीची नायिका प्लेगाने मृत्यू पावलेल्या आपल्या प्रियकराच्या प्रेताजवळ तीन दिवस बसून राहाते. ती बाई लिंगायत समाजाची व तो पुरुष ब्राम्हण. त्या ब्राम्हणाच्या घरी मृत्यूची हकिकत तिने कळविली आणि तीन दिवस वाट पाहिली. प्रेत उचलण्यास कोणी येईना, म्हणून प्रेताजवळ बसून आधी चुरमुरे खाऊन घेतले आणि लिंगायत समाजातील एका गाडीवाल्याला दया-वया करुन नदीवर नेण्यास सांगितले. या प्रसंगात जातीव्यवस्थेतील जी भेसुरता आहे, तशीच भेसुरता आर्थिक दृष्टया पिळवटून निघालेल्या या जीवनात आहे. हे परिस्थितीचे बळी आहेत.

'धरण होणांर' हे ऐकूण सदाची सर्व बालस्वप्नचं मातीत गाडली होती. कोल्हया, कुत्र्यांनी फाडून खाल्ली होती. अगोदर सर्वांना धरणं होणार म्हणून आनंद झाला. कारण त्यावेळी त्यांना आपल्याला गाव सोडून जावे लागणार याची कल्पना नव्हती. जेव्हा आपणास गाव सोडावे लागणार हे कळते तेव्हा सर्व घरं कंबर खाचावी तशी खाचली, नंतर धरणावर काम करण्यासाठी लोकांची जोरात तयारी सुरु झाली तशी आमच्या मनात भीती उभी राहिली. कडयाकपारीतून मृत्यूलाच हातावर खोळवणारी माणसं भयानक संकटाच्या सावलीत वावरु लागली.

' रक्ताचं पाट वाहतील धरण होऊ देणार नाही'. अशी भाषा हे लोक बोलू लागले. त्याचा परिणाम धरण फक्त पंधरा मैल वर सरकलं होत. त्यामुळे खालची गाव वाचली, आमच्या गावच्या सीमेवरच धरणाचा पाया ठरला, जाडजूड यंत्रे पाहून माणसांची झोप उडाली, गावभर एक भंयकर सावट पिशाच्यासारखं वावरत होत.

ज्या पांढरीत पिढयांन पिढया जन्मल्या. त्यांना वैराण माळावर पालं ठोकावी लागणार होती. या भयानक विचाराने कुणी गांगरलं, कुणी दुखणं काढून घेतल, तर कुणाला वेड लागलं.

एक दिवस वारकरी तुका आबा नानाला म्हणतो की बाकीची गावं उठली. आपल्यालाही आता संसार पाठीवर घेऊन निघायला हव, नाना म्हणतो पाडवा झाला की जाऊ, पाडवा आला, गुढया उभ्या केल्या, परंतु सारा गांव गुढया उभारुनही भकास दिसत होता. कुशी मेली तरी नाना हलला नव्हता पण पाडव्यादिवशी नानाच्या डोळयात पाणी आलं होतं. आईला देखील कुशीची आठवण आल्याने ती रडत होती. कारण गेल्या वर्षी पाडव्याला गुढी उभी केली तर टाळया पिटीत कुशी नाचली.

नानाला तर कुशी गेल्यानं देवावर राग होता, म्हणून या वर्षी गुढी उभी करायची नव्हती, पण इथला शेवटचा सण म्हणून वाडवडलांच्या आठवणीसाठी म्हणून यंदा गुढया उभ्या करु असे तुकाआबा नानाला म्हणतो.

तुका आबा गुढीचा प्रसाद देत म्हणतो की उदया लवकरच गाव सोडून निघू हे ऐकून सदाच्या पोटात कालवाकालव झाली. व एकाएकी दारातली गुढी निसटली, खाली कोसळली.

लवकर निघायचं होत म्हणून प्रत्येकाचे बांधाबांधीत हात गुंतले होते. मनं ठणकत होती. ज्या हातांनी इथल्या मातीत संसार उभारलं त्याच मातीनं गुंडाळायला लावलं होत, इथल्या आठवणी कायमच्या पुसल्या जाणार होत्या. मोठी माणसं काळजावर दगड रचून फुटका तुटका संसार गोळा करीत होती. आम्हा लहान मुलांना भीती वाटायची व परगांवचं आकर्षण ही वाटत होत. गाडीत बसून जायचं म्हणून आनंद झाला होता. विशा म्हणतो,'आपण जेथे जाणार तो गांव कसला आहे?' तुका आबा म्हणतात, माळ आहे. म्हणजे माळावर भिका-यासारखं उतरायचं या विचाराने बालमनाला प्रश्न पडतो की खरचं गेलच नाही तर काय होईल ? मग शि-या म्हणतो,

'आपण तिघांनी दडून बसायचं ठरवल तर ? (पृष्ठ 16) पण यांना प्रश्न पडतो आपण खायचं काय? तर रानचा मेवा खायचा. पण झाडं सुध्दा तोडणार आहेत. सोमालीच्या म्हातारीचं फणसांच झाड ट्रॅक्टरंन पाडंल म्हणून तिला वेड लागल.)

सदाने तांबडा चाफा जगावा म्हणून अनेक कष्ट केले. मामाच्या गावावरुन चाफ्याची कांदी आणली. ती परडयात लावली. रोज पाणी घातलं. रोज त्या फांदीकड बघत बसायचा त्या फांदीची फुल सुकली, पान कोमेजत गेली. गळून पडली. जीव उडाला एक दिवस तर रडूच

कोसळल, तेव्हा आई समजावून सांगते की पाणी घालत रहा. पुन्हा पानं फुटतील.

कुणी गावाला गेलं तरी सदा जायचा नाही. दीड महिना झाला तरी तो खुंट नुसता तसाच उभा असे. परंतु एक दिवस आई उठवते म्हणते तुझ्या चाफ्याला कळया आल्या, ते पाहून खूप आनंद सदाला झाला, अन् तेच ट्रॅक्टरन उमळणार. त्याची नासधूस होणार. यामुळे सदाचा प्राणच कासावीस झाला, व धरणाचं उग्र रुप जाणवलं.

श्रावणातल्या सरीचा खेळ सुरु होई तेव्हा याच रामटेकडीवर सदा व त्याचे मित्र खेळत असायचे. हिरव्या गालिच्यावर नाच नाच नाचायचे. हुंदडायचे. 'येग येग सरी' म्हणून आभाळातनं सुटलेल्या सोनेरी धारेला मखमली मनःपटलावर झेलायचे, असं रमतारमता वाटायचं, या टेकडीवरनं त्या टेकडीपर्यंत झुलता साकव बांधला तर-अशी स्वप्न रंगवत होते.

कल्पनेचं धरण. किती किती पाणी साठवायचं. भला मोठया पाण्याचा सागर मनाला मोहिनी घालयचा. त्यावेळी धरणाची कटुता जाणवली नव्हती, अजूनही त्याचं भयानकपणं कळलं नव्हत, नवा मुलूख बघायला एक मन आतूर झालेलं तर दुसरं मन इथल्या मातीचा लळा सोडायला तयार नव्हतं.

माथ्यावरचा चंद्र ढळला, खाटल क्षितीजावर सरकलं, आणि तुकाआबानं गावाला हाक घातली.

'सोडा ...... गाडया सोडा',

वरच्या गल्लीनं काही गाडया खडखडत आल्या. आणि मनाचा ठाव सुटला, आईला घरातलं आवरताना सदा मदत करतो, हे साहित्य आवरताना आईच्या डोळयांचे पाणी खळत नव्हतं, संसाराची उतरंड उतरताना आईचा हात थरथरत होता. चिंधीचिंधीनं वाढवलेला संसार पुन्हा असाच स्थिर होईल की नाही याची चिंता तिच्या हालचालीतून जाणवत होती.

ज्या घराची सावली गारव्याची वाटायची तेच रिकामं घर उदास भकास वाटत होत. सगळं बांधून झालं. गाडीत टाकलं. देव्हा-यातला देव आणि लाकडी पाळणा या दोन गोष्टी गोळा करावच्या होत्या, देव गोळा करताना तर सदाच्या आईचा गळा दाटून आला. सदाचं डोळं पाणवलं. देवाच्याही नशिबी माळ यावा याचं आश्चर्य वाटलं.

ज्या देवाची करुणा झाली की शेतंभातं पिकतात, झाड-झुड फुलत. आनंदाची कारंजी उडायची त्याच देवाला अशा वैराण माळावरनं माणसाच्या नशिबाला नशिब बांधून फरफटत यावं लागतं होत.

अंधा-या खोलीतला पाळणा हलवताना, आईला हुंदका फुटला आईनं देवांना पाळण्यात घातलं. सदाला मात्र पाळण्यात देवाचे पाय दिसले नाहीत, दिसला तो कुशीचा घोंचा, घोंचा पाहून आईला कुशीची आठवण झाली. आई म्हणते, खरचं नशिबाचे फेरे तरी चुकले तिच्या. कसले भोग ठेवलेत आमच्या नशिबात कुणास ठाऊक बाबा'. सदाच्या खोलीत चार पिढया जन्माला आल्या, नांदल्या, पाचच्या पिढीची पाचवी पुजली मात्र सदा म्हणतो आमची नाळ कापली ती मातीनं, वा-यावर लोटलं.

आईच अतं:करण पाखडीत एक पाकोळी फडफडीत गिरक्या मारु लागली त्यामुळे थरकून गेलं. नानांनी हाक मारली.

आवरलं का सारं ?....... आईनं पाळणा व पाळण्यातून देव बाहेर आणले. वरच्या गल्लीच्या गाडयांचा आवाज जवळ आला. त्यामुळे आईनं गडबड केली. करंडातलं कुंकू उंबरठयाला लावलं. आपण ल्याली. व उंबरठयावर माथा टेकला त्याचवेळेस वाघजाईच्या देवळातील घंटेचा आवाज जीवघेणा वाटला, नानानं गाडीला बैलं जुंपल तरी आई येत नाही म्हणून हातात चाबूक घेऊन आला म्हणाला,

' झालं  की नाही ?'

' झाल ', तिचा आवाज कष्टी वाटला. आई दार ओढून घेणार तेवढयात नाना म्हणाला,

' आत उजेड कसला ?'

' दिव्याचा '

' तो कशाला ठेवलाईस आणखी',

' असू दे नांदत्या घरातला दिवा कसा विझवायचा ?' (पृ.23).

यावरुन आईचे काव्यमय मन दिसून येते. नानाचे वागणं अलीकडं बिघडल होते. धरणाचा फार मोठा परिणाम मनावर झाला होता. सा-यावर संतापे, झिटीनं म्हणाला.

'काय उरलंय आता'

नाना आत गेला. आईचं काळीज हाललं. बोलली ती म्हणते असं अशुभ करु नका परंतु नानानं दिवा विझवला. घरातला प्रकाश नष्ट झाला वातावरणाला एक अवकळा आली.

नाना देवाचा पाळणा गाडीच्या कमानीला बांधत असताना सदाला आठवण झाली व तो सगळयांची नजर चुकवून परडयात चाफा पहायला गेला. एक कळयांचा घोस तोडला. तेवढयात हुंदक्याचा आवाज आला.बाबांच्या थडग्याजवळ नाना होता.

गाडी चालू लागली. सदा शाळेच्या दप्तराची पिशवी पाठीवर टाकून गाडीच्या मागून चालत होता. सदाला गाडीची हौस दांडगी. गाडीत फिरताना एक प्रकारचा आनंद होत असे. अनोखा आनंद लुटून गावी परतण्यात हौस वाटायची पण आजचं जाणं परतीच्या वाटेचं नव्हतं.

सारं उदास उव्दिग्न करुन टाकणारं वातावरण गाडीच्या आवाजानं बदसूर झाल होतं.

बैल अडखाळला. नानानं जोरात आसूड मारला, अलीकडे नानाच्या वागण्याचा अर्थ समजत नव्हता. तुकाआबा एकदा म्हणाले,

' धरण होते आहे हे ऐकल्यापासून नानाचं मनचं भंगलं.' तुकाबाबा म्हणत होते त्याप्रमाणे खरचं नानाचं कशातच मन लागत नव्हतं. नाना सदाला गाडीत बसवून फिरायला नेत. पण आज मात्र सदाला नानांनी गाडीत बस म्हटंल नाही. आईच सदाला गाडीत बसायला सांगते. तेवढयात गाडी ओढयात शिरते. सदाला एकदम नानांनी सांगितलेली वाडवडलांच्या खानदानीची कथा आठवते. व ती ऐकत असताना हातातली पेन्सिल तलवार झाली आहे व शत्रूंच्या मुंडक्याचा खच पडला आहे असं सदाला वाटत होतं.

ओढयातून गाडी चढाला लागली. सदाला उचलून आईने गाडीत ठेवले. आईला सदा म्हणतो,

'तू ही चढ की वर', (पृष्ठ 28) आई म्हणते, गाडी उताराला लागली की बसेन. सदाच्या मनाला वाटलं आता उतार कधी लागेल का तरी ? का असचं खडतर जीवन जगावं लागणार. गाडीला हदरा बसला तेव्हा सदा सावरुन बसला. धुसर चांदण्यात तुळजेच्या देवळाचं शिखर दिसल. विश्या, शि-या आणि नु-या, यांनी तिथं लंपडाव मांडले. लंगडीचे डाव मांडले जायचे. गुरवानं लावलेल्या तेलवातीकडं खूप वेळ सदा व त्यांचे मित्र पहात बसायचे. नुसतं त्या जळणा-या मंद वातीकडं पहात रहावसं वाटायचं. पण पोटाला भूक जाणवली नाही. लहान भूक हरवून जायची,

लंगडया कृष्णाचा पाळणा हालायचा,

' असा कसा बाई देवाचं देव ठकडा एका पायानं लंगडा' (पृष्ठ 29).

या नादावर पोरींच्या झिम्मा फुगडयांनी डोळयाचं पारणं फिटायचं. धनगराची वैजू या वर्षी खूप नटली होती, तिने आपल्याला मागच्या पडवीत झोपाळयातल्या लाहया चोरुन खायला दिल्या होत्या, व ती गालगुच्चा घेऊन पळून गेली होती.

दस-यात धनगराचे ढोल वाजायचे. नु-याचा बाप ताशा वाजवायचा, नव्याच्या नवरात्री फुलांच्या सुंदर माळा बांधून जायच्या, माळयावरची पालखी खाली उतरते, सजते. वर्षभर कुलुपात असलेला देव पालखीतनं गावभर मिरवतो, गुलालानं माखतो. तुकाबाबाच्या खांदयावरची भगवी पताका चाफयाला बांधलेली दहीहंडी फोडते.

याच देवाच्या साक्षीने धरण होणारच होते. माणसानी देवावर मात केली होती. नाहीतर बिन हातापायाचा नि डोळयाचा देव काय करणार होता ?

लोकांची तुळजेवरची माया मात्र तशीच होती. तुकाबाबानं मुंबईहून मूर्ती आणली देवीची स्थापना झाली नी वर्षाकाठी भंडारा सुरु झाला, जत्रा भरु लागली. या भंडा-याला जाण्यासाठी माणसं उत्सुक असायची.

पण तीच माणसं रानोमाळ झाली होती. बघता बघता तुळजेच्या मंदिराचं शिखार मातीत खाचत असल्याचं भासत होत, या तुळजेच्या पायावर डोकं ठेवूनच सदाच्या आईनं सदासाठी, गोपूसाठी व कुशीसाठी कृपेचं दान मागितलं होतं.

विश्या, शि-या, नु-याची भेट प्रथम तिथचं झाली. धनगराच्या वैजूची नजरभेट तिथच झाली व सदाच्या मनात वैजूबद्दल मधूर स्वप्न अंतःकरणात निर्माण झालं.

पोपटाचे थवे आकाशात भरारत त्यावेळी वैजूचा पोपटही सदाला त्यात दिसायचा.

नानानं बैलांना चुचकारलं नी बघता बघता गाडीच चाक दगडावर चढलं, उचललं. गाडी उलटणार असे वाटत होते. सदा एकदम ओरडतो तेव्हा आईनं गाडीच्या बाजूला जोरानं ओढून धरलं.

आईनं गाडीची बाजू ओढून धरली नसती तर सदा फेकला गेला असता. पोटाशी धरलेल्या दप्तराच्या ठिक-या उडाल्या असत्या, व देव दगडावर आपटले असते. पाळण्याला झोका बसला असता, नाना मात्र गप्पच होता, सदाला आई म्हणते.

'नीट वाल्याला धरुन बस रस्ता खडकाचा आहे', (पृष्ठ 33).

तेवढयात आईलाच जोरान ठेच लागली, गाडी कासराभर लांब झाली तरी आई तिथचं पाय धरुन उभी होती. सदाने दप्तर पोटाशी धरलं व जोरात उडी मारली. सदा आईजवळ जातो तर आईचा अंगठा फुटलेला होता. सदा आईला विचारतो, आई ठेच लागली होय तेव्हा ती म्हणते.'जन्मालाच पूजल्यात ठेचा', आईचा आवाज कष्टी झाला होता.

' सदाला आई म्हणते तू गाडीत बस. म्हणजे ठेचा लागायच्या नाहीत. आईन अंगठयाला पाला लावला त्या वेदना असाह्य होत होत्या.

संपुर्ण बालपण इथचं गेल होत. अनंक गंमती जमती इथेच केल्या होत्या. खूप स्वप्न रंगवली होती. या शाळेत चौथीपर्यंत शिकायच, पाचवीसाठी चरेमाळेशीला तीन मैलावर जाव लागे, चौथी झाली की सदानं मोठया शाळेत जायची आशा बाळगली होती.

सदाला चरेमाळेशी आवडलं होत, त्याही पेक्षा चरेमाळेशीला नेणारी वाट फार आवडली होती, या वाटेनं जीव मुठीत धरुन जाव लागे.

या वाटेनं सदा एक दोनदा गेला होता. शाळेतली काम या शाळेतून त्या शाळेत पाठवण्याचं काम मुलांच्याकडे असे. एकदा सदाला मास्तरांनी या कामासाठी पाठवले. सोबतीला वैजू मिळाल्याने सदाला आनंद झाला. वैजूचा व सदाचा घरोब्याचा संबंध. रक्ताचं नातं नसलं तरी जिव्हाळयाचं होतं.

वैजूच्या जीभेत लयबध्दता होती., डोळे मोहक होते.

वैजूनं पाडव्याला पाटीवर सरस्वतीचं चित्र काढले ते शेवटचचं. ते चित्र सदाला कोडयासारखं वाटायचं. वैजूनं हाताशी धरुन शिकवलं तरी जमायचं नाही. वैजूनं नाजूक हातानं

सदाच्या पाटीवर सुरेख सरस्वती काढली सदाने पाटीवर तांबडी फुलं ठेवली. वैजू म्हणते तांबडी फुल अशी आणायची नसतात. आमची आई म्हणते की तांबडी फुल अशुभ असतात. असे वैजू सदाला सांगते.

जेंव्हा गाव उठण्याच निश्चित झांल तेव्हा ती फुंल सदाला आठवली. सदाची व वैजूची ताटातूट होणार म्हणून दु:ख झाल. वैजू धनगर सडयावर राहते. डोंगरकपारीला लागून सुंदर उबदार झोपडया होत्या. व सदाला लांब देश रानात जागा मिळाली होती. वैजूची भेट आता कधीच होणार नव्हती.

वैजूची आठवण झाली की सदा पाटी काढी व त्या पाटीकडे पहात बसे. गाडी थांबते व एकदम आचका बसल्यामुळे सदा एकदम जागा होतो. वैजूचा विचार करता करताच सदाचं मन थकून गेलं. आई गाडीच्या मागच्या बाजूला रेलली होती. गाडया धरणाच्या कामाजवळ उभ्या होत्या. मोठयामोठयाने वादंग चाललेला होता.

तेवढयात जोरानं आवाज आला, 'काढ काढ बाजूला न्हाईतर रॉकेल वतून जाळून काढीन आमच्या जगण्यावर उठला तेवढं पुरं झालं. आता वाटेवर उभं का ?

नाना हे बोलत, होता, सदा आईला विचारतो. 'काय झालं आई?'.

वाटेवर यंत्र उभं केल आहे तिथं भांडण चाललीत तिथचं नाना आहे. सदा, आई गाडीतून खाली उतरतात. थंडी असल्यामुळे आई सदाच्या अंगावर घडप्याची खोळ घालते. ती फार थकून गेली होती.

'नाना थांब, मारशील, शपथ आहे माझी',

हे तुकाबाबाचे शब्द ऐकून आईचा थकवा दूर झाला. ती सदाला म्हणते अरे तू जाऊन बघ, 'रागाच्या भरात तडाखा देतील. डोके फिरलयं त्यांच कालपासूनं.' (पृष्ठ 42).

सदा तिकडे जाणार तेवढयात इंजिन सुरु झाल्याचा आवाज आला नाना आला व त्यानं बैलांना जोराचा आसूड मारला.

बुलडोझरचं भलं दांडगं धूड करकरत बाजूला झालं.

आज सारा गाव निघाला होता पण त्याला स्मशान यात्रेसारखी कळा आली होती. डोक्यावर बोचकी घेऊन मरणाच्या दाराकडं जावं तशी चालली होती.

सदाचं मन उदास झाल आपण कुठं चाललोय, कुंठ जायचं, कुठं धावायचं, की असचं माळरानानं जसे फासेपारशी, कंझारभाट जसे वाट दिसेल तिकडे जातात.

रोज नवा गाव, नवा माळ, नवी रात्र.

सदाला एक प्रसंग आठवतो, माळंगीच्या माळावर फासपारध्यांची पालं पडली होती, विशा त्यांच्या कुत्र्याचा ताणपट काढायचा तिच्या लहान मुलांना खडे मारायचा, डिवचायचा, नु-या मोठया माणसांनाही दगड मारायचा. फासपारधी रागानं पाठी लागायचे, मग हे विश्या, नु-या, सदा पळायचे.

एकदा कंझारभाटाचं लहान मूल मेलं, पालांनी आकांत केला, बायकांनी उर बडवलं. गडयांनी प्रेत उचललं, खड्डा खणला, मुलाला पुरुन टाकलं, नंतर त्या मातीवर फडया, निवडुंग घातला, एवढयाशा मुलाच्या अंगावर ठेवलेलं दगड बघून सदाला फार वाईट वाटलं. फिरस्त्यांच्या जीवनाचा अर्थ शोधण्यात सदांच मन व्यग्र झालं होतं.

त्या माळावरचा, मुलगा मृत्यू नी पालाचं उठून जाणं पाहून वाटायचं माणसाची नाती हीच का ? खोटी ...... फसवी ..... क्षणात तुटणारी. मातीला मिळणारी. आणि तो काळजातला कळवळा. डोळयातून पाझरणारी ती आसवं, आई, बाप, भावंडं, मित्र ही सारी कसली माया ..... वैजूचा पोपट खोटा ?

त्या मुलाच्या मृत्यूत व आपल्यात तरी काय फरक ? आपल्याही नशिबी कुठला तरी माळ लिहिला असेल. कुठला तरी अंधार आपल्यासाठी तिथं थांबला असेल. गाडया थाबतील रडतील. आकांत करतील. ऊर बडवतील, तोंडात माती भरुन घेतील नी मातीत लोटून गाडया अंधारात निघून जातील, तरीही देवाचा पाळणा हालतच राहीला, या सर्व कल्पनेनं सदाला भीती वाटते. तो आईला बोलावतो, आई गाडीत चढताना तिला देवाचा पाळणा कपाळाला लागतो. ती सदाच्या अंगाला हात लावते. आणि काळजीनं म्हणाली.

'ताप भरलाय की तुझ्या अंगात ?' (पृष्ठ 46) सदाने आपलं अंग आईच्या कुशीत ढकलून दिलं आईला भीती वाटते, ती 'सदा .... सदा ' म्हणून हाक मारते. सदाला दातखिळी बसली होती, डोक्यावरचा देवाचा पाळणा हलत होता, तुकाबाबा वीणेची तार झंकारत होता, त्याचा आवाज चांदण्यात येत होता.

'हरी...... हरी....'

गाडया खिंडीच्या चढाला लागल्या होत्या. तुळजेच्या देवळातल्या घंटेचा नाद गावाच्या रोखानं येत होता नी घंटा वरच्या सडयावरची वेडी' वाजवत असते.

नव्या मुलखाच्या दर्शनाने जीव उदास झाला. चालून दमलेली माणसं खाली बसली. सदानं गाडीतनं खाली उडी टाकली. वर पाहिलं तर वडाचे झाड. त्या झाडाच्या पानापानात वाघळा उलटया टांगत्या असलेल्या दिसल्या, प्रथमच ते काळ उलटं विचित्र जग पाहून कसंसंच वाटलं.

सदाची आई पार पेंगळून गेली होती. सा-याच माणसांच्या नजरामधून एक प्रकारचा भकासपणा भरला होता. सदा आईला विचारतो, ' आई आपण कुंठ आलो ग ', ' परमुलुखात बाबा'.

सदाला एवढं जाणवलं की, आपला मुलुख न परतायच्या वाटेवर राहिला.

माणसानी वडाच्या, चिंचाच्या झाडाखाली आपली गाठोडी सोडली. क्षणभराचा संसार मांडला. कुणी दगडं गोळा केली. चुली मांडल्या.

पण जळण.....

इथेच माणसाच्या जीवनाला पहिली ठेच लागली, अगतिक होऊन माणसं मांडलेल्या चुलींच्याकडं पहात उभी होती.

नानानं गाडीतलं बोचकं काढलं.

चिंचेच्या बुंध्याजवळ ठेवलं.

तिथ अगोदर अशाच चुली पेटवल्या होत्या. जळके दगड नी पसरलेली राख तिथं पडली होती. त्या जळत्या राखेतून मनात प्रश्न उभे राहिले. इथं कोण कोण आलं असेल ? कुणी कुणी चुली

पेटविल्या असतील आणि ती रात्री उरलेली माणस परत कोठे गेली असतील. कोणत्या मुलखात असतील, अशीच परदेश नशीबाला आलेली असतील. ?

सदाला चिंचेच्या बुंध्याच्या पलिकडच्या बाजूला हालचाल जाणवली. तिथ कडकलक्ष्मी होती. उभं कपाट एका बाईने मुलाला झोळीत घातलं.

सदाला ते हातपाय हलवणारे, किणकिण्या डोळयाचं लहान मूल. त्या बाईची पोटावरची झोळी दिसत होती.

सदाच्या मनाला वाटलं की, डोक्यावर बसवून घेऊन माणसांना गावोगाव फिरायला लावणारा हा देव तरी कसला ?

सदा परत येतो तेव्हा आईनं तीन दगडं मांडलेली. सदा तसाच माघारी जातो. व कडकलक्ष्मीच्या चुलीतील घेऊन येतो व आईने केलेल्या चुलीत टाकतो. तेव्हा सदाच्या मनात आलं की, फिरस्त्या माणसांचा फिरस्ता विस्तव.

सदा आईला विचारतो हा विस्तव चालेल का तेव्हा आई म्हणते.

' आता सारं चालेल बाबा' (पृष्ठ 50) आईला खूप दु:ख झालं होतं.

ज्यांच्या घरीदारी लाकडंच लाकडं, ज्यांचा जन्म झाडांच्या सावलीत झाला. त्यांना चुली पेटवण्यासाठी आभाळातल्या देवाकडं बघावं लागलं. चुलीच्या आधी अंतःकरण पेटली.

कुणी चिंचाबर, वडाच्या फांदयावर चढून मिळतील ती चार काटकं काढली, कशा तरी चुली पेटवल्या. सदाच्या आईनं रझियाम्माकडनं मासोळी घेतली व ती विस्तवावर उलथीपालथी केली, मासोळी शिळया तुकडयात दुमडली. तोंडाला लावली. तोंडात घास घालणार तोच कानावर शिव्या पडल्या. सा-यांचे घास हातात राहीले. सदानं उठून पाहिलं तर एक माणूस हातात काठी घेऊन तणतणत सदा व इतर मंडळी बसलेली असतात त्याच दिशेनं येत होता.

तो माणूस सगळयांच्या कुळाचा उध्दार करीत म्हणाला.

नानाला राग सहन झाला नाही. त्याने गाडीतली काठी काढली. नाना काठी घालणार तेवढयात तुकाआबा मध्ये पडला.

नाना आपल्याला परमुलुख कंठायचाय हे काय करतोस असे तुकाबाबा म्हणतात. सारी माणसं भडकली होती. पण तुकाआबानं सा-यांना हात जोडलं व त्या माणसाला समजावलं.

तेवढयात सारा परगांव काय झालं बघायला लोटला. सर्व शांत झाल्यावर सदा व इतर व्यक्ती चुलीकडे वळली. चुलीजवळ काहीच उरलं नव्हंत. सर्व कुत्र्यामांजरांनी पळवलं होतं. कावळयाचं फावलं होत.

आम्हाला पहायला गोळा झालेली माणसं अंतं:करणावर डागण्या देत होती.

जणू काय पालवाले डोंबारी आहोत, भणंगभिकारी आहोत. म्हणून त्यांनी विटंबना करावी. अब्रुचे वाभाडे काढावे.

सदा म्हणतो, आमच्याकडं गंमत म्हणून पहात उभ्या असलेल्या घोळक्या घोळक्यावर सदाची नजर फिरते, काही टारगट पोरं गोळा झाली होती. त्यात सलमा रझियाम्माची मुलगी ही होती.

सदा म्हणतो, आम्हाला काही करता येत नव्हतं. नाहीतर गावातला कर्तासवरता गडी तळावर होताच. सशाला चांदण्यारात्री वाघर लावून सशाचं चांदण खांदयावर टाकून येणारा राघू कुंभार, तसेच डुकरावर पळता पळता भाला फेकणारा नेमबाज चंदू मोकाशी, साळींदराचे काटे अंगभर झेलून रक्तबंबाळ होणारा रतनू भंडारी, दत्त्या कातकर. अस्वल टोंगीवर अस्वलाच्या मागे विस्तवाची चूड घेऊन त्या पळवणारा ना-या घडीम, सागावर सरसर चढून कवडयाची पिली फासक्यात पकडणारा रावजी, सरावण्या, लखूळा भजन्या, जोशांचा नाना अशी चतुर माणसं या तळावर होती. पण तरी ती सारा अपमान सहन करत होती.

नानानं तोंडात घास घातला नव्हता. आईनं तोंडात पाणी धरलं नव्हतं. सदाचीही भूक पार पळाली होती.

वारकऱ्याचा तुकाआबा लखुळा भजन्याला हाक मारीत म्हणाला, देव पुजायला पाहिजेत व त्यांना अंघोळ घालण्यासाठी पालखी नदीवर नेऊ असे म्हणतो. पालखी नदीला निघाली देव अंघोळीला चालले. सदा आईला म्हणतो, देवाबरोबर अंघोळ करायला मी पण जाऊ. आई काहीच बोलली नाही.

सदा नदीच्या दरडीवर उभे राहून लहानथोर पोरं डुबक्या कशी मारत आहेत हे बघतो. व सदाला ही वाटते आपण अंघोळीला पाण्यात उतरावं पण सदा म्हणतो आपले मित्र तर मागेच राहिले मग आपण कुणाच्या अंगावर पाणी उडवून आनंद लुटायचा.

नु-याच्या बापानं माडीच कंत्राट घेतलेलं तो तिथचं राहिलेला. त्यामुळे नु-या आंब्या - फणसाच्या नगरीत राहिला. विशा डोंग-याच्या बापानं रणाच्या जागेवरच हॉटेल उघडलं. त्यामुळे विशा हॉटेलातच राहिला. शि-याच्या बापाचा पाहुण्यापैचा लागाबांधा लागला व शि-या पाहुणा झाला. सारीच आपापल्या मार्गानं गेली. धरण फुटावं तशी माणसं फुटली.

नवी माणसं भेटतील ती माणुसकीला जागतील का ? एकमेंकाच्या जीवनाच्या तारा जुळतील का? काय होईल ते देवालाच माहित ।

देवांना तरी माणसाशिवाय कुठला निवास, कसला आधार, जर तुकाबाबानं देवाची पालखीच आणली नसती तर.....

धरण झालं असतं.

देवळात पाणी शिरलं असतं.

देवांनी आकांत केला असता तरी देव बुजलेच असते. तुकाआबानं देवळातले सारे देव पालखीत घातले. मुलं अंघोळकरताना पाणी ढवळत होती व त्याच पाण्यात देव अंघोळीला उतरले होते.

...... बायकाही पलीकडच्या डोहात पाण्याच्या काठाला बसून खांद्यावरनं पाणी घेऊ लागल्या.

पोरीबाळीही पाण्यात उतरल्या.

तेवढयात नदीच्या दरडीवर असलेल्या झुडपामागे हालचाल होत असलेली दिसली तिथ चार पोरं अंघोळ करीत होती,ते पाहात होती.

सलमाचं नव दर्शन सदाच्या मनात कसली तरी जाग आणून गेलं.

देवांची अंघोळ संपून देव पालखीत बसले होते. तुकाआबा देवाला पुजून गंध लावीत. होता. देवांचीही नजर सलमाच्या दिशेलाच होती. झुडपाआडून पाहणा-या टारगट पोराच्यांकड देवाचा डोळा का नाही जात याचं कोड सदाच्या मनात उभं राहिलं. पण याच उत्तर मात्र देवालाच माहित. सदा देखील अंघोळीसाठी पाण्यात उतरतो.

सुर्य माथ्यावर येऊन आग पाखाडीत उभा राहिला. वातावरण भेसूर वाटायला लागलं. बरोबर आलेली. कुत्रीमांजरही बावरुन गेली होती.

अजून माणसांच्या पोटात काही गेल नव्हतं.

तुकाआबा नानाला म्हणतो एखादा तुकडा तोडांत घाला. आईला चार काटक्या देऊन चूल पेटवून चहा तरी घ्या असं लखुळा भजन्या म्हणाला.

नाना तुका आबाला म्हणतात, आपण आपल्या गावी परत जाऊ तिथं आपल्या मातीत आपली हाडं पडू देत. यावर तुकाआबा म्हणतो, की ही देवाघरी निघालेली वारीच आहे. आपण इतकी संगतीला सोबती सोबतीन मार्ग काढू या धीर सोडू नका. असे नानाला म्हणतो.

आपण जिथे उतरलो तो माळ विटीदांडूचा माळ' या इथ पाची पांडव विटीदांडू खेळले. आपली जशी अवस्था तशीच या पाच पांडवाची अवस्था होती. त्यांच राज्य गेलं व वनवास आला. वनवास भोगत ते अटिंग्या वनात विटीदांडू खेळले.

सर्वांनी आपणास विटी पडते का ? हे पहाण्यासाठी नशीब पणाला लावलं. नाना पुढ झाला. त्यांनी कंरगळी पुढ केली. नानाला घाम फुटला करंगळीतनं वेदना आल्या. सदाचा जीव गलबलला. तुकाआबा नानाला म्हणतात, सोड. करंगळी मोडून घेतोस काय ?

नाना तुकाआबाला म्हणतात, तुम्ही प्रयत्न करुन बघा. तुका आबा लहानथोरांचा मान राखावा म्हणून 'श्रीहरी' म्हणाला. वारक-यानं माळ कपाळाला लावली. जोर वाढवला. देवाची करुणा भाकली. सर्वांच्या व्याकूळ नजरांच्या ताकदी करंगळीवर लागल्या. तुकाआबाची करंगळी मोडायला आली.

'सोडा वारकरी' पुरे परीक्षा',
असं जोशाचा नाना तुकाआबाचा हात काढीत म्हणाला.

पांडवाचा वनवास संपला तरी ते देव आपण माणसं.
देव आणि भिकारी सारखेच.
त्यांना कोणीतरी दान देतो.
फक्त देव दान मागत नाहीत. भिकारी दानासाठी हात पसरतात. एवढाच फरक.

गावातली माणसं कीव करत. कुठून आला ? कोठे जाणार ? ती सहानुभूती दाखवत.

त्या माणसांची दया नको वाटायची ही अशी माणसं असंख्य प्रश्न रचून जायची -

सलमा भोवती टारगट पोरांच्या घिरटया चालूच होत्या. तिच्या आईला हे आवडत नव्हतं. तिला सलमाचा राग यायचा.

सदाला वैजूची आठवण होते डोळे पाण्यानं भरले. सर्वजणांची उदया कधी निघायच याबद्दल चर्चा चालली होती. उन्हं कलती झाली की निघायचं ठरलं तुकाआबानं सर्वांना बांधाबांध करण्यास सांगितले.

गाडया जोडल्या. देवाची पालखी उचलायची होती. तुकाआबानं काही राहिलं नाही याची खात्री करुन घेतली. तुकाआबानं पालखी उचलली, तेवढयात कुणाच्या तरी कण्हण्याचा आवाज आला.

कासारीण, आपली मुलगी बांळतपणाच्या वेदना दयायला लागलीय. आणि तुम्ही सर्व मला एकटीला सोडून जाऊ नका असे म्हणते. सर्व जण जायची राहतात.

कासारणीच्या पोरीच्या ओरडण्याचा आवाज वातावरणात विरघळत गेला. कासारीण तुका आबाला म्हणते, माझी मुलगी वाचवा, तुकाआबा जोशीच्या नानाला पंचांग खाली ठेवण्यास सांगतात. पाच धा मैलावर धामापूर आहे तिथ तिला दवाखान्यात न्यायची तिला गाडीतून न्यायचं म्हटल की उशीर होईल. तेवढयात तुकाआबाला देवाची पालखी दिसते. ते जोशाच्या नानाला पंचाग अंथरायला लावतात त्यावर देव ठेवतात.

तुकाआबानं देवाच्या पालखीत कासारणीच्या पोरीला आडवी केली. त्यानं नानाला पालखी उचलायला सांगितली. पालखी उचलली. बायकांनी आकांत केला. तुकाआबा सांगतात, पहाटचं निघा माणसं सांभाळून आणा असे नानाला म्हणत होते.

पालखी माळावरुन उताराला लागली. कासारणीची लेक मरुन वर्ष झाले तिला तिची आठवण झाल्याने ती रडत होती, सा-यांच्या डोळयापुढून वर्षाच चक्र उलटं फिरत होतं.

----पालखी तळावर आली. सा-या माणसांच्या वाचा बसल्या, सगळी काप-या नजनेनं पालखीकडं पहात होती.

पालखीत कासारणीच्या पोरीचं कलेवर होतं. हे पहाताच जबरदस्त धक्का कासारणीला बसला होता. आज वर्ष झाल्यावर लेकीच्या आठवणींनी ती वेडी झाली. तिला आधाराला दुसरं कोणच नव्हत. नवरा कासाराचा धंदा करी. एकदा वळवाच्या पावसानं जोराचा पाण्याचा लोट आला. त्या पाण्याबरोबर कासार नाहीसा झाला.

तुकाआबा माळावर आल्यावर सांगतो, 'ही आपली घरं. ही वस्ती ..... '

गाडया, गाई, घोडी, कुत्री, मांजर, गाठोडी, पोरठोरं, बायाबापडया सर्वजण तटस्थ नजरेने पहात होती. ...... आपली वस्ती...

ही देवानं चालवलेली थट्टा समजल्यावर माणसांचे डोळे भरुन आले.

चांगल्या देशाचं रंगवलेलं स्वप्न भंग झाल होतं त्याच्या जाळत्या, पोळया, पेटत्या ठिक-या झाल्या होत्या.

भर-उन्हाचं एक वादळ आल. भुईपासून आकाशापर्यंत हे भुईचक्र उठलं होतं. लहान मुलं भीतीनं ओरडू लागली. तुकाआबाच्या गाडीवरील पताका वादळानं ओरखडून टाकली होती. पाळण्यातले देव हालले होते.

सडकच्या एका बाजूला तुकाआबानं पंढरी उभी केली दुस-या बाजूला रझियाम्मानं झिंग्या, मासळीचा बाजार मांडला. जोशाच्या नानानं संसाराला लागणारा किराणा दुकानात ठेवला.

नानाच्या पलीकडं कासारणीचा संसार उभा राहिला. लखुळा भजन्यानं गावोगाव भटकंती केली. एक दिवस दुधाच्या घागरी सायकलीवर चढल्या. लखुळा भजन्यानं गवळयाचा धंदा चालू केला. राघू कुंभार मडकी करु लागला.

नानाच वागणं विचित्रच झालं होतं. एक दिवस नाना उठला नी वैरण मिळेना म्हणून दावणीची बैल विकून टाकली. विश्या डोंग-याचा बाप नानाला म्हणाला, धरणावर जागा मिळेल तिथे हॉटेल किंवा दुसरा धंदा सुरु करता येईल.

सदाला वाटते, नानानं जागा मिळवली असती तर हॉटेल किंवा दुसरा धंदा करुन आपल्या मुलुखात रहाता आलं असतं. नु-या भेटला असता. वैजू आईबरोबर आली असती.

नानाला तुकाआबा म्हणतो, माझं हात बघ, वय बघ. आयुष्यभर पंढरीच्या वारी केल्या. बायकोनं उंबरठा ओलांडला नाही. खडी फोडून फोडून हाताच्या चिंध्या झाल्या. तुकाबाबाचं राठ झालेलं हात बघून सदाचं मन चरकलं.

नानाची स्वप्नं धरणानं गोपूलाच मारत सुटला. आई मध्ये पडली तर तो म्हणतो 'मुळावर आलाय आमच्या. 'गोपू जन्मला व धरणाची आवय आली. तो पांढ-या पायाचा असे म्हणून नाना त्याला मारतो. नाना गोपूचा राग करी. गोपूला न्यायला मामा आला. तेव्हापासून गोपू मामाकडेच आहे.

एकदा पोरांनी पेरवीच्या झाडाचे पेरु तोडले. मालकानं पहिलं त्यानं शिव्या दिल्या, पोरांच्या अंगावर ओल्या फोकीचं वळ उठलं होतं. त्यांना वेदना असहय होत होत्या. त्या माणसाच्या दरडावणीचा सा-या माणसांना धाक वाटला.

सदाला त्या माणसाचा राग आला, परमुलुख पडला. तो आपल्या गावात असता तर

विशान ती नु-यानं त्याच्या मिशाला फणास बांधले असते. आपल्या गावचा बळी लोकाच्या गावची गाढव ओढी.

एकदा माळामाळाने डोंगराच्या बाजूला गेलो तर चंदू मोकाशीचं कुत्रं तिथ फिरताना दिसलं. तिथ मढ पडलं होत ते पाहून सदाची दातखिळ बसली. तापभरला सदाची शुध्द गेली होती. आईनं सदाला देवापुढच्या अंगारा लावला. शुध्द आल्यावर सदाने आईला सर्व सांगितले. बाईचं मढ होतं. असे सदा सांगतो. हे ऐकून सर्व वस्ती गप्पगार झाली. सदाला खून म्हणजे काय कळलचं नव्हतं.

जोशाच्या नानाच्या दुकानासमोर गाडी थांबली. पोलिस खाली उतरले. फौजदारानं नानाला दरडावून बाहेर बोलावलं. फौजदारानं नानाला आत गल्लीत नेलं. त्यांच्याबरोबर वस्तीवरची कर्ती माणसं होती. सदाच्या घराकडेच कुणी तरी बोट दाखवलं. पोलिसांचा मोर्चा सदाच्या घराकडं वळला.

नानाच्या नावानं दारावर थापा पडत होत्या. नाना आईला न जुमानता कडी काढायला गेला. फौजदाराने नानाला फरफटत नेलं. सर्वांना पोलिसांनी गाडीत कोंबलं.

दुस-या दिवशी समजलं. तो खून म्हणजे गो-या, देखण्या, कैकाडणीचा होता.

पोलिसांनी ज्याना नेलं होतं त्यांना बेदम मारंल होतं. तुकाआबा पंढरीला गेले होते असते तर त्यांचा तेवढाच आधार वाटला असता.

दुस-या दिवशी परतं तीच गाडी वस्तीवर आली. ती सदाच्या दारातच थांबली, गाडीतून दोन पोलिस उतरले. सरळ घराच्या दिशेने यायला लागले. पोलिस दारावर थाप द्यायला लागले. तेव्हा सदा आईला म्हणतो, भीती वाटतेय दार उघडू नको. आईनं भीत भीत दार उघडलं. त्याला चौकीवर बोलावले आहे. पोलिसांनी सदाच्या बखोटयाला धरुन नेले .

सदाला गाडीत कोंबलं. आई ओरडू लागली. पण काही उपयोग झाली नाही. पोलिस चौकीत नानाला मारलेलाच फौजदार होता. सदानं नानाला कळवळून हाक मारली.

जोशींच्या नानाचे डोळे पाणावले होते. चंदू मोकाशांच डोळं रागानं पेटलेले होते. पोलिस सदाला म्हणाला, तुझं नाव सांग, सदा पार भ्याला होता.

'स....स.... सदा'. हुंदके देत म्हटलं.

'वडिलांचे नाव ?'

' नाना '

पोलिस सदाला विचारतात तुझा बाप काय काम करतो. यावर सदा म्हणतो घरीच असतो. मग पोलीस म्हणतो,

' मग खाता काय ? '

' भाकरी '

सदाला ते मढं कस दिसलं याबद्दल विचारतात. तेव्हा सदा म्हणतो, चंदू मोकाशाचं कुत्रं तिकडे होते. म्हणून तो गेला होता. तेव्हा त्याला ते मढं दिसल व ते पाहून त्याची शुध्द गेली. सदाला पोलीस विचारतात, तू ती बाई कधी पाहिली होतीस. माणसं म्हणतात, तुझ्या बापानंच त्या बाईचा खून केला. हे ऐकून सदा मोठयानं, रडायला लागला. तुकाआबाला बघून जास्तच रडू आलं.

वारक-याला पोलीस म्हणतात,

' तुम्ही ?'

तुका आबा सांगतो, मी वारकरी आहे. माळावरच्या वस्तीवर राहतो. पोलीस तुका आबाला म्हणतात, खून करुन विठोबाच्या वारीला गेला होता काय. यावर तुकाआबा म्हणतो, मी वारकरी आहे. गुन्हा केला असेल तर हातात बेडया ठोका. पोलीस म्हणतात की तुमच्या वस्तीनचं खून केलाय असे निनावी पत्र आलयं. सरकारन असं छळलं तर जायचं तरी कुठ ?

खून करायचे असतं तर धरणावरचं केल असतं. तुकाआबा न भीता बोलत होता.

वारकरी फौजदाराला म्हणतो, 'या माळेची शपथ' आमच्या हातून असं व्हायचं नाही. 'सरकारनं ज्यांच्या जमीनी काढून आम्हाला दिल्या, त्यांच्या मनात आमचा काटा रुततोय' म्हणून त्यानी निनावी पत्र पाठवलं. (पृष्ठ 87)

एका संध्याकाळी कासारीण आली व आईजवळ बसून हुंदकायला लागली. आई तिला विचारते तिन्हीसांजच का रडतेस. तेव्हा कासारीण म्हणते. नानानं माझ्या लेकीचा खून केला. वगळातला तो खून कासारणीच्या मुलीचा असतो.

आईला कासारणीचा राग आला ही जर पोलीसांच्या समोर बोलली तर नानावर पोलीस वहीम धरतील आई कासारणीला कळवळून सांगते.

' बाई ग आमचं घर उठवू नगं. ( पृष्ठ 88 ) कासारीण तेवढयापुरती गप्प बसायची आपल्याच नादात असायची, तिच लेकीच्या खुनाचं वेड गेलं नव्हतं.

वर्षाची पान बघता बघता उलटून गेली. चक्र फिरलं 'चल ग सये वारुळाला' म्हणायला कुणाला आठवण उरली नव्हती. गौरीचा झपुर्झा रंगला नाही. नवरात्राचा चौघडा वाजला नाही. दस-याला तुळजेची पालखी मिरवली नाही. दिवाळी या भणंग माळावर आली नाही. 'तीळगूळ घ्या' म्हणायला वाचाच उघडली नाही.

गाव सोडलं तेव्हा पाटी फुटली. ती तशीच फुटकी राहीली.

शतशः झालेली सरस्वती पाहून डोळे उघडले. ( पृष्ठ 89 ) त्या पाटीचे झालेले तुकडे सदा जुळवत बसला. सरस्वती जुळता जुळेना. वैजूची आठवण झाली. तिच्याही जीवनाची अशीच घुळवड झाली असेल असे प्रश्न निर्माण होत वैजूनं सांगितलेली परीचीः कथा तिला आठवत असेल.

सदाला पोपटाची आठवण झाली. तो पाळण्याजवळ जातो. वैजूचा विचार चाललेला असतो. तेवढयात सदाच्या खांदयावर हात ठेवून वैजूचं बोलली असं सदाला वाटतं पण ती सलमा होती. ती सदाला डोंगरावर मोरासारखं जे एकटच झांड होत ते बघायला जाऊ असे म्हणते. ती दोघे ते दृष्य पहायला जातात.

त्यावेळी सदा सलमाला छातीबरोबर उचलून नाचरा मोर दाखवत होता, सलमा बिलगली होती. सदा मनात म्हणत होता,

' वैजू ....'

सलमानं हा आवाज ऐकला ती म्हणते,

' कोण रे ही वैजू ...... ( पृष्ठ 93) सदा सलमाला सांगतो, ही वैजू धनगराची पोर, ती आमच्या शाळेत होती, तो म्हणतो, वैजू मला खूप आवडायची, तेव्हा सलमा म्हणते, मी आवडत नाही.

' तू.... तू .....'

सलमा म्हणते, मी तुझ्याशी छान बोलेन, हसेन मग मी तुला आवडेल ना. यावर सदा म्हणतो.

' तू चांगली नाहीस'. ( पृष्ठ 93) कारण तुझ्या भोवती पोर फिरतात व वैजूच्या भोवती पोर फिरत नाहीत. म्हणून वैजू चांगली व सलमाला सदा म्हणतो, तू वाईट आहेस. लगेचच ती दोघे वस्तीच्या रोखाने निघाली. माणसं दोघांना पाहून काय म्हणतील याचा ती विचार करु लागली.

सलमाला पाहून जनाआत्या म्हणते, मला वाटलं, कुणी पळवून नेली का पळून गेली कुणासंग. या बोलण्याने सदा चरकला.

सदाला पाहिल्यावर आईचा जीव भांडयात पडला. नाना जवळ येऊन कान धरुन म्हणतो.

' कुठ उलथला होतास ?'

जोशाचे नाना आमच्या नानाला म्हणतात की, ' पाडव्याचं असं अभद्र बोलू नकोस नाना.

जोशाचे नाना सदाला विचारतात सदा कोठे गेला होतास. तेव्हा सदा म्हणतो, आम्ही दोघे डोंगरावर गेलो होतो.

रझियाम्मा सलमाच्या बकोटयाला धरुन दुकानात येते व तिला नानापुढे ढकलत म्हणते.,

' बघा नाना कार्टी कुठं हुंदडतीय'.

नुसती सलमाच नाही. सदाही होता बरोबर'. रझियाम्मा या दोघांवर रागावते. (पृष्ठ 96)

मन रमावं असं रखरखीत माळावर काहीच नव्हंत. मन कुंठ तरी गुंतावी म्हणून तुका आबानं तुळजेचं देऊळ बांधायचं काढलं. तेवढा काळ माणसांची मनं थोडी ताजीतवानी झाली. देऊळ बांधल. त्या देवळाच्या कणाकणाशी मन एकरुप व्हायचं.

इथं बांधलेलं देऊळ देऊळच वाटत नव्हतं, अन् या देवळातील तुळजा ही तुळजाच वाटत नव्हती. इथं करायचा म्हणून भंडारा केला. तुकाआबान देऊळ बांधल पण नानाला त्याचा विरोध होता.

तुळजाईच्या जत्रेत सदा, विशा, शि-या, नु-या वानरांच्या रुपाने भेटत होते.

सदा सलमाच्या घरी गेला. सलमानं हातात आरसा धरला होता. आपलं रुप न्याहाळीत होती. रझियाम्मा कुठं दिसत नव्हती, सलमा सदाला आत बोलावते. डोंगरावरचं पाणी उमगल्यापासून सारी वस्ती तिथलचं पाणी आणते. सलमा व सदा पाण्याला बरोबर जात होती. सलमा सदाला म्हणते, ' तुला वैजूची आठवण होते का ?' ( पृष्ठ 104) सदा काहीच बोलत नाही.

सदा व सलमाला आपल्या हातून चूक झाल्यासारखे वाटते. म्हणून सदा मागच्या दारात चिव्याचं टोकदार दांडक घेतो व माती उकरत बसतो. तेवढयात एकदम कवटीसारखं काही तरी वर उडालं. सदा एकदम किंचाळतो.

सदाची किंकाळी ऐकून आई धावत आली. सदाने आईला मिठी मारली व सर्व सांगितले. आई भ्याली पण सदाला धीर देण्यासाठी म्हणाली.

' हाडकाला भितोस कशाला ?'

असे आई म्हणते पण तिच्या शब्दात भीती जाणवत होती. सदाची किंकाळी ऐकून माणसं गोळा झाली. जोशाचे नाना, रझियाम्मा, सलमा, कासारीण आणि आमचा नानाही. सदा आईच्या कमरेला मिठी मारुन कवटीकडे पाहात होता.

जोशाचे नानानं दांडकानं माती हालवलीन् आणखी एक-दोन हाडं दिसली. कवटी दांडकात अडकवून लांब फेकीन नाना म्हणाले, ती माणसाचीच कवटी आहे. कवटीच्या आठवणीनं अंगावर शहारे आले. कंझारभाटाचं आमच्या गावच्या माळावर मेलेलं मूल डोळ्यासमोर आलं. तसाच माळावर एखाद्याचा मृत्यू झाला असेल व ही कवटी त्याचीच असेल. असा विचार चालू असतानाच.

नाना सर्वांना म्हणतो, आपापल्या शेतात बसायचं, कसे यंत्र अंगावर घालत्यात ते बघू. यंत्र मातीचा डोंगर लोटत नानाच्या जवळ यायला लागलं तसं माणसं घाबरली. यंत्र घरघरत नानाला भिडायला आलं आणि आईनं किंकाळी फोडली, तुकाआबा मोठयाने ओरडले,

' नाना ..... '

आता अंगावर यंत्र येणार अशा क्षणीही नाना घाबरला नाही. यंत्रवाल्याने यंत्र वळवलं. नाना वाचला पोलीस धावत आले. अन् क्षणार्धात बंदुकीचा बार वातारणाचा छेद घेत गेला. अवघा आसमंत थरारुन गेला होता. त्या यंत्रावर चढलेला एक वानर बंदुकीच्या बाराला बळी पडला होता.

नाना सूडानं पेटला. रात्री राहुटयाच जाळल्या, पोलिसांनी करडी नजर गावावर धरली. केव्हा भडका उडेल सांगता येत नव्हतं. म्हणूनच तुकाआबानं गाव सोडायचं ठरवलं होतं.

देवासारख्या देवाला वनवास आला, आमच्या घरादाराची माती पाण्यात घालून धरण होईल, यांची शेतीभाती पिकेल. सोन्याचं संसार होतील. पण आम्ही ..... काळजावर घाव झेलीत वादळाच्या घरातच जगायचं, तुकाआबाच्या टाळयांच्या हातातच दगड फोडायची सुतकी आली.

लखुळा भजन्या नानाला म्हणतो पलीकडच्या गावच्या देवाची चोरी झाली. देव चांदीचा होता. देवाचीच चोरी.... मग माणसांची चोरी ..... माणसाचीही चोरी होईल, सलमासारख्या गो-या सोन्या सारख्या उजळ पोरीची..... कुणी सांगावं .... होईलही ..... मग वैजूची...

सदा व सलमा परत येतात तर देवळासमोर माणसांची गर्दी दिसली, यामुळे या दोघाच्या मनात अनेक विचार आले. सदाला नाना ओली फोक अंगावर फोडतोय असाच भास झाला.

सदा गर्दी कशासाठी जमली आहे हे पहाण्यासाठी गर्दीत जातो. नुसतीच माणसं हळहळत, चुकचुकत होती, लखुळया भजन्या तिरडी बांधत होता. अनेक विचार सदाच्या डोक्यात येतात. सदाला तिरडीवर वानराचे पिलू दिसले.

तुळजेच्या शिखरावरचं .... हात पसरणारं ..... गंमती जंमती करणारं.
सदाचा नाना छातीवर हात ठेवून म्हणत होता,
'ही गोळी आमच्या छातीवर घातलीय'. सदाचं डोळं पाण्यानं डबडबलं.

सारी वस्ती हादरली. वस्तीतल्या माणसाला गोळी घातली असती तर झेल्ली असती छातीवर पण मुक्या प्राण्याची हत्या. तीही प्रभू रामचंद्राच्या भक्ताची.

नानाही कामावर जात नव्हता, आईला जाऊ देत नव्हता. तुकाआबानं मात्र आपली बायको

आपल्याबरोबरच कामावर नेली होती. रस्त्यावर खडी फोडता फोडता तुकाआबा दगड फोडण्याच्या खाणीवर कामावर गेला. जर एखाद्या दिवशी नाना कुणाची चूल पेटली नाही तर धान्य त्या घरात पोहचवायचा. गुरवाच्या पोरीचं लग्न देण्याघेण्यात मोडत होत तर नानानं घरची दुभत्याची म्हैस विकली. म्हणूनच नानाला अजूनही लोक मानत होते.

डोंगराच्या ताकदीचा नाना॰त्यांच्यावर संकट आलेल पाहाताच मनानं दुंभगला.

नानाच्या मनाचा तोल बिघडला म्हणून तर त्याच्या मनात सारखा झगडा चालू.... मुलखात जावं आपल्या ...... प्रथम वाटलेलं होत मुलुख सोडून जावं आपला.

कासारीण देखील मेंदूत कालवाकालव झाली की, आईजवळ येऊन रडायची, तिला विचारल की, काय झाल रडायला. तर ती म्हणते नानानं माझ्या लेकीला मारुन घरामागे पुरली, पदरातनं हाडाची कवटी काढून दाखवते. नाना तेव्हा तिच्यावर खूप रागावतो, तिला म्हणतो,

'तुझं वेडच काढतो आता.'

नाना तुकाआबाला म्हणतो, कासारीण म्हणते की, मी हिंची लेक मारली.

' नाही तरी कुणी ? तूच तूच मारलीस तिची लेक'.

नाना आभळाला तडा जावा असा ओरडला आणि तुकाआबाच्या कानशिलात मारली. जोशाचा नाना पुढं येऊन नानाला धरतो.

सराच्या डोळयापुढ, कासारणीच्या पदरातली ती भयानक कवटी नाचत होती.

सदाला भूक लागली होती. आई हतबल होऊन सदाला म्हणते घरात शिजवायला काय शिल्लक उरलयं. तरी देखील सदा ऐकत नाही. मग आई उठते, गाठोड घेते त्याच्या गाठी सोडते. त्यात कसल्या तरी बिया सापडल्या. त्या फणसाच्या होत्या. ती सदाला बिया देत होती. तेवढयात दार वाजले. व त्या अंधारात नाना निघून गेला.

नाना गेला आणि पार आधार तुटला.नानाला शोधण्यासाठी वस्तीतलया माणसांनी गावोगाव पायपीट केली. तुळजेला आळवली. पण तिला पाझर फुटला नाही.

आईनं नानाचा ध्यास घेतला होता, तिला दुस-याची मदत नको होती. तुकाआबा सदाला दगडाच्या खाणीवर कामाला नेतात. त्या माळवाटेत जाताना सदाला नु-या, विशा, शि-या व वैजू आठवत होती.

सदाला जगाची पहिली ओळख झाली ती काळया कातळयाच्याही ठिक-या ठिक-या करणा-या सुंरुगानं। ( पृष्ठ 135)

दगड फोडायच्या मशीनजवळ खंडीच ढीगच्या ढीग पसरंल होतं. सगळीकडं पीठासारखं पांढरं काही माखून उरलं होत. सदा तुकाआबाला म्हणतो,

' हे पीठ कसलं ?'

ते पीठ नाही.

' दगडाचा भुगा भुगा होऊन झालेलं ते दगडाचे पीठ हाय.'

पीठासारखं पीठ याच्या भाकरी केल्या तर, भाकरीचा वास आल्यासारखा सदाला भास झाला.

सदानं भाकरी आणली नव्हती, हे तुकाआबाला समजले त्याने सदाला जेवायला आणले. सदा कामाच्या उत्साहात आईची आठवण विसरला पण आईची आठवण झाली. आई नानाच्या जाण्यानं पार धास्तावून गेलीय. आणखीन मी दिसलो नाही की, आंकात करील. संध्याकाळ कामावरनं परत निघालो तेव्हा तुकाआबानं जवळ बोलावलं व म्हणाला,

' तुझ्या आजच्या पगाराचे पैसे मालकांनी दिलेत. हातातले कष्टाचे अडीच रुपये पाहिल्यावर अवघं आकाश मुठीत आल्यासारखं वाटलं.

सदाच्या घरी खूप दिवसांनी चूल पेटली. आईनं दोन घास समाधानानं खाल्ले.

नानाचा मागमूस लागत नव्हता. वैजूच्या हातची सरस्वती जुळायची नाही. गोपू व कुशी जवळ नसल्याने आई हताश झाली होती. ती सदाला म्हणते, तुकाआबाला विचार. मलाही कामावर घ्या, सदाने विरोध केला.

सदाला खाणीचा मालक घृणास्पद वाटत असे. म्हणून त्याला आपल्या आईला कामावर नेणे आवडत नाही. नंतर सलमा कामावर येते. आणि निळया गाडीतून आलेला खाणमालक तिच्याकडेच येतो. सदाला सलमाचा राग येतो.

एक दिवस दुपारी आई खाणीकडे येत असते. तिला सुरुंग उडाल्याचा भास होतो म्हणून ती सदाला बघायला येते. तेव्हा काळा चष्मा तिच्याकडे पाहत असतो. सदाला वाटते त्याच्या डोळयाच्या खाचा तुकाआबाच्या सुतकीनं कराव्या.

एकदा मध्यरात्री खाणीचा मालक गाडीतून दोन तीन मित्र घेऊन येतो. त्यानं दामूला बोलावले व लमाणीला बोलवायला सांगितले. ती तीन महिन्याची बांळतीण तिला कसे आणावे हा प्रश्न दामूला पडला, ती भीतीनं थरथरत मूल ओटयात घेऊन उभी राहिलेली पाहून दामू बाबाच्या डोळयातून आसवं घळघळत होती.

तुकाआबा माळकरी असला तरी माणसाची चालचलणूक त्याला कळत होती. माळावरच्या वस्तीला परमुलखात जगायचे असेल तर सारं सहन करावं लागत.

कासारीण मेल्यासारखी ओढयात पडली होती. तिच्या तोंडाला फेस आला होता. अंगावरचं लुगडं अस्ताव्यस्त झालं होतं. काकणाचा चुराडा झाला होता. सुटलेले केस भीतीदायक वाटत होते.

तुकाआबानं व लखुळा भजन्यानं तिचं लुगडं नीट केल. कासारीण बेशुध्द झाली होती. तिला उचललेल्या जागेवर रक्त दिसलं. सारी हळहळली जड पावलानं वस्तीकडं निघाली, तेवढयात कोण तरी म्हणते की,

' बलात्कार केलाय '

इतर कोणतेही दु:ख माणसांनी झेललं असतं. पण बायामाणसांच्या अब्रूला लागलेला धक्का माणसांची मन दुबळी करुन गेला.

माणसांची शरीर या मुलखात ...... या माळावर पण मनानं ती गावाच्या स्वप्नात शिरत.

तुकाआबानं रतनू भंडा-याला खाणीच्या कामावर घेतला. जोशाच्या नानाचं पंचाग त्याच्या खुळया पोरांने रॉकेलच्या डब्यात कोंबल, चंदू मोकाशी साखर कारखान्यावर दारुच्या पेल्याला नादावला.

दु:खाला देखील सीमा असते, पण हे अपरिमित दु:ख पाहून झोप उडाली.

सलमाला खाणमालकाने खुषीनं शंभर रुपये दिले. याचा राग तुकाआबाला व सदाला येतो. या गोष्टीचा सर्व वस्तीभर बभ्रा होतो.

सलमा कामावर येत नाही. त्यामुळे खाणमालक वस्तीवरच्या लोकांना कामावर येऊ नका असे सांगतो. हे ऐकून तुकाआबाच्या डोळयासमोर उध्वस्त झालेल्या वस्तीचं रुप दिसते.

सर्व वस्तीवरील लोकांना कामधंदा नसल्याने उपासमार होऊ लागली. चंदू मोकाशी सलमाला घेऊन वस्ती सोडून जातो. सदाची आई डोक्यावर परिणाम झाल्यासारखी वागत असे, ती नानाची आठवण काढे व रडत बसे.

नाना बेपत्ता झाला म्हणून पोलीसांनी त्यांच्यावर संशय धरला आहे, नाना हजर होत नव्हतां त्यामुळे वस्तीवरील लोकांचा छळवाद सुटत नव्हता.

रघू कुंभार तुकाआबाला सांगतो की, कासारणीचा खून नानानं केला, हे सदानं ऐकल आणि भीतीनं त्यानं भींतीला गच्च धरुन ठेवले, कासारणीनं हे नानाचं नाव मरणा अगोदर घेतलं व प्राण सोडला असे चंदू मोकाशी म्हणतो.

नानाबद्दल मोकाशी तुकाआबाला म्हणतो धरणावर इंजिनियरचा खून झालाय हे ऐकून कष्टी सुरात तुकाआबा म्हणतात, 'तुला कस कळलं' ?

तेव्हा चंदू मोकाशी म्हणतो, पेपरात मी वाचलं आहे. सदानं हे सर्व आईला सांगितल्यावर तिची दातखिळी बसते.

कासारणीचा बलात्कार ..... धरणावरचा खून ..... नाना .... सदाच्या डोक्यात

चक्र सुरु होतं. या विचाराने असे वाटे की, माणसाचे किती रंग .... किती मुखवटे .... माणसांच्या मनाचा थांग कसा लागेल.

आईचा नकार असताना सदा दगडी खाणीवर दामूबरोबर जातो.

सांजसावल्या पसरल्यावर निळी गाडी खाणीवर आली. काळोखा बरोबर दुसरी गाडी आली. दामू पुढे झाला. गाडीतून बाटल्या.... डबे आणि बरचसं काही घेऊन आला.

हे सर्व पाहून सदाच्या मनात अनेक विचार येऊ लागले. बाटली व बाई यांची पार्टी आहे व त्यासाठी काळा चेष्मा म्हणजे खाणीवरचा मालक व फौजदार येणार असतात, ती बाई म्हणजे सलमा होय.

सलमा बदलली चंदू मोकाशी वस्तीशीं बेइमान झाला. या विचाराने सदा कासावीस झाला हे पाहून दामू त्याला दारु घेण्यास सांगतो. त्यानं जास्त आग्रह केल्यावर पेला घेतला, घोट घेतला तेव्हा अंधार नरडयात जळू लागला.

चंदू मोकाशी देखील कट रचण्यात काळा चेष्मा व सलमा बरोबर होता.

तुकाआबा व आई सदाला शोधायला येतात, सदा त्यांना घेऊन लगेच वस्तीवर येतो, तर तिथं नाना आलेला असतो, तो आईला म्हणतो.

'बोल रात्रीची कुठं फिरत होतीस'.

तुकाआबाला हे बोल ऐकून तुळजेचा कळस कोसळत असल्याचा भास झाला.

एकदा उजव्या बाजूनं येणा-या रहदारीला तांबड फडकं दाखवंल, कर्रकन ट्रक थांबला त्यातून एक हात बाहेर आला तो हात सदाला साद घालणारा होता.

सदा त्या ट्रकच्या जवळ जातो. त्याचा चेहरा उन्हानं काळा पडलेला, दाढी वाढलेला. केसही मानेपर्यंत वाढत गेलेले राठ .... निबर ...... निस्तेज डोळयाचा.... चिंध्या अंगावर लोंबत असलेल्या ..... डांबराचे डाग पडलेले पाय, काळमट ..... दामट, रस्त्यावरचा असा हा सदा असतो.

तो ट्रक ड्रायव्हर नुरा असतो. हे सदा नुरा ट्रक घेऊन गेल्यानंतर ओळखतो. तो मोठयान 'नुरा' म्हणून हाक मारतो. त्या हाकेचा ध्वनि प्रतिध्वनि सा-या डोंगरद-यातून घुमला.

नुरा समोर आला असता सदाने त्याला ओळखले नाही. नुराची वाट त्या रस्त्यावर किती तरी दिवस पाहिली.

एक दिवस ट्रक हळूहळू चाललेला असतो. त्या ट्रकावर सदाची नजर खिळली, तो जोराने ओरडतो,

'दामू ... '

ट्रक थांबला. ड्रायव्हरनं बाहेर तोंड काढलं, तोही अधीरतेनं सदा म्हणून ओरडलाच.

दामू खाली उतरला सदाने त्याला मिठीच मारली, दामूनं खाणीवरची नोकरी सोडून ड्रायव्हरची नोकरी धरली, दामू सदाला म्हणतो, मी ट्रकचा ड्रायव्हर तू परत कधी तरी भेटशील म्हणून झालो. शेवटी भेटलास ते रस्त्यावर हे ऐकूण सदा गप्प होतो. तेव्हा दामू म्हणतो, तुला मी, रस्त्यावर भेटलास म्हटले म्हणून राग आला का ? यावर सदा म्हणतो, रस्तयावर राहणा-या माणसांन सगळं सोसलचं पाहिजे.

दामूनं आईची चौकशी केली तेव्हा सदाचं अंत:करण पोळलं. डोळयाच्या कडा भिजून चिंब झाल्या, सदा सांगतो, आई ठाण्याला वेडयाच्या इस्पितळांत आहे.

आई वेडी कशी झाली याची कहाणी सदा दामूला सांगतो.

आई व दामूबाबा सदाला बघायला खाणीवर येतात. आणि त्याचवेळी नाना घरी येतो,

' इतक्या रात्री आई घराबाहेर तीही तुकाआबाबरोबर, नानाच आधीच तापट असलेलं मस्तक भडकलं.

त्या रात्री नानांनी आईला मारली, तसल्या अपरात्रीचं नाना आईला म्हणाला, ' चल इथ राहायचं नाही. या वस्तीनं राखरांगोळी केली आमची. आईन पाय धरलं, घळाघळा रडत म्हणाली, आता कसल्या वणव्यात फेकता आम्हाला.

' माणसात रहावू द्या.'

आधीच खुनानं डोळयात रक्त चढलेलं त्यानं काहीच ऐकल नाही.

' धरणावरच्या इंजिनेरचा खून नानानं केला होता'. (पृष्ठ 194) हे ऐकून आईन चिंध्याच गाठोड बांधल. सदानं बालपणंच दप्तर पोटाशी धरलं आणि वस्ती सोडली.

' दोन दिवस नी दोन रात्र चालत होतो. एका रात्री एका जुन्या देवळात उतरलो, जीव कासावीस झाला होता. धरणीला अंग टाकलं. झोप केव्हां लागली कळलचं नाही.

थोडया वेळाने एक वयस्कर नानापेक्षाही वय झालेला, गंध लावलेला माणूस सदाला व आईला उठवत होता, त्यादिवशीच नाना आम्हाला सोडून परत गेला होता तो आजून भेटला नाही.

आई आजारी .... पहिले तीन-चार दिवस लोकांच्या दारात भीक मागीतली मग त्या पहिल्या दिवशी भेटलेल्या माणसाला दया आली. त्यानं शेतात काम दिले. आधार दिला, आई व सदाला घरात आश्रय दिला.

त्या माणसानं सदाला मुलासारखं सांभाळल, आई काकाशी एकरुप झाली. त्या काकाची बायको मरुन बरीच वर्षे झाली होती. दोन लहान मुलगे, एक मुलगी त्यांनाही आई हवी होती.

काकांची मुलं सदाची भावंड झाली. माया म्हणजे काय हे तिथं पहिल्यांदाच कळलं. आई देवपुजा करु लागली. देव्हा-यातल्या देवांनाही सदाच व आईच सुख पहावलं नाही.

' आई देवळात देवाच्या दर्शनासाठी गेली होती. ती परत आली ती धावतच .... आली ती बेशुध्द पडली. तिच्या डोक्यावर परिणाम झाला होता. सदा दामूला म्हणतो, आईच्या डोक्यावर परिणाम झाला याला कारण नानाच असावा.

सदाला दामूच्या मालकाने दामूच्याच ट्रकवर ठेवायला सांगितले.

सदाचं नशीब उज्वल, सदाचं मन आंनदाच्या हिंदोळयावर नाचत होतं. सदाला एका दिवस दामू म्हणतो. तुला एक गंमत दाखणार आहे. या गुपिताची सदाला फार ओढ लागली.

एक दिवस दामूनं कापड दुकानासमोर ट्रक उभा केला व त्यांने सदाला साडी पंसत करायला सांगितले.

सदानं त्याच्या मनात कायमच, एक पातळ कायमचं बसलं होत. सुदंर, रेशमी. गुलाबी... स्वप्नासारखं सदानं तसचं शोधण्याचा प्रयत्न केला. सारा ढीग उलथा पालथा केला. मनात तरळणा-या पातळांशी एकही जुळेना. तेव्हा दुकानदाराने ठेवणीतला कप्पा खोलला...

सदाला त्याच्या मनातले पातळ मिळाले.

आनंद झाला.

सदानं मनातल्यां व्यक्तीला मनानंच नेसवून पाहिलं. सदाच्या आवडीनं दामू खूष झाला. दामू सदाला आपल्या घरी नेत असतो. त्यानं लग्न केलं. यावरुन सदाला त्या गुपिताचा उलगडा होत गेला.

दामू म्हणतो मनानं पवित्र असलेल्या तुझ्या वहिनीच्या गळयात मणीमंगळसूत्र बांधले, तिचाच आता आधार.

सदा वहिनीला पाहायला अधीर झाला, छान सारवलेलं टुमदार त्याचं घरकुल होतं. त्या घरात लक्ष्मीचा वापर होता. तुळशीचं पावित्र्य संसाराला होतं.

दामू मोठया उत्साहाने बोलला,

' आज कोण आलय बघ..... सोन्याचा दिवस उगवलाय, माझा हरवलेला म्हैतर आलाय..... हे पातळ त्येनंच पसंत केलयं .... नेस ..... लाजतेस काय .... नेसून बाहेर ये पाया पडायला.....'

दामूच्या बोलण्यावरुन सदाची जिज्ञासा .... शिगेला पोचली, वहिनीला केव्हा पाहीन असं सदाला झालं होत.

दामूच वहिनीला घेऊन बाहेर आला.... लाजणा-या वहिनीला दामू म्हणीत होता,

'लाजतेस काय .... परकं काय का कुणी .... त्येचीच पसंती हाय बग पातळाची...

सदाने मनातल्या पातळात वहिनीला पाहिली आणि विजाचे आसूड काळजावर बसायला लागले.

सदाच्या दुंभगलेल्या काळजात आवाज कोंडला,

'वैजू .....'

होय ती वैजूच होती,

सदाच्या जीवनात आता फक्त वैजूनं काढलेली सरस्वती ..... तुकडया तुकडयांची ..... तेवढीच सोबत.

तुळजेचं मंदिर तेवढं या कवटयांच्या सोबतीला एकटंच .... भकास माळावर .... अंधार पांघरीत बसलेलं ..... तुळजा .... तू तरी आत .....

देवळात .... तुळजेच्या मागं .... कोण .... तू .... जोशाच्या नानाचा पोरगा ...... खुळा .... एकटाच कसा इथं.... सारी माणसं कुठ घालविलीस .... अवघी वस्ती कुठ बुडवलीस .... तुकाआबा.... निदान तुझा बाप ..... नाना ..... आणि हे काय ..... तुझ्या हातात चूड .... कसली ..... आता काय उरलंय .... अरं .... बोल निदान शेवटी तरी बोल .... तुळजेच्या साथीनं हे काय घडवलसं .... पुढे कुठं.... माझ्या अंगावर .... माझ्या ..... मी आधीच जळालोय ..... राखा झालीय माझी .... आणखी चूड कशाला लावतोस...... लाव...... या दप्तराला चूड लाव ...... सरस्वतीला चूड लाव.

..... हे काय चाललंय कळेना .... खुळा चूड घेऊन गंभीर होऊन पुढं सरत होता...... तो सदाला भिडणार तेवढयात माझ्या हातातल्या दप्तराचा तडाखा मारला ..... उंबरठयांतनं जोरानं धाव घेतली.

सदा त्या वसाण झालेल्या माळावर जीवाच्या आकांतानं नाना ओरडतो.

**कादंबरीतील पात्र परिचय :-**

'देवाची साक्ष' या कादंबरीत चंद्रकुमार नलगे यानी काही मुख्य पात्रांचा समावेश केला आहे.

सदा :- सदा हे या कादंबरीतील मुख्य पात्र होय. याच्या जीवनात घडलेल्या घटनांच्या आपल्या नशीबाला दोष देतो. सदाला परिस्थितीचे चटके बसू लागतात व त्याचे मन उद्विग्न होते. सदाला जे हवं होतं ते शेवटपर्यंत मिळालं नाही. सदाच्या वाटयाला सतत दुःखच येते . माळावर रहात असताना त्याने नुसतं मढ पाहिलं होतं तरी पोलीसांनी त्याला खूप मारहाण केली.

सदा आपल्या आईला मदत म्हणून खाणीवर काम करतो. तो आईचं दुःख कमी करण्याचा प्रयत्न करतो. सदाच्या जीवनात वैजूची मूर्ती लहानपणापासून साठवलेली असते. शेवटी तो ट्रकवर कामाला लागतो. तेव्हा त्याच्या मनात लग्न करुन संसार करायचा असे विचार चालू असतात. पण परिस्थितीने मात्र वैजू देखील त्याच्या पासून दुरावली होती, सदाला सलमा आवडत नव्हती. परंतु तो या सलमातच वैजूचं रुप पाही. वैजूनं पाटीवर काढून दिलेली सरस्वती सदा तासन्तास पाहात राही.

रखमाक्का:- ही सदाची आई ती संकट, दुःखमय परिस्थितीवर मात करुन थकली होती. उपासमारीत जेव्हा तिची मुलगी कुर्शी हे जग सोडून जाते तेव्हा तर रखमाक्काला खूप दुःख होते.

परिस्थितीचे सर्वात अधिक आघात सहन करणारे हे पात्र आहे. आजच्या ग्रामीण स्त्री जीवनाचे प्रतिनिधीक रुप म्हणजे रखमाक्का. सोशिकपणातर तिच्या नसानसात भरला आहे. स्वतः चिंधीचिंधीत वाढवलेला संसार पुन्हा असाच स्थिर होईल की नाही याची चिंता तिला गाव सोडून जाताना वाटते. ती अंधश्रध्दाळू आहे. तिला घर सोडून जाताना नांदत्या घरातील दिवा विझवू नये असे वाटते.

जेव्हा गाडीचं चाक दगडावर चढलं, गाडी एवढी कलली झाली की, सदाला वाटलं, गाडी उलटणार. परंतु त्या जिद्दी स्त्रीने गाडीच्या बाजूला जोरानं ओढून धरलं.

सदाचे वडील आईवर किती आरोप करतात. परंतु तरी देखील रखमक्कात्यांच्या विरुध्द बोलू शकत नाही. बंडखोर वृत्तीचा अभाव रखमाक्काकडे आहे. ती आपले पती बोलले तरी सर्व सहन करते.

नाना - हे सदाचे वडील आहेत. नानांची वृत्ती बंडखोर आहे. त्यांना आपलं गांव सोडून जावं लागणार ती गोष्ट सहन होत नाही. तेव्हा ते बंड करुन उठतात. आम्ही जाणार नाही. आमच्या अंगावरुन यंत्र घाला असे नाना यंत्रवाल्याना म्हणतात, नाना हे रागीट व्यक्तिमत्व आहे. त्यांची मुलगी कुशी ही वारली असताना सुध्दा ते बायकोवर चिडून भूक लागली म्हणतात. ते सदावर व पत्नीवर देखील थोडयाशा कारणावरुन रागावतात. गोपूबद्दल पत्नीला दोषी ठरवून त्याला मामाच्या गावी पाठवतात. नाना हे एक जबाबदार व्यक्तीमत्वाचे नैतृत्व करतात. नाना एखाद्याची चूल पेटली नाही तर त्यांना धान्य नेऊन देतात.

आलेल्या परिस्थितीशी नानाला मिळतेजुळते घेता न आल्याने स्वतःची व कुंटुबाची वाताहत करण्यास ते जबाबदार ठरलेले पात्र होय. नाना हे जिद्दी होते. त्यांचा स्वभाव हट्टी, करारी, स्वाभिमानी. परंतु त्याचा स्वाभिमान धरणानं दुखावला होता.

विशा :- हा सदाचा मित्र. त्याला यंत्रवाल्याचा खूप राग आहे. हा तुळजेच्या देवळाच्या कणाकणाशी एकरुप झाला होता. विशा लहानपणी तुळजेच्या मंदिरातील देवीच्या पुढे ठेवलेले पानाचे विडे पळवून आणायचा. त्याच्या बापानं हॉटेल उघडलं. त्यामुळे हॉटेलातच रमला.

शि-या - सदाचा मित्र, याला देखील यंत्रवाल्याचा खूप राग आलेला असतो. हा सदाबरोबर देवीच्या देवळात खेळला. हा शि-या आपल्या बापाच्या डबीतनं चुना लंपास करायचा. शि-याच्या बापाचा पाहुण्यापैचा लागाबांधा कुठं कुण्या गावात लागला. शि-या पाहुणा झाला.

नु-या : सदाचा मित्र. नु-या सुध्दा तुळजेच्या देवळाच्या कणाकणाशी एकरुप झाला होता. येथे त्यांनी लपंडाव मांडले, नु-याच्या बापानं माडीचं कंत्राट घेतलं होत. नु-या तिथचं आंब्या फणसाच्या नगरीत राहिला होता. नुरा ट्रकवर एकदा सदाच्या समोर येतो परंतु सदा त्याला ओळखू शकत नाही. कारण तो नुराशेठ झाला होता.

वैजू :- वैजू ही धनगराची मुलगी होय. ती सुंदर, छोटुकली तिच्या जीभेत लयबध्दता होती. वाणी मोहिनी घालणारी, वैजूनं सदाला पाटीवर सरस्वती काढून दिली. वैजूची आठवण झाली की सदा तिनं पाटीवर काढलेली सरस्वती बघत राहतो. सदाला वैजूची सतत आठवण येत होती. तो आपल्या मनात वैजूची मूर्ती सारखी बघत असे. सदाला वैजू परत भेटत नाही. जेव्हा भेटते तेव्हा ती दामूची पत्नी झालेली असते.

सलमा :- रझियाम्माची मुलगी, गो-या गालात खुदकन हसणारी सलमा टारगट पोरांशी बोलते. हे रझियाम्माला आवडत नसे. सलमा खाणीवर कामावर येते. आणि पहिल्याच दिवशी काळया चष्म्यातून आलेला खाणीचा मालक त्याच्याकडे पाहाते. हा खाणीचा मालक पगारापैक्षा सलमाला जास्त पैसे देतो.

सदा तू फार आवडतोस म्हणणारी सलमा, आपल्या जन्मदात्या आईला देशोधडीला लावून रंगेल दुनियेत रंगणारी नटेल सलमा, सा-या वस्तीला दगडाचं पीठ खायला लावणा-या काळया चेष्म्याशी लगटून चालणारी थिल्लर सलमा ही एक मायावी स्त्री आहे.

तुकाआबा :- एक छान पात्र वारकरी संप्रदायाचे प्रतिक आहे. आदरणीय असे त्यांचे व्यक्तिमत्व आहे. तो सर्वांना मदत करतो. यांचा देवावर फार विश्वास आहे. (पृष्ठ 14)

तुकाआबा विठोबाच्या वारीला गेलेला असतो. तो परत आला तेव्हा पोलीस त्याच्यावर तुम्हीच वगळातल्या बाईचा खून करुन बेपत्ता झालात असा अरोप करतात. अशा प्रकारे तुकाआबास बंडयाच्या पुढे नमते घ्यावे लागते. हा ग्रामीण संस्कृतीचा पराभव होय.

श्रेष्ठास कनिष्ठाकडून स्वीकारावा लागणारा पराभव मन उद्विग्न करतो. चीड निर्माण करतो.

तुकाआबाने सदाला खाणीवर कामाला लावले. कासारणीची लेक बांळतपणास आली तेव्हा तुकाआबानं पालखीतले देव काढून तिला पालखीत बसवून तिला दवाखान्यात नेण्यास सांगितले.

जोशाचा नाना :- नाना ज्योतिष पाहाताना पंचागात मग्न होत. माणसांच मन शोधात

सा-या माणसांची नशिबं नानाला दिसतात. कासारणीची मुलगी रडायला लागते. तेव्हा देखील नाना पंचाग उघडतात.

कासारीण :- कासारणीची मुलगी बांळतपणाला आलेली असते. आणि गाव उठलेला असतो. तिला या माळावर आणलेले असते. कासारणीला या मुलीशिवाय दुस-या कुणाचाच आधार नसतो. व तिची मुलगी या बांळतपणात मेल्याचं कळल्यावर तिच्या डोक्यावर परिणाम झाला. व ही कासारीण सदाच्यानानानं माझी मुलगी मारली असे म्हणते.

कासारीण नव-याच्या मृत्यूने दुबळी, हळवी झालेली. त्यात मुलीच्या मृत्यूने कासारणीचं कोवळं मन करपून गेलं.

रझियाम्मा :- सलमाची आई, रझियाम्माला सलमाचे वागणे आवडत नाही. ती टारगट पोरांशी बोलते म्हणून रझियाम्मा तिला मारते. सलमाच्या नखरेल वागण्याने सा-यांची नजर कुत्सितपणानं रझियाम्माकडं पाहू लागली. चंदू मोकाशाने सलमाला नेली तेव्हा रझियाम्मा आरडली-ओरडली. तुळजेच्या देवळात जाऊन झिंज्या आपटल्या. धुपारतीतला, अंगारा उधळला. एक दिवस रझियाम्मावस्ती सोडून कुठं गेली ते कळलंच नाही.

जना आत्या :- सलमा व सदा दोघे फिरायला गेली असता सगळीकडे शोधाशोध होते. सलमाला पाहिल्यावर चंदू मोकाशीची जना आत्या म्हणते.

'बरं झालं घावली कार्टी. मला वाटलं, कुणी पळवून नेली का पळून गेली कुणासंगं'. (पृष्ठ 95).

या जनाआत्याच्या बोलण्यानं सदा चरकला.

राघू कुंभार :- सशाला चांदण्यारात्री वाघर लावून सशाचं चांदण खांद्यावर टाकून येणारा हा राघू कुंभार, राघू कुंभाराला हातातल्या पानाच्या देठाला नख लावत असल्याचा भास झाला. राघू कुंभाराची मडकी कच्ची ठरली. तिठ्ठयावर पानपट्टीचं दुकान खोललं. पानाला चुना लावू लागला त्याचा संसार रंगला.

रतन भंडारी :- साळींदराचे काटे अंगभर झेलून रक्तबंबाळ होणारा रतनू भंडारी हे एक पात्र आहे.

लखुळा भजन्या :- भल्याभल्यांना भजनात हरवणारा हा लखुळा भजन्या, याने सदाच्या आईला चूल पेटवण्यासाठी चार काटक्या दिला. तो म्हणतो, चूल पेटवून चहा तरी कर.

काळा चष्मेवाला :- हा दगडखाणीचा श्रीमत मालक असतो. तो आपल्या श्रीमंतीचा गैरवापर करतो. समाजात असणा-या गरीब, अनाथ मुलीबरोबर अनैतिक संबंध ठेवतो हा अत्यंत नीच दुष्ट..... जनावर आहे, जनावर !

याने अनेक स्त्रीयांना जीवनातून उठवले असते. तीन महिन्याच्या बाळंतीणीवर देखील त्याने बळजबरी केली होती.

चंदू मोकाशी :- खाणमालकाला मिळालेला माणूस. चैनी वृत्ती, व्यसनी व स्वार्थी, दुवर्तनी असं हे पात्र आहे. म्हणून तर त्याने सलमाला नेली. तिला पुढं करुन चंदू मोकाशीनं कारखान्यावरची सगळी कंत्राट मिळवली, तुकाआबासारख्या बापाला हा जुमानत नाही.

अलिकडच्या संस्कृतीचा प्रभाव दर्शवणारे हे एकपात्र आहे.

दामू :- हा ट्रक ड्रायव्हर घरची गरीबी. पोट भरायला बाहेर पडलेला. तो रात्री घरी जात नसे. तेव्हा मालकाचे चाळे त्याला सहन होत नाहीत. इंजिन चालविणारा दामू उघडया डोळयांनी सारं बघून आतल्या आत चडफडे. एक दिवस दामू सदाला खाणीवर न्यायला येतो. सदाला संध्याकाळपर्यंत थांबवून घेतो. एक निळीगाडी येते. बाईची व बाटलीची पार्टी असते आणि काळा चेष्मा..... व कारखान्यावरचा फौजदार आलेला असतो.

दामू हा सदाला सा-या सुखदु:खावरचा इलाज दारु आहे असे म्हणतो. हा दामूच सदाला आपल्या ट्रकवर कामाला ठेवतो. आणि त्याची पत्नी वैजू तीच सदाच्या मनातली स्त्री असते.

लमाणी कुंटुंबे :- लमाण्याच्या देखत त्यांच्या पोरीचा हात काळाचष्मा धरतो. नाही तर त्याच्या बायकोला ओढतो, विरोध केला तर बंदुकीची नळी छातीला लागे. सा-यांना जरबेत ठेवी.

ज्याच्या मनगटात ताकद असेल तो माळ सोडतो, ज्याला जमत नाही तो मुलबाळ जागवत इथचं राहतो.

एकदा तीन महिन्याच्या लमाणीनं बांळतीणीला दामूला बोलवायला सांगितले. तो मोकळा आलेला पाहून काळा चष्मावाला स्वत: गेला व त्या तीन महिन्याच्या बाळंतीर्णीला ओढत फरफटत बाहेर आणली. नव-याच्या डोळयादेखत त्यानं तिला खोलीत ओढली. लमाणी त्तसल्या रात्री टाहो फोडून रडत होती. प्रतिकार करणा-या नव-याचं हातपाय लुळं पडलं.

तीन महिन्याची बाळंतीण कोंडलेच्या खोलीत आकांत करीत होती. धडपडत होती.

पोलीस - फौजदारानं नानाच्या वाढलेल्या दाढीकडं पाहिलनी एक दांडकं पाठीवर हाणलं. सा-याना जाळीच्या निळया गाडीत पोलिसांनी कोंबलं.

पोलिसांनी बेवारशासारखी ससेहोलपट वस्तीवरच्या माणसांची केली. ज्यांना ज्यांना नेलं होतं त्यांना पोलिसांनी बेदम मारलं होतं.

दुस-या दिवशी पुन्हा तीच पोलीस गाडी येते व सदाच्या दारावर थाप बसते. सदाला पोलीसानी नानाला मारलेला दंडुका आठवला. पोलीसांनी सदांच्या बकोटयाला धरुन हिसका मारला.

पोलीसांनी निनावी पत्रावरुन वस्तीनचं खून केलाय असं गृहित धरलं. व त्यांना मारहाण केली.

गोपू :- सदाचा लहान भाऊ नाना म्हणतात की गोपू जन्माला आला व घराचा विस्कोट झाला, तो जन्मला व धरण बांधण्याची आवय आली. त्याला नाना पांढ-या पायाचा म्हणत. तसेच त्याचं डोळ कवडं होते. त्याला मामाच्या गावी पाठवला.

**कादंबरीतील प्रसंगाची योजना :-**

नागनाथ नायकवडी, दत्ता देशमुख या लोकांनी धरण व धरणग्रस्तांचा प्रश्न तडीस नेण्याचा प्रयत्न केला आहे त्याच प्रमाणे 'झाडाझडती ही कांदबरी विश्वासराव पाटलांनी याच विषयावर लिहिलेली आहे. मात्र त्याआगोदर देवाची साक्ष ही कादंबरी प्रा. नलगे यांनी लिहिलेली

आहे. त्यानी स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रामीण वास्तव जीवनाचे सखोल दर्शन देवाची साक्ष या कादंबरीतून केले आहे. यामधील कुशीचा मृत्यू मनाला विकल करुन सोडणारा आहे. क्रुरतेचे प्रतीक म्हणून हा मृत्यू घडून येतो. यासाठी स्वातंत्र्योत्तर काळात समाजाचे रक्षण करणा-या लोकांनीच क्रुरतेला विरोधकरण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे असे प्रसंग या कांदबरीतून दर्शविण्यात्त आले आहेत.

सदाला वरच्या मांळगीच्या माळावर फासपारध्यांची पालं पडली होती. तो आठवला. पालं पडली की मुलांना खूप गंमत वाटायची, सगळी पालाभोवती गोळा व्हायचे. विशा त्यांच्या कुत्र्याचा ताणपट काढायचा तिच्या लहान लहान मुलांना खडे मारायचा डिवचायचा. नु-या तर मोठया माणसानाही दगड मारायचा. पोर घायकुतीला यायची. रडायची, भेकायची, फासपारधी रागानं पाठी लागायचे, कंझारभाटाच्या पोरीचं गोल झगं जंमतीचं वाटायचं.

सूक्ष्म निरीक्षण आणि त्यास जीवन विषयक तत्वज्ञानाचा आधार आहे.

उत्सुकता टिकविण्यात या कादंबरीला यश आले आहे. कोकणातील उंच डोंगर, खोल द-या, निळे आभाळ, सांजसावल्या नजरेसमोर येत. मन वानरांच्या बरोबर झाडाझाडावर उडया मारी. हुप्पहुप्प करुन वानर बने. लालगरद उंबरावरचा पोपटांचा थवा निळया आभाळात उडवी.

एखाद्या नितळ कातळावर बसून फेसाळणा-या ओढयाच्या खळखळ पाण्यात पाय हालवत राही. विशाची बासरी द-याद-या घुमवत राही. पानापानातनं झरणारं चांदण मनफुलवी. मन म्हणजे चिवचिव चिमण्या बने.

सदा एकदा सहज माळामाळानं डोंगराच्या बाजूला गेला. दूर नजर टाकली तर चंदू मोकाशीचं कुत्रं तिथं अवती भोवती उगाच फिरताना दिसलं. तिथं भंयकर घडलेल पाहून तो जोरानं किंचाळला. घाम फुटला, भीतीचा काटा सरसरला, घरांकडं धूम पळत सुटला. घरात आला नी धापकन पडला. दातखिळ बसली. थंडी वाजून ताप आला. आईनं देवापुढचा अंगारा लावला. नंतर सदा सांगतो, त्या वगळत एका बाईचे मढं आहे. कुणी तरी बाईचा खून केलाय यामुळे वस्तीच्या वस्ती संकट आल्यासारखी गप्पगार झाली होती.

वस्तीला गावाचं गावपण नव्हतं. जिव्हाळा नव्हता. एक उपरेपण सारखे टोचत राही. डोंगरा डोंगराची नाती इथं तुटली होती. नवी निर्माण होत नव्हती. कुणी जवळ घेत नव्हतं. उपरे म्हणून आसपासचा मुलुख आमच्या वस्तीला हिणवीत होता.

मन रमावं असं या रखरखीत माळावर काहीच नव्हतं. एकदा तुका आबा म्हणाले, 'या माळावर टाकण्यापेक्षा आम्हाला तुरुंगात डांबलं असतं तर सुखांन जगलो असतो. माणसा माणसांच नातं तरी तुटलं नसतं.

बालवयातील अनुभवांची प्रौढपणी मांडणी करताना आलेले तत्वज्ञान, समाजातील लोकांची वागण्याची पध्दती तसेच बालपणीच्या अनुभवांची बालीशता, निरागसता कमी करते. व त्यामुळे त्या प्रसंगातील सौंदर्य व कारुण्य यांना मारक वाटते.

परिस्थितीचे चटके सतत सहन करावे लागतात. व त्या परिस्थितीला सामोरे जाताना त्यातील कारुण्य आणि त्यातील सलगता यामुळे वाचकांचे मन उद्विग्न बनविते.

देवाच्या साक्षीनं घडलेलं हे नाटय शेवटी देवाच्याही नशीबी येते. देवालाही गाव सोडून माळावर जावे लागते. काही नको त्या बाबीही देवाच्या साथीनं घडतात. ज्या काकाला सदानं बाप मानलं त्यांच्या मुलीनं घरात कुणी नसताना देव्हा-यासमोरच सदाला मिठी मारली. हे देवाच्या साक्षीनं विपरीत घडलं.

जोशाच्या नानाचा खुळा मुलगा - भोकरीच्या ओढयाकडे आपली वासना भागवण्यासाठी जाताना दिसतो. सदाच्या बालपणात सदाला लैगिंक ओढ फार मोठया प्रमाणात असलेली दिसून येते. त्याला सतत वैजूची आठवण येई. सलमाबरोबर तो मनसोक्त हिडांयचा व या लैंगिक बाबतीत आपण बालीश आहोत असे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

स्त्रीयामध्ये सलमा व वैजू ही पात्रे फार भडक रंगवली आहेत. सलमा ही तर अनेक टारगट पोरांशी बोलत असे. खाणमालकाच्या नादी लागली. चैनी, विलाशी जीवन जगण्यासाठी सलमा चंदू मोकाशाबरोबर पळून गेली.

रोजगार हमी योजनेचे स्वरुप हे दगडखाणीवर काम करणारे लोक व त्यांच्या नशिबी येणारे तिथले जीवन हे फार भयानक आहे. या खाणीवर काम करणा-या बायकांनी आपले सर्वस्व खाणमालकाला अर्पण करायचे, जर त्यांनी तसे केले नाही तर मग तो मालक ते हिसकावून घेत असे. या खाणीवर काम करणा-या लोकांना कष्ट करुन देखील योग्य जीवन जगता येत नाही. लाचारी पत्करावी लागते. आपल्या बायकांवर होणारे अत्याचार मुकाटपणे पाहावे लागतात.

त्याचप्रमाणे ऊस तोडणी कामगारांचा प्रश्न, वनकामगारांचा प्रश्न, तसेच मुंबई कामगारांचे प्रश्न, शेती महामंडळाचा प्रश्न व पाणी प्रश्न या सर्व प्रश्नांचा राष्ट्रीय पातळीवर व्यापकतेने विचार केला नाही. त्यामुळे यातील दाहक वास्तव केवळ नलग्यांना कादंबरीतून सांगायचे नाही. तर याच्या पलीकडचे वास्तव त्यांना सांगायचे आहे.

सदा व त्याची आई, नाना हे माळ सोडून जातात . दोन दिवस व दोन रात्री ते चालत होते व शेवटी ते एका देवळात उतरले व तिथचं त्यांची झोप लागली. सकाळी एक वयस्क, गंध लावलेला माणूस सदांला व आईला उठवत होता. ऊठून पाहिले तर नाना नव्हता. तो परत सर्वांना सोडून गेला होता. आईनं नानासाठी टाहो फोडला. त्या वयस्क गृहस्थाने मायां - लेकरांना आधार दिलां, त्यानं घरच्यासारखी माया केली. मुलासारखं सांभाळलं. आई त्यांच्या घरातील कामे करु लागली.

सदा त्या देवभोळा माणसाला काका म्हणू लागला. आई काकाशी एकरुप झाली. आईच्या हाताने त्या घरातले देव मांडले जाऊ लागले. काकांनी आईच्या गाठोडयातील देव आपल्या हातांनी आपल्या देव्हा-यात देवाच्या पंक्तीत बसवले. पण त्या देवानांही सुख पाहवलं नाही.

एकदा सांयकाळी देवदर्शनासाठी आई देवळात गेली होती. परत आली ती धावतच .... बेशुध्द पडली. ती शुध्दीवर आली तेव्हा ख-या अर्थानं तिची शुध्द गेली होती. डोक्यावर परिणाम झाला होता. तरी काकाच सदापेक्षा हमसून रडू लागला. देवाने इथं देखील साथ दिली नाही. ज्या बाईचा नव-यानं आयुष्यभर संशय धरला त्या बाईला परक्या माणसाचा आश्रय घ्यावा लागला. नियतीतनचं तिच्या वाटयाला आणलेले हे दु:ख आहे.

**कादंबरीतील विषयलोकापर्यंत पोहचविण्यासाठी योजलेल्या युक्त्या :-**

कुशीचा मृत्यू उपासमारीनं झाला. या उपासमारीत किती प्रमाणात भयानकता दिसून येते. हे कुशीच्या मृत्यूमुळे दिसते.

कोकणातला अप्रतिम - निसर्ग तसेच माळावरचा वैराण भाग यामुळे देखील लोकांना विषय समजतो. कोकणात असताना सर्व फळे मनसोक्त खायला मिळत होती.

धनगराच्या वैजूनं सदाला दिलेला लाकडी रंगीत पोपट यामुळे सदाला नेहमी वैजूची आठवण होते.

देवाचा पाळणा व रंगीत पोपट या दोन्हीमुळे सतत जुने प्रसंग आठवतात.

देवाच्या साक्षीनं जे घडतं ते घडायला नको होतं.

विटीदांडूच्या माळावर पाच पांडव देखील खेळले. व हा विटीदांडूचा खेळ खेळताच डाव जिंकला. वनवासाच्या काटयावरनं देव देखील चालत गेले.

चैत्री पुनवेला भंडारा व्हायचा, रामनदीचा सगळा खोरा गोळा व्हायचा, अपंरपार जत्रा भरे. जाळयाजुळयातून डोंगरा-कणगारातून माणसं तुळजेच्या रोखानं उतरत. नटली थटलेली जत्रा डोळयांचे पारणं फेडी.

एक मन उल्हासित करणारा कापरी गंध तुळजेच्या आवारात दरवळत राही.

माळावर बांधलेलं तुळजेचं देऊळ ..... जत्रा .....अधी माणसं ...... अशी लाग्याबांध्याची नाती.

माळावरच बांधलेल हे देऊळ देऊळच वाटत नव्हतं. देवळातील तुळजा तुळजाच वाटत नव्हती.

श्रीमंत वर्ग हा गरीब स्त्रीयांना आपल्या वासनेचा बळी करुन घेतो. त्या स्त्रीयांवर अत्याचार करतो. तसेच तो या स्त्रीयांना जास्त पगाराचे पैसे देई.

मन रमायला देखील माळावर काही नव्हतं. वानरांचा कळप आल्यापासून मात्र त्यांच्या पाठीमागे सदा धावे, वानरांचा कळप दिवसा गावात उतरे. रात्र झाली की वरच्या टेकडीवरच्या पिंपरणीवर आस-याला जात. ते शिखरावरचं टोपीवालं पिलूही आलेलं होतं. पण ते पहिल्यासारखे माणसाच्या जवळ येत नसे. माणसांना ते बुझत असावं. कदाचित माणसावरचा त्याचा विश्वासही उडालेला असावा.

तुकाआबा हा वारकरी असून सुध्दा समाजात वावरत असताना तो अनेक कठीण प्रसंगाना तोंड देतो. त्यातून नवीन मार्ग काढण्याचा प्रयत्न करतो.

**कथानकाचा वाचकावर होणारा परिणाम :-**

ज्याचा वाली कुणीच नाही त्यांचा वाली म्हणून देवाला साक्षी मानले जाते. 'देवाची साक्ष' हा विषय वाचकाच्या मनावर परिणाम करतो. म्हणजेच देव साक्षीला असताना देखील किती भयानक कृत्ये घडतात. याचे प्रत्यतंर आले आहे. समाजात किती मोठया प्रमाणात भीषणता आहे. याचे स्वरुप या कादंबरीतून समजते.

या कादंबरीत मालक व मजदूर यांचे संबंध कसे असतात हे दाखवले आहे. कारण देवाला साक्षी ठेवूनच समाजात गुन्हे, मारामारी, खून, बलात्कार, इ. प्रकार घडतात.

या कादंबरीचा वाचकांच्या मनावर परिणाम असा होतो की, वाचकाची परमेश्वरावरची श्रध्दा कमी होते. माणसावरचा विश्वास संपतो.

दिशाहीन अगतिक असं हे जीवन आहे म्हणून देवाची साक्ष हे योग्य नाव आहे.

**लेखकाची विवेचनशैली :-**

देवाची साक्ष कादंबरीमध्ये नलगे यांची विवेचन शैली दाहक वास्तवाने ओघवती झाली आहे. तसेच बुध्दिमत्तेमध्ये दाहकता व करुणा तसेच परिस्थितीचा अंदाज घेण्याची ताकद आहे. म्हणूनच नलगे हे उंची व खोली गाठू शकले.

ग्रामीण वास्तव लोकांसमोर आणण्यासाठी तेथेच जन्मलेल्या लोकांनी ते सांगणे आवश्यक आहे.

देवाची साक्ष लिहिण्यासाठी नलगे सारखाचं समाजाची नाळ न तुटलेला लेखक आवश्यक आहे. या कादंबरीमध्ये वेगवेगळया स्वभावाची पात्रे आहेत. आई सोशिक व नाना रागीट आहेत. सदा सतत परिस्थितीला सामोरे जातो. सलमा ही चैनी आहे तर वैजू ही दुस-यांना मदत करणारी आहे. तुकाआबा हा सुध्दा अनेकांना संकटकाळी मदत करतो.

सलमा ही विकाराच्या आहारी गेली आहे. पैशासाठी ती स्वतः विकते. वासना या तिच्या अतिशय प्रबळ आहेत. टारगट पोराशी ती सलगी ठेवते.

गावात धरण होणार असते. व त्यामुळेच गावातील लोकांना उठवून माळावर पाठवले जाते. त्यामुळे यंत्रवाले व गावातील लोक यांच्यात वैर निर्माण होते.

या कादंबरीत लेखकांनी ग्रामीण संस्कृतीची काही खास वैशिष्टये आणली आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने कोकणी संस्कृतीची वैशिष्टये, तेथील रानमेवा यांचे दर्शन झाले आहे.

नलगे यांनी स्थलांतरामुळे त्या ग्रामीण संस्कृतीवर घडणारे प्रहार कसे तीव्र असतात. अनेक संकटातून त्यांना जावे लागते. परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी दारिद्रय व याचमुळे संघर्ष करण्यात येणा-या मर्यादा व शेवटी श्रीमंतीच्या माजामुळे संस्कृतीची विनाशाकडे होत असलेली वाटचाल नलगे यांनी देवाची साक्ष यामध्ये रेखाटली आहे. यातून त्यांची परिणामकारक विवेचन शैली स्पष्ट होते.

**कादंबरीचा विषय :-**

प्रा. चंद्रकुमार नलगे यांची संजय प्रकाशन, पुणे यांनी दि. 4/7/1974 रोजी 'अगीन फूल' ही ग्रामीण कादंबरी प्रकाशित केली. ही कादंबरी त्यांनी प्रत्यक्ष अनुभवलेल्या ग्रामीण जीवनावर आधारित लिहिलेली आहे. स्त्रिया या कशा निष्ठावान असतात आणि त्या एखाद्या प्रसंगी कशा शूरही बनतात. याची ग्रामीण भागातील उदाहरणे पाहूनच त्यांनी ही कादंबरी लिहिली आहे. स्त्री जीवनावर लिहिलेली ही त्यांची पहिली ग्रामीण कादंबरी आहे. सासू व नंणद यांनी सावित्राच्या जीवनात दुःख आणले ती परित्यक्ता होती. पतीच्या खूनाचा सूड उगवणा-या एका पतिव्रतेचे चित्रण या कादंबरीत आढळते. वारणा खो-यातील ग्रामीण भागाचे जीवंत, धगधगते चित्रण आगीनफूल या ग्रामीण कादंबरीतून दिसून येते.

या कादंबरीचे कथानक सुडाच्या भावनेने पेटलेल्या सावित्राच्या भोवती गुंफलेले आहे. एखाद्या फुलाप्रमाणे कोमल, नाजूक असलेली सावित्रा अंगावर प्रसंग येताच 'अगीनफुल' बनते. आणि आपण घेतलेली सुडाची प्रतिज्ञा पूर्ण करण्याचा प्रयत्न करते. असे हे धगधगते, मृत्यू हातात घेऊन जगणा-या जीवणाचे चित्रण या कादंबरीतून करण्यात आलेले आहे. या कादंबरीतील कथा आहे एका हळव्या स्वभावाच्या पण मानी आणि कर्तबगार तरुण मुलीच्या दुर्दैवाची स्त्रीने सगळं मनात ठेवाचं असत, भोगायचं असतं, चंदनासारखे जीवन जगायचं असतं, झिजणं, जळणं, उगाळणं हेच खरे तिचे आयुष्य याच विषयाशी निगडीत अगीनफूल ही कादबरी सत्यकथेवर उभारलेली आहे.

**कादंबरीची मध्यवर्ती कल्पना :-**

या कादंबरीचे कथानक सावित्रीच्या घडलेल्या सत्य घटनेवर रेखाटले आहे. या कादंबरीतील सावित्रा आई वडीलांच्या लाडात वाढलेली आहे. तिने निसर्गाशी एकरुप होऊन आपल्या भावी जीवनाची स्वप्ने रंगवलेली होती, आपला संसार सुखासमाधानाने जावा असे तिला मनोमन वाटत असे. असे वाटत असतानाच अचानकपणे एके दिवशी तिचा पती भाना याचा खून होतो, या प्रसंगामुळे कादंबरीला एकदम कलाटणी मिळते. आणि त्यामुळेच ही कादंबरी आकर्षक होत जाते. पतिनिष्ठेमुळे सावित्राची आस्मिता जागी होते आणि तिची सूडाची भावना पेटून उठते, सासू आणि नंणद यांच्या जाचाला कंटाळून माहेरी राहणारी सावित्रा सूड उगवण्याच्या भावनेने नव-याच्या खुनानंतर सासरी नांदावयास जाते. अशी ही जगावेगळी सावित्रा या कादंबरीतून चित्रित केलेली आहे.

पुराणात होऊन गेलेली सतीसावित्रा आणि आजच्या काळातील या कादंबरीतील सावित्रा या दोघीतही पतिव्रतेसंबंधी पावित्र्याचे साम्य आढळून येते. आपल्या पतीवर अलोट प्रेम करणारी पतीसाठी कोणताही त्याग करण्यास तयार असणा-या या कादंबरीतील 'सावित्रा' हे नांव सार्थ वाटते. सूड घेण्याच्या उद्देशाने या कादंबरीतील सावित्रा खांद्याला बदूंक लावून उभी राहते. बंदूक कडाडते आणि या कादंबरीतील खलनायक वेताळ राऊत रक्ताच्या थारोळयात जमीनीवर कोसळतो. त्याचा असणारा साथीदार रतन पाटीलही आपले पाय गमावून बसतो.

अशा प्रकारे या कादंबरीतील कथा सत्यघटनेवर लिहिली गेली आहे.

**कादंबरीतील कथेची रचना :-**

' अग्नीनफूल ' या कादंबरीची सुरुवात मोठी विलक्षण ओढ लावणारी अशी आहे.

या कादंबरीतील पहिल्या भागात कोर्टात घडलेला प्रसंग सावित्राचे वडील तिच्या आईला सविस्तरपणे सांगत असलेला चित्रित केलेला आहे. पाटील कोर्टातून आल्यावर त्यांची शांत प्रतिक्रिया पाहून पाटलीनीच्या पोटात धस्स झाल. ती शांतता तिला सहन होईनाशी झाली. मग म्हातारी म्हणते संध्याकाळ होत आली. आणि तुम्ही असे गप्प का बसलायसा ? तेव्हा पाटील म्हणाले कंटाळा आला होता म्हणून बसलोय सहजच. आपल्या मनात चाललेली गोष्ट लपवण्याचा पाटील प्रयत्न करत होते. नंतर पाटील म्हणतात की, 'कधीच तालुक्याची वाट माहीत नव्हती पण या पोरीच्या पायात खोट घालणं आलं.' नंतर पाटील आपल्या मुलीला ऐकू न जाईल अशा स्वरात पाटलीनीला म्हणतात की पोरगीच्या नशिबी नको ते आलं परत म्हातारी विचारते तुम्ही गेलेल्या कामाचं काय झालं ? तेव्हा पाटील म्हणतात, मुलीलाच विचारा म्हणून, पाटील कोर्टात आपल्याला वकील बोलावेल म्हणून बराच वेळ वाट पहात असतो, खूप वेळानंतर शिंदया वकील बाहेर आला या वकीलापुढ सगळ कोरट हादरतय. नुसत वकील म्हणत होता की, सावित्रान सोडचिठ्ठी घ्यांवी, याबद्दल जेव्हा सावित्राला विचारले जाते तेंव्हा ती याबद्दल नकार देते, खरंच स्त्री ही आपल्या पतीला परमेश्वर मानते, सर्वस्व मानते तीच स्त्री आपल्या पतीला सोडचिठ्ठी कशी देईल. वकील म्हणतो, सोडचिठ्ठी घ्यायची नाही तर पोटगी मागायची का ? तेव्हा हीच स्वाभिमानी सावित्रा म्हणते की मी तुम्हाला फार जड झाली असेल तर विहिरीत ढकलून द्या, मी तुमच्याकडे राहून पुरुषाप्रमाणे सर्व कामे करीन माझा भार मी तुमच्यावर कधी पडू देणार नाही व माझे मला

जगण्याचा जेव्हा कंटाळा येईल तेव्हा मीच स्वतः माझ्या हाताने आपल्या गळयात धोंडा बांधून विहिरीत उडी घेऊन माझे जीवन संपवेन. वडिलांना मात्र आपल्या मुलीचे शब्द ऐकून काळजाला पाझर फुटतो. सावित्रा सोडचिठ्ठी घेणार नाही म्हणते, कारण ती आपल्या पतीला परमेश्वर मानते. तोच जन्माचा धनी असे मानते , त्याच्या नावानं एकदा मणी मंगळसूत्र बांधले ते कायमचेच. नवरा मला नेवू दे किंवा जरी नेले नाही तरी मी त्याच्या नावान हक्कांन कुंकू लावीन आणि असे जीवन जगण्यातच आनंद मानीन. सावित्रा म्हणते की सटवीन जे आपल्या दैवात लिहिलं आहे तसेच होईल, या तिळा तांदळाच्या गाठी सतरांदा मारायच्या नसतात.

आईला मात्र आपल्या मुलीचे हे शब्द ऐकून खूप कौतुक वाटते. आपली मुलगी स्वाभिमानी व त्याच मुलीच्या नशिबी असं आयुष्य आलेलं पाहून पाटलीणीला खूप दुःख होते. सावित्राचे बोलणे ऐकूण वकील देखील गप्प झाला.सावित्राला आपल्या नव-याबद्दल कोणी वाईट बोललेलं आवडत नाही. ती खूप रागावते, चिडते. सावित्रा म्हणते, यात माझ्या नव-याचा काहीच दोष नाही तर दोन बायामुळे मला माझे हक्काचं घर सोडावं लागलं त्यात म्हणजे नवरा टाकून बसलेल्या नंणदेमुळेच माझ्या नशिबी हे दिवस आले. तसेच सासूच्या भावाची मुलगी माझ्या पतीला आवडली नाही म्हणून ती माझा राग करते. पण सावित्रा देखील खंबीर मनाने म्हणते मी हे सारं सहन करीन व सीतेसारखे अग्निदिव्य पार करुन दाखवीन. मला माझ्या पतीनं कधीच त्रास दिला नाही. कधी वाईट बोलला नाही. मला कधीच कोणत्या गोष्टीसाठी दुखावले नाही. यातून ती आपल्या पतीवर किती प्रेम करत आहे हे या प्रसंगातून दिसून येते.

सावित्राचा पती आपल्या आईचा व बहिणीचा जास्त विचार करतो. कारण बहिणीने रांडपण विसरुन भावाला लहानाचे मोठे केलेले असते. आणि यांच्या मागे भावकी लागली आहे. यांच्या घराचा नाश करण्याचा सतत भावकी विचार करते तरी देखील माझा पती मात्र माझ्याशी खूप चांगला वागायचा हे सांगताना ती संकोचते नंतर कोर्टात वकीलावकीला मध्ये संभाषण झाले व नंतर ते सावित्राला विचारतात तुला काय पाहिजे तेव्हा सावित्रा म्हणते पोटगी पाहिजे, सोडचिठ्ठी बद्दल विचारताच ती म्हणते की मला जर तोडली, मारली, झोडली तरी सोड घेणार नाही.

सावित्रा म्हणते की मला नांदायचय, त्यांच्या नावासाठी जगायच, ज्याच्या नावान एकदा टिळा लावला तो माझ्यासंगच राहील, तो सरणावरच जळेल. मला कुंकवाच्या धन्याकडून मिळालेली

चतकोर भाकरी सोन्याची वाटेल. एकदा लावलेला टिळा पुसण्यासाठी लावला नाही. इठुबाच दर्शन घेऊन बुक्का लावला की जन्माच सार्थक होत. बुक्का आणि कुंकु यात काय फरक .... ?

असे एका पतिव्रता स्त्रीचे विचार व तिची आपल्या पतीवर असणारी निष्ठा सावित्राच्या बोलण्यातून दिसून येते.

सावित्रा ही जशी साजरी, स्वाभिमानी, दुस-यांच्यावर माया करणारी व माया लावून घेणारी, हसरी तशी ती नाचरी, खुदकन हसणारी, चटकन रुसणारी होती. तिचा घरावर लळा, पानाफुलांवर प्रेम होते. इतरांना ती मदत करी. लेकुरवाळी भिकारीण आली तर तिच्या मनाला पान्हा फुटे. एकदा वानरीच्या पोटाशी तिची पिले चिकटलेली होती, व ती या झाडावरुन त्या झाडावर उडया मारत होती. हे बघून सावित्रा वानरीला शिव्या देत होती.

सावित्रा म्हणते की, वानरा प्रमाणे माणसाला का आभाळ उडी मारायला येत नाही. आभाळ उडींचा अर्थ शोधणारी, आभाळ उडीची चमक डोळयात साठवणारी, माणसाला आभाळउडी का मारता येणार नाही. याचा विचार करणारी सावित्रा दिसून येत. सावित्राचे आई-वडील आपल्या दोन मुलाप्रमाणेच सावित्राला तिसरा मुलगा मानतात.

अशी ही सावित्रा शंभरजणीत उठून दिसेल असा बांधा असलेली. निग्रही - पाणीदार नजर आभाळ उडीच्या टप्प्यात वेध घेणारी-गोलसर देखणा चेहरा असणारी धारदार नाक - लांबसडक केस - त्यातून हळदीच्या अंगाला कळसाचं पाणी मानवलेलं, उफाडयान फुलून आलेली काया तिची. संसाराला अजून सुरुवात झालीच नव्हती. तारुण्यातलं पुरतेपण गवसलचं नव्हतं, स्पर्श करण्या पूर्वीच लाजाळूच्या झाडाला आपली पान मिटवून घ्यावी लागली होती. हाताशी आलेल सुख डोळयादेखत हिरावल गेल होतं. असे तिचे संसाराचे स्वप्न भंगले होते.

लहानपणी इंद्रधनुष्याची कमान पहात असताना सावित्राचा तोल जाणार एवढयात तिला आजगीने धरले तेव्हा सावित्रा विचारते की ही कसलीगं कमान तर आजगी सांगते ही इंद्रधनुष्याची कमान आहे.

इंद्रधनुष्य देवाने केले आहे आणि ते नव-याच्या घरी जाण्यासाठी केलेले आहे. लग्न केल्यावर त्यावरून नव-याच्या घरी जाता येते म्हणून सावित्रासारखी लग्न कर असे म्हणते. या इंद्रधनुच्या वाटेने आपण आपल्या पतीच्या घरी जात आहोत अशी स्वप्न ती रंगविते। तिचे स्वप्न साकार होते. पण लगेचच त्या स्वप्नाचा भंग होतो.

मसळी विकण्यासाठी गेलेल्या आजगीबरोबर सावित्रा पानवाल्यांकडून लिंबू आणायला जाते. तिने घेऊ केलेले लिंबू दुसरा एक जण घेत असतानाच त्याचा स्पर्श तिच्या हाताला होतो. हाच स्पर्श नवऱ्याच्या रुपाने तिला जन्मभर मिळणार होता. या स्पर्शाच्या आठवणीतच तिचे लग्न होऊन ती सासरी येते. प्रथम प्रथम सासू, नंणद सावित्रावर माया करायची पण पुढे कुठले तरी खुसपट काढी, कुभांड रची आणि सासू नंणद तिची हेटाळणी करु लागले. नवरा तर काहीच बोलत नसे. काम भलं आणि आपण भलं असचं तो मानी. सावित्राचे मन मात्र बचैन व्हावयाचे.

एकदा पांदीम पाण्याला जाताना सावित्राला जना भेटते. ती तिला आपल्या वस्तीवर नेऊन बळंबळं खरवस खायला घालते ही घटना तिच्या सासू व नंणदेला कळल्यावर त्यांचे आकांडतांडव सुरु होते. नव-याला ही घटना सांगावी म्हणून सावित्रा त्याची वाट बघते पण तो ऐन जेवणवेळेला येतो. जेवतो जेवणावरुन उठतो आणि घराबाहेर पडतो. या तिघांच्या अशा वागण्याने सावित्रा मात्र वैतागून जायची. आपण एकाकी, एकटे आहोत याची हुरहूर तिला नेहमी वाटायची.

एकेदिवशी पेरवीच्या झाडाला फडक्यात लिंबू , नारळ, तांदूळ बांधलेले पाहून सासू आणि नंणद यांनी ही सावित्रानेच करणी केलेली आहे. असे समजून तिला त्या वाटेल तसा त्रास देऊ लागल्या, आणि अखेर शेवटी तिला अंगावरच्या पातळानिशी घराबाहेर काढतात. अशा प्रकार सावित्राच्या जीवनातील इंद्रधनुष्याची कमान उध्वस्त झाली होती.

बालपणीची सावित्रा कळती झाल्यावर शांत होत गेली. मनालाच शिकवू लागली. ती मानी होती, निग्रही होती, इतरांना ती मदत करी. ती आपल्या मैत्रिणीला देखील स्वत:सारखी कपडे घालायला लावी. आजगीला भेटावे असे सावित्राला नेहमी वाटायचे. सावित्राची आई तर आजगीला जीवाभावाची बहीणच मानत असे, असेच एकदा पाटलीनीच्या घरी आजगी आली असता ती

सावित्रीला एक म्हातारी आणि तिच्या मुलांची गोष्ट सांगते. ती चारही मुले लढाईत मारली गेलेली होती. या गोष्टीतून सावित्राचं मन पाझरुन गेलं. अशीच एकदा सावित्राची आई आजारी असताना आजगीन तिला बरं वाटावं म्हणून एकादश केली. आणि त्या आजारातून ती बरीही झाली. अशी ही आजगी सावित्राच्या चाललेल्या जाचानं कष्टी होत होती. आपल्या आई वडलांच्या घरी असताना सावित्रानं गडी माणसासारखं राबून शेती पिकवली. पाटलाला ते पाहून तिचं कौतूक वाटे. एकदा एका सकाळी सावित्राची मैत्रिण शांती तिच्या घरी आली. ती त्यावेळी पोटुशी होती. पण सावित्रा मात्र आपल्या सासरला पारखी झाली होती. हे पाहून सावित्राच्या आईला खूप दुःख होते. सावित्राची मैत्रिण गर्भारपणामुळे लोभस, देखणी दिसत होती. ही मूर्ती सावित्राच्या आईच्या डोळयापुढून जात नव्हती.

सावित्राचं आयुष्य ही पातळासारखं टांगतं झालं, दिशाहीन झालं आहे. सावित्राच्या जीवनाभोवती पीळ वाढत होते, सावित्रा आपल्या नव-याच भलं चिंतीत होती. कधी सावित्राला उचकी लागली तर तीला वाटायचं आपल्या नव-यानचं आपली आठवण काढली व तिला खूप आनंद व्हायचा, नव-याची आठवण होऊन तिचा चेहरा मोहरायचा.

एकदा एक आंबेवाली दारावर आली ती सासरची निघाली. आंबेवालीच्या पायावर मस्तक ठेवंल, मनोभावाना नमस्कार केला सावित्रान आपल्या नव-यावरील प्रेम दर्शवण्यासाठी आंबेवालीजवळ खोबरं, खारका दिल्या. व आंबेवालीजवळ सांगितले की, माझ्या पतीला सांगा की, माझी कसलीच काळजी करु नका, जीवाला जपा. संध्याकाळी सगळ्यांची झोपण्याची तयारी चालली होती. तेवढयात दारावर थाप पडली दारात सडयावर धनगर उभा होता. पाटलांनं या धनगराला जेवणाचं विचारलं यावर तो काहीच बोलत नाही. हे पाहून पाटील सावित्राला हाक मारुन सांगतो की, पाहुण्याला जेवायचयं. सावित्रा लगेच ताट, तांब्या घेऊन बाहेर येते, जेव्हा त्या धनगराचा चेहरा दिव्याच्या मंद उजेडात उजळतो तेव्हा सावित्राला त्याला कोठे तरी पाहिल्याचे आठवते. जेव्हा सावित्रा मळयातल्या घरात होती तेव्हा अचानक आलेल्या पावसात ती सापडते. पाऊस थांबल्यावर ती घराकडे निघाली, वाटेवरच्या आंब्याखाली आली तर तिथ एक माणूस दातखिळी बसून थंडीने गारठला होता, सावित्राही नवीनच नादांयला आलेली, या परक्या माणसाला हात कसा लावायचा, जवळ तर कोणी नसते, सावित्राच्या मनात दया येते तिने त्याची दातखीळी काढली सावित्रा त्याला आपल्या घराकडे घेऊन

येते, हे पाहून सासू नंणद रागानं सावित्राला बोलतात, सावित्रा म्हणते, रानात शुध्द जाऊन पडला होता म्हणून मी त्याला घरी आणले सासू नंणद मात्र त्या माणसाला चोर समजतात. व त्याला आपल्या घरी आणल्याबद्दल सावित्राला रागावतात. सावित्रा मात्र मनात ठरविते की, या माणसाला आपण ठेऊन घ्यायचा असा विचार करत ती त्याला शेकण्यासाठी चगाळा घेऊन सोप्यात येते तर तो तेथे नव्हता, आणि तीच व्यक्ती आज अचानक अवेळी उबंरठयातून आत आली होती. तो धनगर मुकाटपणे पाण्याच्या घोटाबरोबर भाकरीचा तुकडा खात होता.

पाटील धनगराला विचारतात कुठे गेला होता तेव्हा तो म्हणतो. पालीला-खंडोबाच्या जत्रेला गेलो होतो. हे ऐकून सावित्राच्या मनात अनेक विचार थैमान घालतात आणि सकाळी धनगर कोणाला न विचारता भंल्या पहाटे निघून जातो. मात्र मागे भंडा-याची पुडी ठेवून जातो. या सा-या गोष्टीचा अर्थ मात्र सावित्राच्या लक्षात येत नाही. आपलं मन कोणाजवळ तरी मोकळ करावं म्हणून सावित्राला आजगीची तीव्रतेने आठवण झाली. सावित्रा आजगीच्या घरी जाते तेव्हा त्याच्या दारातील घडाला केळीच केळी एकमेकांच्या कुशीत बसलेली, हे सावित्रा कौतुकाने पाहते, लेकुरवाळी केळ किती छान दिसतीय, ज्याप्रमाणे पोरांना जन्म देण्यातच स्त्रीच मरण असतं. केळी एकदा व्याली की पुन्हा तिचा जन्म उरत नाही. पण एवढया त्यागातच ती आनंद मानते. ती दुस-यासाठी जगते. केळ पाहिली की तिच मरण सावित्राला दिसे.

सावित्राची खाण्यापिण्यावरुन वासनाच उडाली होती, मनाला उदास वाटत होत, कामात चित्त लागत नव्हतं. त्यामुळे सावित्रा आजगीची वाट पहात होती. तेवढयात बाहेरचा दरवाजा वाजला, सावित्राला वाटलं आजगीच आली, पेंगुळपाहुणा निघाला की पाहुणा येतो यावर सावित्राचा विश्वास होता व तसेच झाले. दरवाजातून एक माणूस आत आला, हातात काठी, खांदयावर धोतर, पागोट, बुटक्या बांध्याचा माणूस सावित्रान पाहिला व तिची निराशा झाली तो घरात आला पण गप्प बसलेला पाहून सावित्राच्या आईला काळजी वाटू लागली. तिने विचारले कोणत्या गावचे पाहुणे आहात तेंव्हा त्यानं सांगितलं इराच्यावाडीच हे ऐकून सावित्राचं मन फुललं, तिच्या मनात नव-याच्या विचारान उत्साह आला. परंतु त्या माणसाचा चेहरा पाहून सावित्राच्या मनात अनेक विचारांची गर्दी झाली. तो गप्प बसलेला पाहून सावित्राची आई पाहुण्याला म्हणते पाणी-बिणी हवय का ? तेव्हा तो

म्हणतो नको, लगेच मला परत जायचंय. हे ऐकून सगळयांना भिती वाटली नंतर बाहेरुन पाटील आले. त्यांनी पाहूण्याची विचारपूस केली. पाहुणा घाबरत घाबरत मनाचा निश्चय करुन म्हणतोय की सांगावा घेऊन मी आलो आहे. नंतर पाहुणा मन घट्ट करुन सांगतो, की तुमच्या जावयाचा साऊबाईच्या नव-याचा खून झाला आहे. हे ऐकून सावित्रा मोठयाने किंचाळली, सावित्राच्या आईबापाची अंतःकरण पिळवटून निघाली. सावित्राच्या मनाचा आधार निखळला, सावित्रा त्या दिवसापासून मुकी झाली होती, कामावर तिचे लक्ष नव्हते. सावित्राचा उरला सुरला आधारही नाहीसा झाला होता.

सावित्राचे मंगळसूत्र तोडताना हंबरडा फोडला. कुंकु पुसताना सावित्राची दातखिळी बसली शुध्द गेली. सावित्राचं जीवनच उजाड बनलं. दैवानंच सावित्राचा छळ मांडला होता, कुंकवासाठी सावित्रानं जीवाचं रान केलं पण तेच काळानं पुसून टाकलं. सावित्रा फटफटीत झाली. तिचं स्वप्नरंगी इंद्रधनुष्य दैवानं उध्दस्त करुन टाकलं होत.

आजगी आली पण सावित्रा नुसतचं तिच्याकडे चित्रासारखी पाहत होती, आजग्याक्का म्हणत सावित्रान तिच्या गळयात पडून हंबरडा फोडला. सावित्राचा नवरा, साधा, सरळ, शांत, अबोल, कारणापुरतं बोले, बोलायला लागलं की मनापासनं बोले. तो कुणाचे मन दुखावत नसे, सोशिक होता.

मालगाव इराच्या वाडीपासून मैला-दोन मैलावर वसलेलं होतं. तिथ माळावरच अवसपुनवेला पलितं पेटलेली दिसायची भुतांची पालखी मध्यानरात्रीला निघायची. त्या पालखीचा गोंडा तोडून आणला की त्याच्या जन्माच कोटकल्याण होत असे, आसपासच्या पंचक्रोशीत मानत. भैरवांचा, वेतांळाचा नाच त्या माळावर बघण्यासाठी तिथे अनेकांनी अवसा जागवल्या होत्या. सा-यानांच त्या वेताळांनी चकवलं होत. मालगावचा वेताळही या गोष्टीला अपवाद नव्हता, वेताळ म्हणजे संभाचा अवतार. वेताळा ..... राऊत त्याचं आडनाव. मालगावच्या रयतसेवा संघाचा अध्यक्ष. एकेकदा बोलला की काळजात चिरुन ठेवावा असा वाटायचा. याच बोलण्याला सावित्राचा नवरा फसला, गुंतला. गुंत्यात अडकला. वेताळ रावतानं सावित्राचा नवरा भानुदास यांच्यावरच सगळं सोपवलं होत. भानाला त्यानं विश्वासात घेतलं होतं. भानाचा शब्द तो मानत असे. भाबडा भाना वेताळा-राऊत याच्यावर विस्वासून राहीला. एकदा तर मालाच्या विक्रीतून आलेले दहा हजार रुपये आता आणून देतो म्हणून

नेले ते नेलेच त्या उचलीवर वेताळाची अध्यक्षाची सही नव्हती. वेताळाने मुद्दामच सही केली नव्हती. वेताळाने भानाच्या अबोल वागण्याची संधी घेतली.

वेताळाने जेव्हा पैसे घेतले आहेत हे नाकबूल केल्यावर व वेताळ उफराटी भाषा बोलू लागल्यावर भाना भांबावून गेला. सर्व उचल भानाच्या नावावर राहीली. भाना चिडला. त्वेषाने पेटला. दोघांत तेढ वाढली.

सत्प्रवृतीनं वागणा-या भानाला ते असहय झालं. भाना आतल्या आत जळत राहिला. आपल्याबरोबर घरातील इतरांच्या जिवाची होरपळ नको म्हणून तो मागमूसही लागू देत नव्हता. जप्ती, हातकडया त्याला भेडसावू लागल्या. भानाच मन बंड करुन उठल, आतापर्यंत खपवल, खपवून घेतलं. आता सहनशीलतेच्या पलीकडे गेल होतं. माणुसकीचाच गळा घोटला गेला. भानाच मन उसळून गेलं.

एक महिना गेला नि एक नवी कोरी जीपगाडी उधळत मालगावात शिरली. वेताळाच्या दारात थांबली. ती जीप आपल्या काळजाच्या चिंधडया उडवून जात आहे. असा भास भानाला झाला भानाला वेताळा राऊत म्हणतो. की तू जशी रक्कम खाल्ली तशीच भरली नाहीस तर अफरातफरीचा दावा लावीन. यावरुन दोघांची, भाना-वेताळा राऊत यांची बाचाबाच झाली. यातूनच वैर सुरु झालं. धमक्यावर धमक्या वाढल्या, बंदुका फिरु लागलया. भानाचा जन्म आगीतच झाला होता. त्यामुळे त्याच्या बालपणीच आग उरात डसली होती. विस्तवाशी भानाचं नातं मिळतं जुळतं होत.

एक दिवस रात्री त्यांच्या घरी पोलीस आले. तसा भाना घाबरला पंरतु येईल त्याप्रसंगाला तोंड देण्यासाठी भाना सिध्द झाला. पोलीसांच्या वेशात आलेली माणसे पोलीस नव्हती पण भाना त्यांच्या वेषाला फसला. व तो घरातून त्यांच्या बरोबर बंदूक न घेता घराबाहेर पडला. व याचं पोलीस वेषातील माणसांनी भानाचा खून केला. बंदुकीच्या बारांचा आवाज ऐकून माने पाटलांच्या वस्तीवरील माणसं ओढयाकडं धावली. भानाला रक्ताच्या थारोळयात पाहून घाबरली. शेवटच्या घटकेला भानाला काहीतरी सांगायचं होत. शेवटी तो 'सावित्रा ' असे म्हणाला व प्राण सोडून गेला.

महार म्हणजे तो पाहुणा सांगतो की, सावित्रा तुमच्यात भानाचा जीव गुंतलाय तो पुढे. म्हणतो याच्या मागं आणखी बरचं रामायण आहे पण जाताना तुमचं नाव घेऊन पापण्या मिटल्या त्यानं.

सावित्रान आपल्या पतीकडून जोतिबाच्या जत्रेचा बुक्का लावून घेतला होता आणि आता देवानंच तिच कपाळ उघडं पाडल होतं. ज्याच्या नावानं कपाळभर कुंकू लावायचं तोच दूर गेला होता. कर्ता पुरुष हिरावला गेला. ही बातमी ऐकून मायलेकींनी आकांत केला. वंशाचा दिवा विझला आपली कूस उजवली नाही याबद्दल सावित्राला वाईट वाटलं. संसार न करताच आपण वांझ ठरलो. सा-यांपासून वंचित राहिलो. एका आशेच्या धाग्याला धरुन आग गिळीत राहिलो. तेच खाक झालं. असहाय्य झालेल्या घराची दीनवाणी कळा तिच्या अंतःकरणात कळा पेटवू लागली. ती स्वतःला विसरली. स्वतःच दुःख तिनं दाबून टाकलं, जीवनाला व्यापून टाकणा-या घराला वेढून टाकणा-या अंधाराला तुडवीत सावित्रा देवघरात गेली. नव-यानं दिलेली बुक्याची पुडी व धनगरानं ठेवून गेलेल्या भंडा-याच्या साक्षीनं घराण्याचं भल चिंतिलं होत. सावित्रीनं दोन्ही पुडया देवाला माखल्या. एका करारानं तो बुक्का मळवटावर माखला, भंडारा ल्याली. तिच ते वागणं पाहून आजगीच्या डोळयातून अश्रू वाहू लागले. आई बावरुन गेली, बाप नुसताच पाहत राहिला. सावित्रा आपल्या घरी जाण्याची तयारी करते. हे पाहून सा-यांनाच भडभडून आलं. सर्वजन तिला विचारतात, कशाला जातीस तेव्हा ती म्हणते नांदायला. हे ऐकून तिला आई, वडील म्हणतात, नवरा होता तेव्हा गेली नाहीस व आता कशाला जातीस यावर सावित्रा म्हणते, तेव्हा जमलं नाही म्हणूनच आता जाते. जग काय म्हणेल याचा विचार न करता सावित्रा नांदायला जाण्याचे ठरवते.

भानाच्या उत्तर कार्यदिवशी लोकसमजुती प्रमाणे त्याचा आत्मा स्वर्गात गेला. परंतु सावित्राला वाटे आपल्या पतीचा आत्मा इथचं फिरत आहे. वणव्याला मिठी मारण्यासाठी सावित्राला जगावेगळी सोबत हवी होती. सावित्रा करारी मनानं उभी राहिली. नव-याची मूर्ती समोर उभी केली. व तिनं सर्वाच्या समोर कुंकवाचा टिळा लावला. एक शक्ती तिच्या नसानसात संचरली. हे पाहून लोकांना धक्का बसला. हे जगावेगळं करणं होत. बाई माणसाला शोभून दिसणारं नव्हतं. पोरीचं डोक फिरलं असं सर्वांना वाटल. लोकांना वाटलं घर बरबाद झालं. सर्वांची अतंःकरण फाटून निघाली. सर्वजण सावित्राकडं वेडयासारखी पाहू लागली. तेवढयात सावित्रा टिळा लावून म्हणाली,

ज्या दिवशी वै-याच्या रक्तानं धरतीला शिपंण घालीन, नव-याच्या खुनाचा बदला घेईन तवाच हयो टिळा पुसीन. माझा नवरा अजून मेला नाही. माझ्या ह्दयात जिवंत हाय.' (पा.नं.97).

सावित्रिनं केलेल्या निश्चयाची बातमी वारणा खो-यात शिरली. वेताळ रावताच्या कानावर ही बातमी गेली. भानाशी असलेला सामना त्यानं गोळीनं जिंकला तरी खुनानं तो विझला नव्हता. तो नारीरुपात सुरु झाला होता. भानाच्या आईला आपल्या मुलाच्या खुनाचा धक्का सहन झाला नव्हता. सावित्रानं सासूला समजावलं. सूडाच्या ईर्षेने पदर खोचला. नव-याच्या हातची बंदूक त्याच्या स्मरणानं हातात घेतली, बंदुकीचा परवाना आपल्या नावावर चढवून घेतला. सावित्रा झुंजीला तयार झाली. छातीवर जिंवत काडतुसाचा पट्टा, खांदयावर बंदूक अशा थाटात सावित्रा उभी राहिली. सावित्रानं आगीशीच खेळ मांडला होता. सावित्रा सासूला म्हणे, मन बळकट करा, जगायला हव तुम्हाला तेव्हा सासू म्हणे, जगतच मरण पत्करत आलेय मी. यावेळी सावित्राला दामूबाबाची आठवण झाली. दामूबाबा सासूबाईची काळजी घेत होता. दामूबाबा सांगावा द्यायला जात असे. ज्यावेळेस सावित्राला तिच्या पतीचा खून झाला हा सांगावा सांगण्यासाठी दामूबाबा आला तेव्हा तो म्हणाला होता की त्याचा जीव तुमच्यात घुटमळलाय .... व याच्या पाठीमाग रामायण बरंच आहे.

सावित्रान एक दिवस दामू बाबांना विचारल की, तुमच या घराण्याशी नातं काय ? तेंव्हा तो म्हणतो खूप जूनं हाय. तुमच्या भानाच्या आजोबा पासून आहे. सावित्रा दामूबाबांना विचारते, कसलं रामायण घडल आहे. दामूबाबा सांगण्यास सुरुवात करतात ते म्हणतात पैशातन वैर पेटलं. वेताळा राऊताला माझ्या समोर भानाने पैशाचं पुडकं दिल पण राऊतान त्याला नकार दिला.
व स्वतः ते पैसे घेतले नाहीत असे म्हणू लागला सावित्राला दामूबाबा म्हणाला की भानाचा तुमच्यावर खूप जीव होता पण आईच्या शब्दाबाहेर भाना नव्हता. मुकेपणानं सोसणा-या सावित्राकडं पाहून सासूला कणव येऊ लागली. सासूचे जिव्हाळयाचे शब्द ऐकून सावित्राला आयुष्याच सार्थक झालं असं वाटे.

सावित्रानं केलेला बार, ऐकून सासूच मन थरथरलं. तिला खूप भीती वाटते. सासूला आपण सावित्राला आधीच ओळखलं नाही. याचं खूप वाईट वाटले. तुला जनीबरोबर बोललेल पाहून

मला खूप वाईट वाटल कारण त्यांच्या घरानचं आमचं घर उठीवलं. जनीच्या सास-यान जन्माचं वैर केल. भाना वर्षा दीड वर्षाचा होता तेव्हा सावित्राच्या सास-याला तालमीचा नाद होता. तो गावातल चागलं पोरगं दिसल की त्याला खोळवी हैबता चुलतभाऊ म्हणावा असा सावित्राच्या सास-यानं त्याला पैलवान केला. सावित्राचा सासरा आपल्या धाकटया भावाला संभाला बाजूला ठेवी पण हैबताला विसरला नाही. हैबताचं संभाचं लग्न झाल. संभाच्या बायकोकडे हैबता वाईट वासनेनं पाहू लागला, बोलू लागला एक दिवस सावित्राच्या सास-यान, हैबता संभाच्या बायकोशी बोलताना पाहिला त्यामुळे त्याला झोडपून काढल तेव्हापासून वैर सुरु झालं. गुढी पाडव्याच्या सणादिवशी सावित्राच्या सास-याला व संभाला घरात जाळून वै-यानं दावा साधला. परंतु ते आता दैवाचे भोग भोगत आहेत. आपल्या लग्नाच्या आधी असणारे वेताळा रावताशी संबंध चालू ठेवते तीच ही जनी होय.

सावित्रानं वेताळ राऊताला सांगावा धाडला की भानाचं घराणं विझलं नाही. सावित्राला अनाचारानं वागणा-यांचा तिटकारा होता. सावित्राला आग लागलेल्या घरावर एक इमारत उभी केली मध्यभागी एक सुंदरसा चबुतरा उभा केला. त्या चबुत-यावर समाधी बांधली. सासूनं सावित्राचं खूप कौतुक केल. समाधीचा उत्सव करायचा दिवस ठरला. आईबाबा, आजगी पै-पाहुण्यांना निरोप पाठवला जनीच घर वाळीत पडाव तस पडल. तिनं आदल्या दिवशी वाडी सोडली. पूर्वी भेटलेला धनगर आपला ताफा घेऊन उत्सवाचा मांडव घालण्यासाठी आला. त्या दिवशी उत्सव झाल्यावर भजन चालले होते. तेवढयात सावित्र्याच्या परडयात गंजी पेटू लागल्या. त्या बघताना सावित्राच्या नजरेत नुसती आग पेटली होती.

दुस-या दिवशी हैबताचं, जनीच्या सास-याचे प्रेत पाहून लोकांच्या अंगावर काटा उभा राहिला. हैबतानं काय केलं असेल यावर अनेकाचे तर्कवितर्क चालले होते. सा-या वाडीला सावित्रांच जळीत व हैबताचा मृत्यू या दोन गोष्टी झपाटून टाकीत होत्या. एक दिवस दामूबाबा सावित्राला म्हणतात की, आपण समाधीवर एकच दिवा लावतो पण त्या समाधीवर तर दोन दिवे जळतात. हा दुसरा दिवा कोण लावतं हे पहाण्यासाठी सावित्रा व दामूबाबा संध्याकाळी देवळाच्या पाठीमांग दडून बसली. सावित्रानं बंदुकीत काडतुसं भरलं. चापावर बोट ठेवून सावित्रा तयारीत बसली. एवढयात विहिरीच्या बाजूला खसपस झाली. पाखर चिवचिवली. सावित्रानं रोखून अंधारातनं पाहिल. माणसासारखी आकृती सरकत येताना दिसली. पावलांचा आवाज जवळ येऊ लागला. सावित्रानं

चापावरचं बोट घट्ट केलं. दामूबाबा व सावित्रा चोरपावलानं त्या माणसाच्या पाठीमागे गेली. घोंगडी घेतलेली व समाधीकडं तोंड करुन उभ्या असलेल्या त्या व्यक्तीने खिशातून तेलाची बाटली काढली. त्यान दिवा लावला व तो समाधीच्या पाया पडला. सावित्रान बंदुकीची नळी छातीवर धरुन तिनं विचारल आपण कोण तो म्हणतो मी भागुजी डोंगरे. त्याला पाहून सावित्रा म्हणते, या वेळेला इकडे कशाला ? तेव्हा तो म्हणतो देवासारख्या माणसाच्यावर तेवढाच जीव म्हणून दिवा लावायला येतो. भागुजी सावित्राला मला तुमच्याजवळ ठेवून घ्या म्हणून विनंती करतो. भागुजीन गंजी विझवण्यासाठी प्रयत्न केला होता तेव्हा त्याला भाजले होते ते वण सावित्राला दिसतात. दामूबाबा भागुजीला राहण्यास परवानगी देतात.

दामूबाबा सावित्राला म्हणतो की वेताळी रावत जमवाजमव करायला लागला आहे. वारणंतल्या टगे लोकांना त्यान एकत्र केलयं सावित्राच्या सासुला भागुजीचा आवाज संभादाजीसारखा येतो. नंतर दामूबाबा धरणाच्या रोखानं संभादाजीच आहे का म्हणून खात्री करायला गेला तर खरचं तोच होता. हे संभाच्या अंगावर डाव्या बरगडीच्या खाली काळया ल्हासाचा चकुंदाचा चंकुदा होता या खुनेवरुन संभाला ओळखले. पेटत्या घरातून संभा आपला जीव वाचवतो. पण दादा आत जळत होता हे पाहून काळीज जळू लागलं. भाना गेला ही बातमी ऐकून संभाचा जीव घराभोवती लागला. हैबतानं आपल्या घराचा विस्काट केला म्हणूनच त्याला विहीरीत संभाने टाकला. कारण या हैबतानंच गंजी पेटवल्या होत्या व म्हणूनच त्याला विहिरीत फेकून दिला होता.

भागुजी डोंगरा म्हणजे संभाच हे ऐकून सावित्राच्या सासूला आनंद झाला संभाची कहाणी ऐकल्यावर सावित्राची सासू पार व्यथित झाली. संभा म्हणतो, 'वैनी तुम्ही बाईमाणूस असून गडयाच्या धिरानं घर सांभाळलंस, पण गडयासारखा गडी मी असून भ्याडासारखा जगलो'.

संभा म्हणतो, मी संसार केला, पहिली बायको धनगरी जीवन जगली. संसार मांडला, सावित्राला तर खूप आंनद झाला. तिन पायाचं दर्शन घेतल व मामांजी म्हटलं, सावित्रा संभाला म्हणते मला सूनबाई म्हणा तेव्हा संभा तिला म्हणतो की तू अगीनफूल आहेस दादाची सून शोभतीस खरी.

सावित्रा आपल्या चुलत सासूला आणायला दामूबाबाबरोबर गेली तिथ दोन गुटगुटीत पोर

बाहेर आली. तेव्हा साविञा म्हणते, मामांजी, मुलं कोणाची, संभा म्हणतो, माझीच तेव्हा सावित्रा खूप आनंदीत होते.

वेताळ रावत सर्व तयारीला लागला होता, सावित्रालाही चुलत सासरा मिळाल्यान खूप आनंदित झाली होती. एकदा सावित्राला मैत्रिण भेटली. ती समाज कल्याण खात्यामार्फत बालवाडीची मास्तरीण झालेली असते. मंगली तिच नांव. ती म्हणते तू शिक्षणासाठी हट्ट धरला नसतास तर कुणाची दळण कांडण करत पोट भरावं लागल असतं. मंगलीची बदली मालगावाला झालेली असते. सावित्राच्या गंजीच जळीत झाल त्याच्या अगोदर दोन दिवस मंगली मालगावाला आलेली असते. ती राहते त्याच्या शेजारीच एक बाई राहते ती सरपंचाची आहे. या बाईच्या घरीच सर्व खलबतं चालू असतात.मंगली तिथ राहू नये म्हणून सावित्रा विनवत होती.

सावित्रा बाजारात जायला निघाली होती तिथ ती वेताळया रावताला पाहणार होती. दामूबाबा सावित्राला म्हणतो की, वेताळया रावत देवळांच्या कडलां आहे हे ऐकून सावित्रा चापावर बोट ठेवून जवळजवळ सरकत गेली. रावताला कळताच तो गर्दीत घुसू लागला सावित्रानं टप्पा हेरला व बार उडवला. वारणा खो-यातल्या कानाकोप-यात सावित्राची सलामी गरजली. एका बाईला अशा रुबाबात पाहून बाजारच्या गर्दीला भीतीही वाटली, अभिमानही वाटला.

ती एकदा तारखेला जाताना मोटारीसाठी रांगेत उभी होती. तेवढयात आडमापी माणूस हॉटेलच्या मागनं आला. तिच्यासमोर येऊन थांबला. तो रतन पाटील त्या भागचा टग्या सावित्रापुढ उभा राहिला, तो म्हणतो 'अशा लय फुकण्या बघितल्यात', (पान क्र. 146). तरी सावित्रागप्प होती. परंतु ती गप्प बसलेली पाहून त्याला अपमान वाटला व तो-यात म्हणतो 'वेताळा रावताचा खून करणारी तूच का ती बाई ? 'तरी देखील ती गप्प होती. तो म्हणतो, का एवढी वर्षे झाली काईच झालं नाही, मग ती फुकणी कशाला घेऊन फिरतीस तेव्हा सावित्रा म्हणते मी माझ्या संरक्षणासाठी बंदुक घेतली आहे. तो म्हणतो बायकांची छाती काडतुसांसाठी नसते. अस म्हटल्यावर सावित्रा म्हणते तोंड आवरुन बोल. ती त्याच्यावर चिडते व त्याला समोर बंदूक घेऊन सामना करायला ये म्हणते, सावित्राचं मन कशातच रमत नव्हतं. एक दिवस ती आपल्या माहेरी जाते.

सासरी निघताना तिनं भावडांना पोटाशी धरलं आईच्या गळयात पडली नि आईला सावित्राचं हे जाणं निराळच वाटलं. बापाच्या पाया पडताना तिची ओट थरथरली. बापाचं काळीज भयकातर झालं.

दाव्याचा निकाल होता त्यादिवशी सावित्रा लवकर उठली. पाणी तापवलं. सासूला स्वतःच्या हातांनी पाणी घातलं देव पुजलं बुक्का लावला, कुंकू ल्याली. तेवढयात बाहेर बावराने आपली पत्नी जनीला मारण्यासाठी हातात दगड घेतला होता. तेंव्हा सावित्रा म्हणते का भांडताय तेव्हा तो म्हणतो ही सकाळी म्हणाली की तुमच्या घरावर जप्ती येणार आहे. तेंव्हा जनीचा नवरा म्हणतो की मी माझं घरदार विकून सोसाटीचा पैसा भागवीन ते घर परक्याचं नाही. 'सावित्रा जनाक्काला काय झालं विचारते तेव्हा बावरा म्हणतो सावित्रा तु तिला अक्का म्हणतेस. तेव्हा बावरा म्हणतो तुला ती काय म्हणाली ते ऐकलसं तर- काळीज फाटल तुझ. जना असं म्हणाली की तुझा व दामूबाबाचा संबंध हाय .... हे ऐकून सावित्रा मोठयांन किंचाळली. हे ऐकून सावित्राला प्रचंड धक्का बसला.

दामूबाबा सावित्राला मंगलीवर वाईट प्रसंग आल्यामुळे तिनं जीव दिला हे सांगतात, रावतानं मंगलीची अब्रू लुटली. हे ऐकून सावित्राला रावतांचा खूप राग आला. उरात आग भडकली.

सावित्रा तालुक्याला निघण्याची तयारी करते. वेताळा राऊत ही निकाल ऐकायला जीपगाडीतून आला होता. त्याच्याबरोबर रतन पाटील ही होता. वेताळया रावताला पाहताना सावित्राला मंगलीची आठवण झाली. निकाल रावतासारखा लागला त्यातच अन्याय झाला. निकाल लागताच वेताळ कोर्टाच्या बाहेर आला. सावित्रावर रावतानं तुच्छतेनं नजर टाकली. जीप वळणावर येताच सावित्रा विजेच्या वेगाने जीपच्या आडवी गेली. तिनं काडतूस केव्हा चढवली ते कळलही नाही.

आभाळउडी मारावी तशी तिन उडी मारली, सावित्राच्या अंगावर गाडी घालण्यासाठी वेगानं गाडीचालवली. गाडी वेगानं अंगावर येणार तोच तिनं धाडधाड बार टाकलं जीप गाडीची टायर्स उडवले. वेताळा राऊत गडबडला. तो उतरून बंदुकीत काडतुस घालणार एवढयात सावित्राची दुनाळ

परत कडाडली. तिसरा बार दणाणला व पापणी लवायच्या आत वेताळा रावताच्या छातीतून गोळी आरपार गेली, वेताळा राऊत रक्ताच्या थारोळयात पडला होता ते पाहून सावित्राची ईर्षा संपली, तिच्या डोळयात चढलेला खून ओसरला पदरात बांधून आणलेला बुक्का तिनं सोडला. हातात घेतला. कपाळभर माखून कुंकू पुसून टाकलं.

कुंकू पुसताना ती भानावर आली. आपण आता खरचं विधवा झालो.कुंकवाची सोबत सुटली, संगत नाहीशी झाली, आधार संपला असं तिला वाटलं. नव-याची आठवण झाली. कुंकू पुसलेल्या हाताच्या ओंजळीत तिनं तोंड खुपसलं आठवण होऊन ओठात शब्द फुटले, 'आजग्याक्का...।' दामूबाबा आजग्याक्का तालुका जवळ करायला धडपडत होते. दामूबाबाला राहवलं नव्हतं एक पेटलेली चूड विझत चालली होती. सावित्रा नव-याच्या आठवणीने हुंदके देत होती. कुंकूही उरलं नव्हतं । बुक्काही संपला होता ।

अगीनफूल या कादंबरीमध्ये प्रत्येक पात्राचे वेगळेपण दाखवण्याचा प्रयत्न नलगे यांनी केला आहे.

**कादंबरीतील पात्र परिचय :-**

या कादंबरीत अनेक पात्रे आहेत. त्यामध्ये सावित्रा, सासू, नणंद, भानुदास, दामूबाबा, वेताळा राऊत, धनगर, भागुजी डोंगरा, धनुपाटील, पाटलीन, म्हादू, सदा, शांती, मंगली, शेवंता, जमा ,सरी, गणा वरुटे , आंबेवाली, हैबता, संभा, सावित्राचा सासरा, संभाची दोन मुले, सरपंच व त्याचे साथीदार, बावरादाजी, रतन पाटील.

सावित्रा :-

अंगाने ठोस, शंभरजणीत उठून दिसेल असा बांधा, निग्रही पाणीदार नजर .... आभाळ उडीच्या टप्प्यात वेध घेणारी. गोलसर देखणा चेहरा. धारदार नाक लांबसडक काळेभोर केस. काना पुढून येऊन गो-या चेह-यावर उगाच रुळणारी केसाची बट. हसरे ओठ तर बघत राहावे. संसाराचं जाळं मनातल्या मनात विणताना अनेकदा ती खुदकन हसली होती. लाडिक रुसली होती. कांगावखोर बनली होती. सावित्रा ही जशी साजरी पोर तशीच स्वाभिमानी, दुस-याच्यावर माया

करणारी आणि माया लावून घेणारी. हसरी, नाचरी, खुदकन हसणारी, चटकन रुसणारी. रुसायला एवढसं सुध्दा कारण पुरत असे. पण तिच्या या घरावर तिचा लळा होता. पानाफुलांवर प्रेम होत. भिकार बलुत दारावर आलं तर घरातनं दारात धावत जाई. त्याला थांबवी. पळत घरात जाई. इवल्या इवल्या हातानं पीठ घेऊन येई. भाकर तुकडा देई. सुपातलं धान्य त्याच्या पदरात टाकी.

सावित्रा ही पतिव्रता आहे. ती आपल्या पतीच्या नावाने कुंकू लावण्यात आनंद मानते. स्वाभिमानी, मानी अशी सावित्रा आहे. नव-याला कोणी अवहेलनेनं बोलंल की, त्याचा सावित्राला राग येत असे. सावित्रा ही मुक्या जीवाच्या यातनांनी झरझरणारी.... आभाळ उडीचा अर्थ शोधणारी. आभाळ उडीची चमक डोळयात साठवणारी. अभाळ उडीसाठी आसुसलेली. माणसाला ती का मारता येऊ नये याचा विचार करणारी. ती बोच काळजाच्या कप्प्यात जपून ठेवणारी. तशी उडी तिला घ्यायची होती. आभाळ गाठायचं होत. अनेकदा ती तसं बोले. .... सावित्राचा तुळशीला पाणी घालण्याचा नेम चुकत नसे. शेतातही सावित्रानं गडयाची कामं उचलली.

सावित्रा मानी होती, ती फारशी चुकायची नाही. फटकळपणा तिनं कधीच केला नव्हता. नसता हट्ट धरला नव्हता. टाकून बोलली नव्हती. उणी उत्तर कुणाला दिली नव्हती. सावित्रा निग्रही, करारी होती. सोशिकही होती. समजुतदारपणा तिला नेहमीच शोभणारा. सावित्राच्या बाणेदार वागण्यानं माहेरात वचक बसवला. प्रत्येक गोष्टीत ती सारासार विचार करी. सावित्राच्या पतीचा खून झाला ही बातमी ऐकल्यापासून सावित्रा मुकी झाली होती. अबोल झाली. कामावर लक्ष नव्हतं. अन्नावरची इच्छा नाहीशी झाली. सावित्रानं कुंकवासाठी जिवाचं रानं केलं. पण तेच काळानं पुसून टाकलं. सावित्रा फटफटीत झाली.

सावित्रानं मनात नव-याची मूर्ती उभी केली. तिनं सर्वांच्या समक्ष कुंकवाचा टिळा लावला व ती म्हणते, 'ज्या दिवशी वै-याच्या रक्तानं शिपणं घालीनं, नव-याच्या खुनाचा बदला घेईन तवाच हयो टिळा पुसीन माझा नवरा अजून मेला न्हाई. माझ्या हृदयात जिवंत हाय', (पा.नं.97).

अगदी गडक-यांच्या सिंधूसारखी बोलणारी ही तरुण परित्यक्ता सिंधुसारखी भाबडी मात्र

नाही. नव-याचा दोष नसताना त्याच्या भोळया स्वभावाचा फायदा घेऊन त्याचा खून केला हे समजताच दु:खी होणारी ही मुलगी हातपाय गाळत नाही. ठाम निश्चयाने परत सासरी जाऊन एखाद्या रणचंडीसारखी वेताळा राऊताला आव्हान देते. तिची जिवलग मैत्रिण मंगला हिच्यावर ओढवलेल्या बेअब्रू करणा-या प्रसंगात रावताचाच हात असून त्यामुळेच मंगला आत्महत्या करते हे कळल्यावर ही अगीनफुलासारखी धगधगणारी सावित्रा कोर्टाबाहेर पडणा-या रावताला, नव्हे तिच्या संसाराचा सत्यानाश करणा-या जिवंत पापाला गोळी घालते. राऊत मरतो. राऊत नि गावचा टग्या रतन पाटीलही.

धगधगणारी सावित्रा शांत झाली होती. कुंकूही उरलं नव्हतं, बुक्काही संपला होता.

सासू :-

सावित्राच्या सासूचं बघणं तिरकस. खोकडयासारखी चाल. प्रत्येक गोष्टीत काही तरी खुसपट काढीत असे. सासू ही फार अंधश्रध्दाळू असते. आपल्या पेरवीच्या झाडाला फडक्यात नारळ, तांदूळ बांधलेले पाहिले व तिने सावित्रावर संशय घेतला. सावित्रा जनीशी बोले हे देखील सासूला आवडत नव्हत. सावित्रावर सारखी जाच करणारी सासू आपलं घर- 'जनीच्या सास-यानं. ' उठिवल म्हणून तर ही सावित्राला जनीबरोबर बोलून देत नव्हती. शेवटी सासूला आपण केलेल्या चुकीबद्दल खूप पश्चाताप होतो.

भानुदास :-

सावित्राचा नवरा - आई वडीलांचा ऐकणारा साधा-सरळ-शांत - अबोल - कारणापुरतं बोले, बोलायला लागला की, मनापासनं बोले. गोड असायचा शब्द. तो नेहमी आपल्यातच गढलेला. कसल्यातरी विचारान रुतलेला. आतली उलघाल मात्र कुणाला समजतं नसे. त्याचा तणावही कुणाला भास न देणारा. कुणी काही सांगितलं निमुटपणे ऐकून घेईल. काम सांगितलं ऐकेल. कुणाचं मन दुखावायचं त्याच्या जिवावर येई. त्यापेक्षा आपल्याला सोसावं लागलं तरी चालेल. कुणाचं मन न मोडणारा पण सोशिक होता. तो रयत सेवा संघाचा सेक्रेटरी होता. या संघाची लाखाची उलाढाल चालायची, जोखमीचं काम होतं. एवढा व्यवहार धकवून न्यायचा वकूब भानाचा होता. टापटीप

होती. सारं त्याच्या नजरेखाली चाले. सर्वावर त्याची देखरेख असे. वेताळ राऊतान सगळं त्याच्याव सोपवलं होत. विश्वासात घेतले होतं. भानाचा शब्द तो मानत असे.. भानाच्या भिडस्त स्वभावाचा फायदा घेतला गेला. अबोल वागण्याची संधी घेतली गेली. वेळ येताच पंधरा हजार रुपयांची उचल वेताळ रावतानं नाकारली, सर्व उचल भानाच्या नावावर राहिली. भाना चिडला. त्वेषाने पेटला. भाना शांत होता. परंतु डिवचल्याने त्याच्या जिवाचा तडफडाट झाला होता. तसा तो चिरडेल होता. तसेच तो मानी होता. त्याचा जन्म आगीतच झाला होता. पोलीस वेशातील माणसांनी भानाला फसवून बाहेर नेला व त्याचा खून केला गेला.

नणंद :-

ही सावित्राची नणंद नव-याने सोडलेली त्यामुळे माहेरात पगडा मांडून बसलेली व आपल्याच बापाचे हे घर म्हणून सावित्रावर सासुरवास करणारी स्त्री. एखाद्याच्या काळजाला लागेल असं ती बोलायची सावित्रावर भलतेसलते आळ घ्यावयाची, तिच्या चाडया-चव्हाटया आपल्या आईला सांगायची - अशीही चहाडीखोरं, भांडखोर कादंबरीतील खवीस-बाई.

दामूबाबा -

सावित्राच्या घराशी दामूबाबाचं नात जुन पुराण होत. हे त्याच्या सलगीच्या चालण्याबोलण्यावरुन सावित्राला समजलं होत. आपल्या नव-याचा सांगावा घेऊन आला होता तेव्हा त्यालाच केवढं दुःख झालं होत. घरचंच कुणी हरवल्यासारखा कष्टी झाला होता. दामूबाबा भानाच्या आजोबापासून या घराशी त्यांच नात आहे. दामूबाबा आठ-दहा वर्षाचे असताना त्याचं घर पेटल. तेव्हा भानाच्या आजोबानं आम्हालां आधार दिला. घर उभारायला सामान दिलं. मला आपल्या घरात चाकरीला ठेवलं. दामूबांबानीच भानाला नदीच्या पलीकडं नेऊन सोडंल तेव्हा भानाने वेताळा रावताला पैसे दिले. परंतु राऊत आपण पैसे घेतले नाहीत असे म्हणतो.

वेताळा राऊत :-

हा या कादंबरीतील खलनायक आहे. वेताळा रयत सेवा संघाचा अध्यक्ष होता. रयत सेवा संघात अनेक प्रकारचा माल असे. प्रथम प्रथम वेताळा राऊत भानाकडून हातउचल करु लागला. वेताळाने केलेल्या हात उचलीवर त्याची स्वतःची सहीही नसे. सावित्रानं केलेल्या निश्चयाची बातमी

वा-यासारखी वारणा खो-यात शिरली. तिच्या नव-याचा खून करणाऱ्या वेताळा रावताच्या कानावर आदळली. त्याच्या छातीत धडकी भरली. वेताळा रावताच्या कानावर सगाच्या चाळण झालेल्या झाडाची बातमी गेली. ती ऐकूण तो खचला. आपल्याच छातीत भोकं भोकं पडली आहेत. रक्त ठिबकत आहे. असा त्याला भास झाला.

वेताळया रावताला सावित्राचा धाक बसलाच होता. पण ही रांडमुड बाई ती बाईच अशी भुलवण करुन घेत होता. वेताळा रावत फौजादाराला पैसं चारुन सारा मामला पचविण्याचा प्रयत्न करीत होता. रावतानं मंगलीची अब्रु लुटल्यामुळे तिने आत्महत्या केली होती. निकाला दिवशी वेताळा रावत खुशीत होता. निकाल रावतासारखा लागला परंतु सावित्राने त्याचा खून केला.

भागुजी डोंगरा :-

अंगात धोगंडयाचा बनवलेला काचोळा, कमरेला लोंबणारी नुसती लंगोटी, डोक्यावर चिंध्या झालेलं पागोट, भिकबाळया, दाढी मिशा वाढलेल्या, रापलेल्या चेह-याचा, घोंगडं खांदयावर घेतलेला हा माणूस. सावित्राच्या सास-याचा धाकटा भाऊ उजव्या आखाजवळ वरुन भिवयाकडं येणारा उभा मोठा वण. हा मूळचा धनगर नव्हता पण पुढे त्याला धनगर बनावे लागलं.

हाच धनगर सावित्राला पुर्वी एकदा भेटला होता. तो दातखिळी बसून थंडीन गारठला होता. सावित्राने त्याला आपल्या घरी नेले होते. समाधीचा उत्सव करण्याचं सावित्रानं ठरवलं तेव्हा हा डोंगरा आपला ताफा घेऊन मांडव घालायला येतो. व समाधीवर दुसरा दिवा लावायला येतो. याच धनगराने पेटलेल्या गंजी विझवण्याचा प्रयत्न केला होता. भागुजी डोंगरा हा धनगर म्हणजे संभा होय.

धनु पाटील :-

हे सावित्राचे वडील आपल्या मुलीवर प्रेम करणारे. आपल्या मुलीच्या नशीबी नको ते आलं याचं त्यांना दु:ख वाटते. पाटलाने आपल्या दोन मुलांप्रमाणे सावित्राला तिसरा पोरगाच मानला सावित्राच्या सासूला पाटील म्हणतात, 'पोर नकळती हाय अजून आपलीच म्हणा, सांभाळून घ्या. तुमचं लेकरु तुमच्या पदरात घातलंय ' ( पृष्ठ 26).

आपल्या मुलीला आजगींन स्थळ सुचवलं व तिचं वाईट झाल म्हणून पाटील आजगीशी बोलत नाहीत. सावित्राला पाटील म्हणतात की, 'शेतावर । पाटलाच्या बायकांनी शेतीवर राबण्यासाठी जायचं नसतं, या घरचा तसा नेम हाय' (पृष्ठ 52).

सावित्राच्या पतीचा खून झाल्यानंतर तिची अवस्था पाहून यांना आंत्यतिक दुःख झाले.

पाटलीन :-

सावित्राची आई आपल्या मुलींला जीवापलीकडे जपणारी. पाटलीनीला आपली लेक कोर्टात आपल्या पती निष्ठेविषयी बोललेली ऐकून तिच खूप कौतूक वाटत. सावित्रा बाभळीच्या झुडूपावर चढलेली पाहून तिच काळीज धडधडलं. सावित्राची मैत्रिण शांती पोटुशी आहे हे पाहून सावित्राच्या आईला भडभडून आलं. सावित्राच्या आईच्या डोळयापुढून गर्भारशीपणामुळं लोभस देखण्या बनलेल्या शांतीची काया हालत नव्हती. सावित्राच्या पतीचा खून ऐकून तिच्या आई वडलांची अंतःकरणं पिळवटून निघाली.

म्हादू :-

हा सावित्राचा मोठा भाऊ सात वर्षाचा आहे.

सदा :-

अवघ्या चार वर्षाचा सावित्राचा लहान भाऊ.

शांती :-

शांतीची पाचवी व सावित्राच बारसं एकाच दिवशी होतं. शांती, सावित्रा एकत्र रांगू, खेळू लागल्या, जोडीनं हिंडू फिरु लागल्या. बरोबरीनं लहानाच्या मोठया झाल्या..... तीच शांता सुखानं नांदली. खा-या अर्थानं संसार केला. गर्भारपणाचं नवं तेज घेउन माहेरी आली. भातुकलीचा डाव एकत्र खेळलेली सावित्राची मैत्रिण.

मंगली :-

सावित्राची मैत्रिण, सोनाराची पोर, गरिबाघरची, बाप नसलेली. तिला सावित्रीनं कधी हेटीवली नाही. उलट इतकी चांगली कापड घालून तिच्यासमोर जायला ती लाजे. आपली कापड पाहून तिला

दु:ख होईल म्हणून सावित्रा तसली कापडं कधीतरी घाली. एकदा तर सावित्रानं मंगलीला व आपणास एकसारखी कापडं घ्यायला तिनं आईला सांगितल होतं. ही मंगली नाशिकवरुन बदली होऊन मालगावला आलेली असते. व येथे आल्यावर ती सावित्राला मदत करण्याचे ठरविते. स्वत:चा जीव धोक्यात घालून मंगला सावित्रास मदत करते.

शेवंता :-

सावित्राची बालमैत्रिण, बिट्टयानं खेळणारी, काचापाण्यानं रमणारी, सावित्रापेक्षा उभार, मोठी लाघवी, शेंवताची करवली म्हणून सावित्रा मिरवली. तिच्या लग्नातल्या सा-या सोहळयांनी दंग झालेली ती शेवंता लग्नानंतर प्रथमच नांदून आली. आली ती सावित्राच्या गळयात तिनं मिठी मारली. शेवंताच्या डोळयातील नवखी चमक पाहून ती विस्मित झाली होती. ही शेवंता आपल्या जिवाभावाच्या मैत्रिणीला नव-याचं सर्व वागणं सांगते. यातून तिचा हसरा स्वभाव दिसतो.

जना :-

जनीच माहेर मालगाव, तिथलीच ती, उनाड, नादी, पाय घसरलेली, खपवायची म्हणून हैबताच्या उफराटया बाहुल्या असलेल्या, पोरग्याला बावराला दिली होती. या बावराचा जनीनं भवरा केला. पहिले संबंध वेताळा रावताशी तसेच तिनं चालू ठेवले. ही जनी सावित्रावर अनेक आरोप करते. ही जना दुस-याचं वाईट चिंतिणार होती.

सरी :-

हिचं वागणं योग्य नसतं त्यामुळे तिला चावडीवर पकडुन नेल. सरीचे आईवडील किती गुणाचं ? काळजात चिरुन ठेवावीतं अशी बिचारी. आणि त्यांच्या नशीबाला ही सरीसारखी मुलगी आली.

गणा वरुटे :-

मुंबईत दादागिरी करणारा. भंकसगिरीत जगणारा. त्याच्या तोंडात सतत मुंबईचा विषय असे. खेडयातील माणसं म्हणजे पोरी म्हणजे मामुली बाब. त्यांना सहज बोटावर नाचवू, खेळवू अशी ऐट तो करी.

आंबेवाली :-

सावित्राच्या सासरची आंबेवाली बाई सावित्राला ती भेटल्यामुळे तीला खूप आनंद होतो. ती त्या आंबेवाली जवळ आपल्या पतीला 'खोबरं - खारका ....' देते. आंबेवालीला सावित्राच्या वागण्याने तिच्या नशीबी आलेल्या भोगाचे वाईट वाटते.

आजगी :-

मुसलमानीन, येळावीची, त्या डोंगराच्या पलीकडची, सिडसिडीत, हातापायाच्या तुरकाटया दिसणा-या, थकत आलेली, गुडघ्यापर्यंत लुगडं चापून नेसणारी, हातात गोट घालणारी ठेसणी, एवढीशी पण ओझंच्या ओझं मासळी आणणारी. कधी मासळी कधी झिंगा. तुरकाटी सारखी आजगी, पण तसल्या डोंगराच्या कडयाकपारीतनं मरणाचं ओझं घेऊन येई. आडरानात एकटी येई. भीती तिला माहिती नव्हती.

हैबता :-

सावित्राच्या सास-याचा चुलतभाऊ म्हणावा असा कांबसारखा उभा सरळ. सावित्राच्या सास-यानं त्याला हेरलं. पैलवान केला. स्वत:चा खाना लावला. आपल्यातला अर्धा तांब्या दूध त्याला पाजी, सावित्राचा चुलत सासरा संभा यांच्या बायकोकडे हैबता वासनेनं पाहू लागला. एकदा सावित्राच्या सास-यानं हे पाहिले व त्यापासून वैर सुरु झाले. हैबतानं समायकातली जमीन बळकावली मारंकरी घातलं. डावाला डाव सुरु झाला. हैबता आता स्वतः कर्माची फळे भोगतूय, त्याच्या अर्ध्या अंगातनं वारं गेलयं.

सावित्राचा सासरा :-

सावित्राचा हा सासरा मजबूत गडी. पाठीची कांबच्या कांब, ताडामाडासारखा गडी. भरदार छातीचा, दमदार, लग्न झालं तरीसुध्दा तालमीचा नाद सुटला नव्हता. संसार असा केला नव्हता, गावातलं चांगलं पोरगं कुणी दिसल की त्याला खेळवी, वाढवी, चार डाव सांगी, मैदान गाजवी, चुलतभावाला तो भावासारखा मानी.

संभाची मुले :-

आपल्या छोटया दोन दिरांना घेऊन काही सांगे. समजावी ती दोन पोरं डोंगरात राहणारी,

धनगर वस्तीवर वाढलेली. संकोचणारी थोडी बावरायची गोंधळायची, एवढालं डोळं करुन सारं शेत बघायची. कौतुक इवलाल्या डोळयातून ओंसडायचं, सावित्रा त्यांची भीड मोडायची चांगलं राहा. वागायला सांगायची, तिन एकाच्या गळयात पट्टा अडकवला होता. मोठयाच्या खांद्यावर बंदूक दिली होती.

बावरादाजी :-

हा जनाचा नवरा उफराटया बुबुळाचा पुढचं काईच दिसत न्हाई. बायको तर त्याच्या डोळयात धूळ फेकणारी. जना आपल्या नव-याला म्हणते की, सावित्राच्या घरावर जप्ती येणार आहे. तेव्हा बावरा म्हणतो माझं घरदार विकून सोसायटीचा पैसा भागवीन. ते घर परक्याचं नाही. बावरा दुस-यानां मदत करणारा असा आहे. आपली पत्नी सावित्राबद्दल जे वाईट बोलते त्याचा त्याला राग येतो.

रतन पाटील :-

लोकांना छळणारा टग्या त्याने अनेकांना छळलं होत.सतावलं होत, गोरगरीबांच उभं पीक कापी. दुकानदाराच्या बायकोपुढं बळं बघून उभा राही. खंडणी मागी. लोक घाबरत त्याला हवं असेल ते गुमान देत. एखादी गरिबाची बायको नांदण टाकून माहेरात राही ती त्याच्या भीतीनं.सारा भाग वैतागला होता. हात चोळून गप्प बसला होता.

शिंदया वकील :-

नूलच्या मास्तरचा पोरगा.सोडचिठ्ठी घेण्याबद्दल सावित्राचा वकील हा शिंदे.नकार देते. बॅलिस्टरा सारखा शिंदया वकील. फाडफाड बोलणारा कोर्टाला चकीवणारा पण तो सुध्दा सावित्राच्या बोलण्याने गप्प राहणारा.

शिंदयाची रखामी :-

एकदा नांदून आली ती दुस-यांदा नांदायला गेलीच नाही. गेली ती दुसरा घरोबा करुन ... .. पहिल्या मंगळसूत्राचं उपसून मण्यांच्या खाचा करुन अंगावरची धूळ पुसावी तसं तितक्या सजागतीनं कपाळीचं कुंकू पुसून दुस-याचं कुंकू कोरुन लावून पहिलं घर विसरली होती.

जिरग्याची सून :-

गिरणीतल्या पोरावर भाळून पळाली.

रामू कराळयाची बायको :-

दोन पोरांची आई मुंबईला राहणारी रामूबरोबर किती वर्ष काढली तीनं अन् एका रात्री कुणासंग असला संसार सोडून गेली. पार कुठ अंधार मुलुखात कारंडया मुलखात म्हणं.

बंडा मांगाची लेक :-

नव-यानं मारहाण करुन घालवलेली. खूप मारायचा सतवायचा, पशुसारखं अनाचार करायचा म्हणून ती नांदायला जायला भ्यायची, रडायची, विहिरीत उडी घेऊन जीव देईन म्हणायची पण तिचा नवरा तिला बळजबरीनं ओढून न्यायला आला होता. तेव्हा तिनं लहान पोराला पाठवून सावित्राच्या घरात कळवलं.

**कादंबरीतील प्रसंगांची योजना :-**

अगदी सुरुवातीला सायंकाळचा प्रसंग दर्शविला असून पाटील कोर्टातून घरी आल्यावर आपल्या पत्नीला कोर्टातील प्रसंग सांगतात. आपली सावित्रा कोर्टात वकीलापुढं फाडफाड बोलते, ती तिथे कुणालाच घाबरत नाही. दुस-या प्रसंगात दारात भिकारीण आलेली असतानां ती आपल्या झोळीत जेव्हा बाळाला टाकते तेव्हा सावित्राचा जीव खालीवर होतो. सावित्रा झोळीतून बाळाला काढून घेते व ती त्याला भिकारीण परत येईपर्यंत खेळवत बसते.

एकदा चिंचेवर वानरांचा कळप आलेला होता. एका वानरीच्या पोटाला पिलू चिकटलेले होतं. त्या पिलासह ती वानरीण या झाडावरुन त्या झाडावर उडया मारत होती. हे पाहिल्यावर सावित्राचा जीव तगमगला होता.

एका श्रावणातली गोष्ट. एक सोनेरी सायंकाळ. कोवळ उन. ऊनपावसाचा खेळ .... उन्हासावल्यांची पाठशिवण ..... रंग बिलोरी.... हे पाहणारी सावित्रा सहा वर्षाची असेल. नाच-या नजरेची हरखून बघत उभी. तेवढयात एक स्पष्ट इंद्रधनुष्य आकाराला आला. त्याचं एक टोक तिच्या...

अंगणात होतं. अन् दुसरं लांब कुठंतरी. निळया आकाशात शिरल्यासरखं. कुठं उतरलं होतं ते दिसतचं नव्हत. ती दाट रंगाची तेजस्वी कमान तिच्या अंगणात उतरलेली. ती हरकून गेली तिला वाटलं, आपण या कमीनीवर चढावं, लांब जावं, पण ती कमान कुठे जात होती. तिला माहिती नव्हतं तिला वाटे ही देवाघरची वाट असेल, आपण यावरुन जाऊ. पळत पळत दुरवर देवाच्या घरात. याचं इंद्रधनुच्या स्वप्नाचे रुपांतर सावित्राच्या लग्नात होते ही सावित्रा सासरी खूप आशा बाळगुन येते. वडील सावित्राला घालवून जाताना म्हणतात की, पोर अजून लहान आहे. सांभाळून घ्या हे वडील सांगत असताना सासू नणंद आपल्या गुमानच होत्या. सासू, नणंद आपल्यावर माया करतील असे तिला वाटत होते. पण सर्व कामं करुनही प्रत्येक गोष्टीत खुसपट काढले जाई. कुरकुर होई. कुंभाडपणा डोकं वर काढी. कौतुक तर नव्हतचं.

अशीच एकदा सावित्रा : . घागर सावरीत पांदीन चालली होती. तेवढयात पुढून एक मोकाट सुटलेला पाडा पळत येत होता. सावित्रा घाबरली. तो अंगावर झेप घेणार तेवढयात सावित्रानं घागर टाकली आणि तटात उडी घेतली. डोळ गपकनं झाकलं. हात ओरबाडलं. हातातून रक्त आलं. चिन्हारीच्या सरबरीत काटयांचे अंगावर ओरखाडे उठले. घागर चेपली.

हातापायातून रक्तं डवरलं होतं. चिल्हारीच्या फांद्यात अडकून तिचा पदर फाटला होता. ती थरथरतं घरात शिरली. भिजक्या अंगाची सावित्रा चेपलेल्या घागरीला घेऊन घरात आली. हे पाहून सासूनं हैदोस घातला. घागर चेपली कशी हे ती सावित्राला विचारते. सावित्रा सांगते पांदीत बैल मुसांडी मारुन आला. भीतीनं तटात शिरले व त्यामुळे घागर पडून चेपली.

'.... आणि काय गं पदर कशानं फाटला.... जरा लाज लज्जा....(पृष्ठ 32)

हा शब्द सावित्राचं काळीज चिरीत गेला. सावित्रा सासूचं पाय धरुन खरं ते सांगते. परंतु तरी देखील सासूला तिची दया येत नाही. ती सावित्राच्या नव-याला सांगते. 'आज घागर फोडली. उद्या संगळ घर बुडवील सगळयांच्या अब्रूची धिंड काढील एक दिवस'. (पृष्ठ 33).

सासू व नणंदेला वाटत की .... तो ओरडेल ...... रागावेल. पण तसं काहीच

घडलं नाही. सासू म्हणते भावाची पोरगी काळी बेरी होती पण तिनं संसार चांगला केला असता. या सासूच्या बोलण्यावरुन सावित्राला ही सर्व अशी का वागतात हे समजले व ती अतिशय दुःखी होते.

पेरवीच्या झाडाला फडक्यात तांदूळ लिंबू बांधलेले. ते ज्या फडक्यात बांधलं होतं ते फडकं घरचचं होत. सासूला सावित्राचा संशय आला. त्यात रात्रीच लेकीला तापानं फणफणून टाकलेलं. सावित्रानं करणी केली. त्यात जनीची फूस असावी. या कारणावरुन सासू व नणंद सावित्राला अंगावरच्या पातळानिशी घराबाहेर काढतात.

एकदा सावित्राच्या सासरची आंबेवाली दारात येते. तिला पाहून सावित्राला खूप आनंद होतो. आंबेवालीच्या पायांवर सावित्रानं मस्तक ठेवलं. मनोभावानं नमस्कार केला. सावित्रानं आंबेवालीजवळ आपल्या पतीला देण्यासाठी खोबरं- खारका दिल्या. आपल्या पतीला काळजी करत जावू नका असे सांगण्यास सावित्रा आंबेवाली जवळ सांगते.

संध्याकाळची वेळ असते. पाटील अंथरुणावर पडले. तेवढयात दार वाजल्याचा आवाज झाला. पाटील उठला. दाराकडं गेला. पाटलानं आडना काढला. काळोखातून एक माणूस आत आला. पाटील दचकला.

' मी सडयावरचा धनगर हाय जी.' हा धनगर असा अचानक पाहिल्यामुळे सावित्राच्या मनात अनेक विचार येतात. पाटील धनगराला विचारतात कोठे गेला होतास तेव्हा तो म्हणतो. खांडोबाच्या जत्रेला, पालीला गेलो होतो. हाच भांडा-याची पुडी तेथे विसरुन पहाटे निघून जातो.

सावित्रा आजगीची वाट पाहात असते. तेवढयात बाहेरचा दरवाजा वाजतो. परंतु आजगी आलेली नसते. म्हणून तिची निराशा होते. हा पाहुणा इराच्या वाडीचा असतो. तो सांगावा घेऊन आलेला असतो. मन घट्ट करीत तो पाहुणा सांगतो. 'तुमच्या जावयाचा, साऊ बाईच्या नव-याचा खून झाला आहे हे ऐकून सा-याची काळजं फाटली. सावित्रा मोठयानं किंचाळली. अंधाराला कापीत ती किंचाळी गेली. आईबापाची अंतःकरणं पिळवटून निघाली. सावित्राच्या मनाचा आधार निखळला.

ती उंब-यावर धाडकन कोसळली.

सावित्राचं मंगळसूत्र तोडतानाचा प्रसंग -

मंगळसूत्राला हात गेला आणि सावित्रानं हंबरडा फोडला उराशी कवटाळून सावित्रा उर बडवून घेऊ लागली. कुंकू पुसताना तर सावित्राची दातखिळी बसली.

पोलीस वेषातली माणसं भानाला घेऊन घराबाहेर पडली. इराची वाडी व मालगावच्या वाटेला लागली. मधल्या भऱ्या जंग ओढयात उतरली. ओढयाची खोली माणसाला गिळून टाकणारी. दिवसाढवळया एकट्या माणसाचा जीव दडपून जावा असा भयावह ओढा. रात्रीच्या काळोखात तर अत्यंत भीतीदायक वाटणारा. ते सारे ओढयात शिरले आणि कोल्हयांनी एकच गलका केला त्या कोल्हे कुईनं अवघे काळोखी वातावरण भेसून झालं.

भाना पुढे ते लोक मागे. भाना तंद्रीतच पुढे निघाला. अंतर वाढले आणि अचानक बार कडाडला. आसमंत दणाणला त्याचबरोबर भानाच्या तोंडून भंयकर किंकाळी फुटली. ओढयाचं काळीज फाटलं. ती किंकाळी अंधार भेदीत गेली.

भानाच्या बरगडीतून गोळी सणसणत गेली होती. पोलिसाच्या वेषाला भाना फसला. बतावणीला बळी पडला. भाना तत्काळ खाली कोसळला. रक्ताचं थारोळं झालं. धडपडून थंड होत गेला. मारेक-यांना वाटलं भाना खलास झाला. त्याला तसचं टाकून त्यांनी ओढयाओढयाने पळ काढला.

बाराच्या आवाजाने पलीकडेच असलेल्या माने पाटलांच्या वस्तीवरील माणसं ओढयाकडं धावली. भाना रक्ताच्या थारोळयात पाहून घाबरली. तरीही अदमास घेत धाडसानं पुढं झाली. पाहिलं. भानाच्या काळजात थोडी धुगधुगी होती.

सावित्रा उठली. करारी मनानं उभी राहिली व कुंकवाचा टिळा लावून म्हणाली, ' ज्या दिवशी वै-याच्या रक्तानं धरतीला शिंपण घालीन, नव-याच्या खुनाचा बदला घेईन तवाच हयो टिळा पुसीन. माझा नवरा अजून मेला न्हाई. माझ्या हृदयात जिवंत हाय.' (पृष्ठ 97).

मनोमनी नव-याला जपणारी सावित्रा, पण तिला तो आपल्याला सोडून गेला असं वाटतचं नव्हतं. म्हणून तर ती कुंकवाचा टिळा ल्यायला समर्थ होती. त्याच्या सोबतीनं कडाडणा-या विजेची शक्ती तिच्यात भिनली.

समाधीचा उत्सव करायचं सावित्रानं ठरवलं. तिन न्नात्यागोत्याच्या माणसांना सांगावा दिला. आईबाबाला निरोप दिला. भजन, कीर्तनासाठी आपसापच्या गावोगावचं माणूस जमलं होत. सारी वाडी घर सोडून शेतीत आली होती.

भजन सुरु झालं. निवृत्ती, नामदेव, तुकारामांचा 'घोष' सुरु झाला, मृदंग वाजू लागला. टाळयांनी साथ धरली. अवघं वातावरण भरुन गेलं. चैतन्यान फुललं. भजन रंगलं. माणसं डुलू लागली. दंग झाली. सा-यांची एकमेळी झाली. कीर्तनाचा आवेग रंगात चढू लागला. आणि एकाएकी सा-या रानभरं आग दिसली, कीर्तन थांबलं माणसांनी किंकाळया फोडल्या, सा-यांच्या नजरा वाडीच्या दिशेनं लागल्या.

वाडीच्या बाजूला मोठा आगीचा डोंब पेटलेला दिसला. दामूबाबनं धाव घेतली. सावित्रानं बुंदुकीला हात घातला. सावित्रा वा-यासारखी सुसाट शिवारात शिरली.

सा-यांनी ती आग पाहून हळहळ केली. सावित्राच्या परडयातल्याच गंजी पेटून गेल्या होत्या त्या बघताना सावित्राच्या नजरेत आग पेटली ती आग भिनत भिनत रोमारोमात शिरली.

समाधीवर आपण एकच दिवा लावतो. पण दुसरा दिवाही कोणीतरी येऊन लावते हे पाहण्यासाठी दामूबाबा व सावित्रा अंधारात येतात. तेवढयात घोंगडी कांबरलेला एक माणूस दिसला. त्यान खिशातून तेलाची बाटली काढली व दिवा लावला समाधीच्या पाया पडला आणि डोळयाला हात लावला. तो दिवा लावणारा भागुजी डोंगरा असतो. तोच हा सावित्राचा चुलत सासरा संभा होय.

वेताळा रावताच्या कानांवर सागाच्या चाळण झालेल्या झाडाची बातमी गेली. ती ऐकून तो खचला. आपल्याच छातीत भोकं-भोकं पडली आहेत. रक्त ठिबकतं आहे असा त्याला भास झाला. काळजाचं पाणी पाणी होई. तरीही त्यानं धीर धरला. हत्यारं तयार ठेवली. वारणंतल्या टग्याचं

कान भरलं. खिसं गरम केलं. पाटर्या झडू लागल्या खलबत शिजू लागली.

एकदा सावित्रा तारखेला निघाली होती. दामूबाबाही बरोबर नव्हता. मोटारीसाठी रांग्या घोलाच्या तिठ्ठयावर ती थांबली होती. तिठ्ठयावरच्या माणसांशी ती बोलत नव्हती. आपल्याच नादात होती. तिच जगच निराळ होत. बंदूक मांडीवर घेऊन कसल्या तंद्रीत असलेली सावित्रा रांगेत बसली होती. तिची नजर सावध होती.

तेवढयात एक कल्ले राखलेला, मिशांचं आकडं वळवलेला, "भला आडमापी माणूस हॉटेलच्या मागनं आला. तिच्यासमोर येऊन थांबला. माणसाच्या नजरा काव-याबाव-या झाल्या. रांगेतली सगळी माणसंआपापल्या जागी मुरुन बसली. भीतीच वातावरण तयार झालं. तिथली माणसं डोळयाच्या खुणानी एकमेकाला काही सुचवीत होती. त्या आडदांड माणसाला पाहून सगळी गांगरुन गेली होती.

तो रतन पाटील त्या भागचा गुरकावणारा टग्या सावित्राच्यापुढं उभा होता. मिश्यावर ताव मारीत होता. पिंचारलेल्या डोळयानं कु-र्यात बघत होता. बाईची आता धडगत नाही. अशा सा-या लोकांच्या नजरा बोलत होत्या. सावित्रानं त्याची दखल घेतली नव्हती. दुसरीकडं तोंड फिरवून गप्प होती. हातातली बंदूक मात्र सावध होती. तोच सगळयांच्या कानावर शब्द आदळले.

' अशा लय फुकण्या बघितल्यात', माणसांची काळजं धडधडली. सावित्रा गप्पच होती. त्याला अपमान वाटला. तो तो-यात पण कडवटपणानं म्हणाला, 'वेताळा रावताचा खून करणारी तूच का ती बाई ?'. (पृष्ठ 146).

सावित्रा तरीही अविचल राहिली, सावित्राला स्तब्ध पाहून तो चिडला. ठसठसून बोलला.

' का एवढी वर्ष झाली; काईच झालं न्हाई. मग ती फुकणी घेऊन कशाला फिरतीस ?'

तिनं गरकन् मान वळवली. त्याच्यावर जळजळीत नजर टाकली. तुच्छतेनं बोलली.,

' मी माझ्या संरक्षणासाठी घेतलीय बंदूक'. सावित्रा त्याला आव्हान करते. व सांगते आता

तुझी बंदूक नसलं. तुझ साथीदार नसतील तर जमाव करुन उद्या न्याहरीच्या ( पान.नं.148) वक्ताला ये. त्यावेळी मी इथं येईन. तालुक्याला जाताना थांबेन.

वीज चपकारावी तसा सावित्राचा शब्द चपकारत येत होता. शांत दिसणा-या त्या सावित्राचा तो रणमर्दानी आवेश पाहून माणसांचे डोळे दिपून गेले आणि उद्याच्या दिवसाकडे लागले.

दाव्याचा निकाल रावतासारखा लागला. पापच निर्दोष म्हणून सुटले. न्यायच अन्याय झाला. निकाल लागताच वेताळ राऊत कोर्टाच्या बाहेर आला. त्यानं एकच जल्लोश केला. बाहेर झाडाखाली उभ्या असलेल्या सावित्राला पाहून रतन पाटील मुद्दाम खाकरला, थुंकला, गाडीत चढला.

जीप चालू होऊन पुढे गेली. वळणावर वळणार तेवढयात सावित्रा विजेच्या वेगानं जीपच्या आडवी गेली. तीरासारखी जातानाच तिनं काडतुसं केव्हा चढवली ते कळलही नाही.

सावित्राच्या घारीसारख्या नजरेनं पवित्रा हेरला. गाडी वेगानं अंगावर येणार तेवढयात तिनं दुनाळ पेटवली. धाडधाड बार टाकलं. आसमंत दणाणला. जीप गाडीची टायर्सतिनं उडवले. गाडी लडबडत बाजूच्या नाल्यात गेली. कडेच्या झाडावर जाऊन आदळली. वेताळा राऊत गडबडला. उतरुन बंदुकीत काडतुंस घालणार एवढयात सावित्राची दुनाळ परत कडाडली. हाताचा छेद घेतला.

तिसरा बार दणाणला. पापनी लवायच्या आत वेताळा रावताच्या छातीतून गोळी आरपार गेली. बाकीचे साथीदार उडया टाकून धावले. घाबरले. भीतीनं सैरावैरा धावू लागले. रतन पाटील पळताना दिसला. आणि सावित्रानं नेम धरुन गोळी झाडली. गोळी रतन पाटलाच्या तळव्याला चाटून गेली. किंकाळी फोडून तो दगडावर कोसळला.

वेताळा राऊत रक्ताच्या थारोळयात पडला होता. ते दृष्य पाहून सावित्राची ईर्षा संपली. ती गंभीर झाली. तिच्या डोळ्यात चढलेला खून ओसरला. तशीच चालत ती वेताळा रावताच्या प्रेताजवळ आली.

पदरात बांधून आणलेला बुक्का सावित्रानं सोडला कपाळभर माखून कुंकू पुसून टाकलं.

कुंकवाचा टिळा पुसताना हळूहळू ती भानावर आली. आपण खरेच विधवा झालो. कुंकवाची सोबत सुटली. संगत नाहीशी झाली. आधार संपला. असं तिला वाटलं. नव-याची आठवण झाली. कुंकू पुसलेल्या हाताच्या ओंजळीत तिनं तोंड खुपसलं.

आजग्याक्काची आठवण होते. दामूबाबा व आजग्याक्काला डोंगरवाटेंन तालुका जवळ करायला धडपडत होते. दामूबाबाला राहवलं नव्हतं.

एक दुनाळ आग ओकून थंड पडली होती. एक पेटलेली चूड विझत चालली होती.

सावित्रा नव-याच्या आठवणीनं हुंदके देत होती.

कुंकूही उरलं नव्हत ।

बुक्काही संपला होता ।।

अशा प्रकारे नलगे यांनी 'अगीनफूल' कादंबरीत प्रंसगाची योजना केली आहे.

ग्रामीण जीवनामध्ये असणा-या सुष्ट दुष्ट माणसाचे हे चित्रण आहे. येथे शिकलेले व अशिक्षित किती असे करुन चालणार नाही. तर येथे विकारी, ईर्षेबाज किती अशी विभागणी लावावी लागेल.

मानवी जीवनातील षडविकारांचे धगधगते चित्रण या कादंबरीतील प्रसंगातून दिसते, त्यामुळे हे प्रसंग केवळ मनोरंजक नाहीतर ते दाहक आहेत. गाळ साचलेल्या डोहामध्ये एखादा दगड टाकल्यावर सर्व पाणी गढूळ होऊन जाते. किंवा हिवाळयाच्या दिवसात दाट धुक्याच्या पडदयाआड सगळा आसमंत धुसर बनुन जातो. तशी विकारांच्या धुरोळयात या सैतानी माणसांचा अतिरेकी वर्तनाचा पट सावित्राच्या सात्विक जीवनाच्या पार्श्वभूमीवर अधिकाधिकच उठावदार झाला आहे.

**कादंबरीतील विषय लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी योजलेल्या युक्त्या :-**

सावित्रावर सासू व नणंद अनेक प्रकारचे आरोप करते. एकदा जनाबरोबर सावित्रा बोललेली असते. खरवीस खाल्ला म्हणून . सासू व नणंद तिला खूप बोलतात.

तसेच एकदा पांदीत पाडा पळत येत होता. तेव्हा सावित्रानं तटात उडी घेतली.

चिल्हारीच्या फांदयात पदर अडकून फाटला होता. यावरुन देखील सासू सावित्राला बोलते.

एकदा पेरवीच्या झाडला फडक्यात नारळ, तांदूळ बांधलेले नणंद पहाते ती आईला सांगते यावर सासू ती करणी सावित्रीचीच असावी व तिला जनीची फूस असावी असे सासू तिच्यावर आरोप करते.

सोसायटीत झालेली अफरातफर यामुळे सुध्दा विषय लोकापर्यंत पोहचवला जातो. वेताळा रावताने भानावर पैसे खाल्ल्याचे आरोप केले व त्यातूनच त्याचा खून झाला.

जनी ही एक लग्नापूर्वीच तिचं आयुष्य घाणेरडं असतं. ती वासनेच्या आहारी गेलेली असते. वेताळा रावतांशी तिचे संबंध होते. लग्न होऊन सासरी आल्यावर देखील ती वेताळ रावताशी संबंध ठेवते.

समाधीच्या उत्सव चाललेला असतो. आणि या मंगलप्रसंगी भजन, कीर्तन चाललेलं असत. आणि तेवढयात सावित्राच्या परडयातल्याच गंजी पेटून गेल्या होत्या. म्हणजेच एखादा चांगला प्रसंग असताना तिथं असं काही तरी वाईट घडवायच हा आपल्या समाजाचा नियम असतो.

जोतिबाच्या डोंगराच्या जत्रेचा दिवस, भर पुनवंचा, वारणा खो-यातलं माणूस न माणूस लोंटलं होतं. वाटेनं माणसांची माळच्या माळ लागलेली. सावित्राच्या माहेरातून जोतिबाला जायची वाट होती. वांटयाच्या शेतातनंच वाट पुढं सरत होती. सावित्रा त्यावेळी माहेरातच होती. भाना सजून जोतिबाला निघालेला. तो देवासनं परतला. तेव्हा भानानं देवाचा प्रसाद आणला होता. वाटांब्याखाली दिला होता. बुक्का त्यानं आपल्या हातानं तिला लावला होता.

धनगर जेव्हा सावित्राच्या माहेरी संध्याकाळी अचानक येतो तेव्हा पाटील त्याला म्हणतात. पाहुण कुठं गेला होता ? तेव्हा धनगर आपण पालीला गेल्याचे सांगतो. खंडोबाच्या जत्रेला तो गेला होता व पहाटे लवकर उठून जाताना मात्र धनगर भंडा-याची पुडी तिथेच ठेवून जातो.

हाच धनगर एकदा थंडीत दातखिळी येऊन पडलेला असतो. सावित्रा त्यावेळी नवीन

नांदायला आलेली. तरी देखील ती न घाबरता निकोप धाडस करते व त्या धनगराला ती आपल्या घरी घेऊन येते.

लहान पणी इंद्रधनुष्याची कमान पाहात असताना सावित्रा कोसळता कोसळता वाचते व हीच सावित्रा नंतर आपल्या पतीच्या खूनाचा बदला घेते.

या कादंबरीत अनेक प्रवृत्तीच्या व्यक्ती आहेत. सावित्रा तिचे आई वडील, नवरा, शांती, मंगली, शेवंता या सुष्ट प्रवृत्तीच्या व्यक्ती आहेत.

तसेच सावित्राची सासू, नणंद, वेताळा राऊत, रतन पाटील, जना, हैबता या दृष्ट प्रवृत्तीच्या व्यक्ती आहेत.

**कथानकाचा वाचकावर होणारा परिणाम :-**

' अगीनफूल ' ही कादंबरी वाचकांनी वाचल्यावर त्या कादंबरीतील प्रत्येक पात्र वाचकांना रंजक वाटते सावित्रा ही नायिका तर प्रत्येक वाचकाच्या मनावर परिणाम करते. ही कादंबरी वाचकाच्या मनावर बिंबून राहते. सहज सुंदर सोप्या अन् रसाळ वर्णनांनी भरलेली ही कादंबरी मनाला आनंद देणारी आहे. कथानक विविध कलाटण्यामुळे अकस्मात घडणा-या स्थित्यंतरामुळे अखेरपर्यंत कुठेही कंटाळवाणे न होता अखेरपर्यत आकर्षक व वाचणीय राहिले आहे.

प्रा. नलगे यांनी आपल्या सोप्या, ललितपूर्ण ग्रामीण भाषेत सावित्राची जीवन कहाणी वेधकपणे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. प्रंसगोपात्र येणारे खेडयातील निसर्गाचे वर्णन, खेडयातील लोकांच्या भाषेत असणारे वाक्प्रचार व म्हणी यामुळे कादंबरीचे वातावरण चांगले तयार होते. निरनिराळया पात्रांचा स्वभावाचे कंगोरे थोडक्यात रंगविण्यातही नलगे यांना यश लाभले आहे. त्यामुळे कादंबरीची कथा वस्तू वास्तव न वाटणारी असली तरी कादंबरी वाचनीय बनून जाते.

या कादंबरीचा वाचकांवर फार मोठया प्रमाणात होतो. आपण देखील समाजात वावरताना सावित्रासारखे जीवन जगावे असे स्त्रीयांना वाटणे साहजिकच आहे.

**लेखकाची विवेचन शैली :-**

नलगे यांनी 'अगीनफूल' कादंबरीत वैराची गुंतागुत कशा प्रकारे हे सांगितले आहे. वैर हे सावित्राच्या सास-यापासून सुरु होतं. हैबता हा संभाच्या बायकोकडे वाईट वासनेनं पाहतो. हे सावित्राच्या सास-यास आवडत नाही. व येथूनच वैर सुरु होतं.

नंतर या हैबताची सून जना ही वेताळा रावताशी संगनमत करुन सावित्राचं घर उठवण्याचा प्रयत्न करते. सावित्राला फुस लावण्याचे काम करते.

वेताळ राऊत भानावर सोसायटीच्या पैशाच्या अफरातफराचा आळ घेतो. व यातच भानाचा तो खून करतो.

या कादंबरीत अनेक पात्रे ही वेगवेगळया स्वभावाची आहेत.

सावित्रा साध्वी, स्वाभिमानी, निग्रही आहे. तिची आपल्या पतीवर निष्ठा आहे. सासू व नणंदेवर प्रेम आहे.

तर सासू व नणंद हया सावित्राला सतत बोलत असतात. तिच्यावर घाणेरडे आरोप करतात. यांचा स्वभाव भांडखोर, आरोप करणे, चहाडया करणे असा आहे.

सावित्राच्या नव-याचा स्वभाव हा वेगळाच आहे. तो आपल्या आईवर व बहीणीवरच्या मायेपोटी स्वतःच्या पत्नीकडे दुर्लक्ष करतो. तो आपल्या आई विरुध्द बोलू शकत नाही. आपलं पत्नीवरील प्रेम तो पत्नीला सांगू शकत नाही.

जना ही वासनेच्या आहारी गेलेली बाई. धनगर म्हणजेच संभा - हा आपल्या घरावर प्रेम करतो संभाचा स्वभाव म्हणजे तो आपल्या भावाला पेटत्या घरात सोडून पळून गेलेला असतो. व व म्हणूनच तो आपल्या भावजयीला तोंड दाखवायला येत नाही. व धनगर होऊन राहतो. जेव्हा आपल्या घरावर संकट येते तेव्हा तो धावून येतो.

सावित्राच्या आईवडीलांचा स्वभाव म्हणजे त्यांना आपल्या मुलीवर असं वाईट प्रसंग आल्याबद्दल वाईट वाटते. त्यांच अंतःकरण पिळवटून निघतं.

तसेच यात आजगी ही अनेक प्रकारच्या गोष्टी सांगत असे. ती एक मुसलमान असून देखील एकदा सावित्राची आई आजारी होती तेव्हा एकादस करते. दुस-यांना सतत मदत करते.

वेताळा राऊत हा तर यातील खलनायक आहे. दुस-यांच वाईट करण्याचा त्याचा स्वभाव आहे.

ग्रामीण समाजात अडाणीपणामुळे अनेक प्रसंग येतात. म्हणजेच सासू अज्ञानी असते. यामुळेच ती आपल्या सुनेवर करणी केल्याचा आरोप करते. तसेच आणखी एकदा ती पाण्याला जाताना पाडा धावत आल्याने तिची घागर पडते. पदर फाटतो. तेव्हा सावित्राची सासू तिच्यावर आरोप करते.

या अडाणीपणामुळेच सासू आपल्या सुनेवर करणी केल्याचा आरोप करते व म्हणूनच आपली मुलगी काल तापाने फणफणली होती. असे तिला वाटते. सावित्राने जनीशी बोलू नये असे सासूला वाटते.

विकाराच्या आहारी जाण्याचे व त्यातच पशू पातळीवर जीवनं जगायचं व त्यातून कधीच बाहेर न पडण्याची इच्छा असणारी पात्रे या कादंबरीत पहायला मिळतात. जनी ही आपले लग्नापूर्वीचे वेताळा रावताशी असलेले संबंध संपवण्यास तयार नसते. तसेच हा वेताळा राऊत देखील आपले धंदे सोडून देत नाही.

या कादंबरीत भावकी व यातील बुरसटलेल्या कल्पना म्हणजे हैबता. हा सावित्राच्या सास-याचा चुलत भाऊ पण तरी तो वैरी बनतो. त्याने समायकातील जमीन बळकावली, मारकरी घातलं. डाव साधून कपटीपणा केला.

तसेच या कादंबरीत अंधश्रध्दा या बाबीवर विश्वास ठेवतात. सावित्राने जनीशी बोलू नये. असे सासूला वाटते. सावित्रीला जनीनं फूस लावली असेल व म्हणूनच तिनं करणी केली असे वाटते.

यामधील सावित्रीचे व्यक्तिचित्र फार महत्वाचे आहे. यामध्ये स्त्रीच्या निष्ठेचा भाग महत्वाचा आहे. स्त्री ही आपल्या पतीवर प्रेम कशी करते. त्याला कुंकवाचा धनी मानते. त्यावरच

निष्ठा ठेवते. ती स्वाभिमानी आहे ती जिगरबाज बाई आहे मानी आहे. ती आपल्या पतीवर नि:स्सीम प्रेम करते.

अशा प्रकारे लेखकाची विवेचशैली छोटया छोटया वाक्यात, ग्रामीण भाषेत, वस्तुस्थितीला साजेशी आणि परिणामकारक अशीच झालेली दिसून येते.

या दोन कादंबरी संग्रहाचे रुपबंधात्मक समीक्षण पुढील प्रकरणात केलेले आहे.

xxxxxxxxxxx